नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**


अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

# युगवाणी

ऑगस्ट / नोव्हेंबर
१९८०





अनुक्रमणिका




अकोला येथील अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. गो. नी. दांडेकर यांच्या सत्कार प्रसंगी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर भाषण करतांना.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
पुरस्कृत : विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक शरद कोलारकर
कार्यकारी संपादक : प्रकाश देशपांडे

# यु ग वा णी

संपादक मंडळ : मु. श्री. पांढरीपांडे
म. रा. जोशी, वृंदावन देशमुख
रूपा कुळकर्णी, शंकर बडे, श्रीपाद मुंजे

वर्ष ३६ अंक ५–८ □ ऑगस्ट–नोव्हें. १९८० □ शरद–हेमंत □ श्रावण–कार्तिक शके १९०२
□ मूल्य तीन रुपये □

## विशेष लेख



## पारितोषिक–पात्र एकांकिका



## लेख



## कविता



## कथा



## पुस्तकें

युगवाणीच्या ह्या अंकाला उशीर झालेला आहे याची आम्हाला पूर्ण जाणीव असून त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

परंतु विलंब होण्यास जी परिस्थिती कारणीभूत झाली ती आमच्या हाती नसल्याने आमचा नाईलाज झाला.

एप्रिल महिन्यात युगवाणीची संपादकीय सूत्रे आमच्या हाती आली. त्यावेळी मागील कारकीर्दीचा फेब्रु०-मार्च १९८० चा अंकच प्रकाशित झालेला नव्हता. त्यावेळी सर्व छापखाने निवडणुकीच्या कार्यात गुंतल्यामुळे तो अंक वाचकांच्या हाती पडण्यास मे महिना उजाडला. त्यामुळे आमचा एप्रिल-मे चा पहिला अंक जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध झाला. त्यानंतर जून–जुलै १९८० चा दुसरा अंक सप्टेंबरच्या अखेरीस बाहेर पडला. यानंतर दिवाळीचा मोठा अंक काढून या विलंबाची भरपाई करावी अशी आमची कल्पना होती. परंतु ह्या अंकाकरिता युगवाणीतर्फे एकांकिका स्पर्धा जाहीर केली. ह्या स्पर्धेला महाराष्ट्रातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. एकूण ११८ एकांकिका आल्या. त्या एकांकिकांचे वाचन आणि परीक्षण करणाऱ्या परीक्षकांना त्याकरिता जवळजवळ सव्वा महिना लागला. त्यानंतर अंक छापखान्यात गेला परंतु तेथेही तो अनेक अडचणींच्या भोवऱ्यात सापडला—

असो. ह्या पलीकडे अंक वेळच्या वेळी प्रसिद्ध होईल याची शक्य तितकी काळजी घेऊ, असे ह्याचवेळी आम्ही आश्वासन देतो.

आमच्या एकांकिका-लेखन- स्पर्धेचे परीक्षक डॉ. वि. स. जोग आणि सौ. अनुराधा जोशी यांनी मोठ्या आस्थेने आणि अपार कष्ट घेऊन ह्या एकांकिकांचे परीक्षण केले. युगवाणीतर्फे मी त्यांचा अतिशय ऋणी आहे. ज्या लेखकांनी आपल्या एकांकिका पाठवून स्पर्धेत भाग घेतला त्यांच्या सहकार्याबद्दल युगवाणीतर्फे आम्ही त्यांचे आभार मानतो.

अकोला येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून श्री. गो. नी. दांडेकर निवडून आले त्याबद्दल युगवाणीतर्फे आम्ही त्यांचे अभिनन्दन करतो.

**शरद कोलारकर**
संपादक युगवाणी

# विस्फोट

चंद्रभूषण कुलश्रेष्ठ

(रंगभूमीच्या साधारण मध्यावर मोकळी जागा. दोन बाजूस दोन लेव्हल्स. लेव्हलसवर प्रत्येकी दोन खुर्च्या. पार्श्वभूमीवर काळा पडदा. पडद्यावर गुंता-गुंतीची दुर्बोध, एकमेकात मिसळलेली भौमितिक रेषा, रचना, रेखाटने,-अर्थात एकांकिकेस अनुरूप अशी-मन प्रफुल्लित करणारे वाद्य संगीत सुरू होत असताना पडदा उघडतो-मोकळ्या भागामध्ये, रंगमंचावर एक व्यक्ती नाचत आहे. वकिलाचा काळा झगा घेऊन. छानशा गिरक्या घेत नाचत असताना स्वत:शीच-)

**व्यक्ती :** आनंदी-आनंद गडे इकडे तिकडे चोहिकडे-इकडे तिकडे चोहिकडे-आनंदी आनंद गडे सारी सृष्टी आनंदाने न्हावून निघालेली आहे. मी आनंदी आहे. जग आनंदी आहे.

**आवाज :** आनंदी आहेस तू ? खरोखरच तू आनंदी आहेस का ?

**व्यक्ती** (आपल्याच आनंदात मग्न होऊन नाचत-नाचत) हो. मी आनंदी आहे. पण तू कोण आहेस ?

**आवाज :** तू आनंदी आहेस हे जरी काही क्षणापुरते मान्य केले तरी जग आनंदी आहे का ?

**व्यक्ती :** मी आनंदी आहे. माझे जगही आनंदी आहे.

**आवाज :** (हसून) तुझे जग आनंदी आहे. तुझे जग या जगाहून भिन्न आहे का ?

**व्यक्ती :** या क्षणाला तरी भिन्नच आहे.

**आवाज :** आणि पुढच्या क्षणाला ?

**व्यक्ती :** पण तू कोण आहेस ? तू समोर का येत नाहीस ?

**आवाज :** मी कोण आहे यापेक्षा तू कोण आहेस हे महत्त्वाचं. कोण आहेस तू ?

**व्यक्ती :** माझं नाव आनंद चिंतामण...

**आवाज :** तुझं नाव नाही विचारलं मी. (व्यक्ती नाचता-नाचता थांबते) मी विचारलं 'तू' कोण आहेस ?

**व्यक्ती :** (विचार करून) माणूस !

**आवाज :** पुन्हा विचार करून सांग. माणूस आहेस का तू ?

**व्यक्ती :** काय म्हणायचंय तुला ? मी माणूस नाही ? मला मिळालेलं शरीर माणसासारखंच आहे. मी माणूसच आहे !

**आवाज :** कुणी सांगितलं ?

**व्यक्ती :** इतर माणसांनी. आरशांनी.

**आवाज** माणसं आणि आरसे दोन्ही खोटं बोलतात.

**व्यक्ती :** म्हणजे मी माणूस नाही असं म्हणायचंय का तुला ? पण तू कोण आहेस ?

**आवाज :** (प्रश्नाचे उत्तर टाळून) मघाशी तू आनंदी होतास. आता...(व्यक्ती विचारात पडते). आता तू आनंदी नाहीस. मागच्या आनंदी क्षणांची सोबत आता संपलीय. आता तू विचाराधीन आहेस...माफ कर, तुझ्या आनंदात व्यत्यय आणला मी...आता पुन्हा पूर्वीसारखाच आनंदात रहा. विसरून जा मी तुला जे बोललो होते ते.

(आनंद काही क्षण थांबून मानेला एक झटका देतो. पुन्हा नाचू लागतो. अडखळतो. पूर्वीसारखे आता त्याला नाचता येत नाही. आनंद दाणकन् पाय आदळतो. झगा खाली ओघळून पडतो.)

**आनंद :** कुठे गेला तो आनंद ? ते आनंदाचे मोरपंखी क्षण कुठे गेले ? एखाद्या वात्रट पोराने मोर-पंखाचे तुकडे-तुकडे करावेत तसे झालेय. हसरा

चेहरा आरशात पाहत असताना आरशावर कुणी दगड मारून हसऱ्या चेहऱ्याच्या ठिकऱ्या उडवाव्यात आणि आनंदाचे तुकडे जमिनीवर विखरून पडावेत...जमिनीवर पडलेले आनंदाचे तुकडे ! मातीत मिळेल का आनंद ?

(जमिनीवर वाकून तुकडे गोळा करीत असल्यासारखा आनंद गोळा करू लागतो)

**आवाज :** वेडा आहेस तू ! मातीत पडलेल्या बर्फाच्या काचेसारखे आनंदाचे तुकडे असतात. ते पुन्हा मिळत नाहीत. मिळतो फक्त तुकड्या–तुकड्यांनी सांडलेला आनंद. मातीत विरघळलेले पाणी.

(आनंद तुकडे वेचता–वेचता हताश होतो. चिडतो)

**आनंद :** कोण आहेस तू ? समोर का येत नाहीस ? (फक्त हास्याचा ध्वनी ऐकू येतो) कोण आहेस तू ? कोण आहेस ? माझा आनंद हिरावून घेण्याचा काय अधिकार तुला ?

**आवाज :** मी समोर येऊ शकत नाही. मी समोर आलो तर तुझा आनंद, तुझी चिंता, तुझा क्रोध सारं...सारं संपेल.

**आनंद :** हिंमत असेल तर समोर ये. असा भ्याडासारखा लपतोस कशाला ?

**आवाज :** मी भ्याड नाही आणि मला समोर पाहण्याची तुला हिंमत होणार नाही. वेळी–अवेळी मी कुणाच्या समोर जात नाही. मी फक्त योग्य वेळी समोर येत असतो.

(आनंद हताशपणे डोके धरून खुर्चीवर बसतो. काही क्षण अशाच अवस्थेत असताना प्रकाश मंद–प्रखर, मंद–प्रखर होत राहतो. तेवढ्यात कुणीतरी जवळ उभे असल्यासारखे वाटते. आनंद दचकतो.)

**आनंद :** क्....क् कोण ? कोण आहेस तू ?...तू तर मला दिनूसारखा दिसतोस. तू...तू दिनूच आहेस की दिनूच्या रूपात तो...तो आहेस ?

**दिनू :** (खुर्चीवर बसत) अरे, मी तुझं अभिनंदन करायला आलोय आणि तू...?

**आनंद :** अभिनंदन ? कशाबद्दल ?

**दिनू :** वा राव ! नाटक छान करताय ! अबे ओ ज्यादा नखरे नै मंगता. चुपचाप हमने दी हुओ बधाई का स्वीकार कीजिए.

**आनंद :** बधाई ? किस बातकी ?

**दिनू :** किस बातकी ? (उठून स्टाईलीश फिरत) किस बातकी ? लेडीज अँड जंटलमन, सुना आपने ? यह कंबख्त क्या कह रहा है ? या तो यह बहुत कमीना है या बहुत नादान. मायबाप सरकारने याचा गौरव करावा तेवढा थोडा आहे. याच्या कादंबरीला सरकारी बक्षीस मिळाले तरीही जणु आपण त्या गावचेच नाही अशाप्रकारे मला विचारतो आहे. बधाई किस बातकी ? (आनंदच्या पोटात गुद्दा मारून) अरे बधाई तेरी, तेरे बापकी, तेरे खानदान की...

**आनंद :** खामोष ! (दिनू आश्चर्याने त्याच्याकडे पाहत राहतो.)

**दिनू :** (काही क्षणानंतर) काय झालं ?

**आनंद :** (भानावर येऊन) काही नाही. सिगरेट असेल तर दे. (दिनू सिगरेट देतो. आनंद सिगरेट पेटवून ओढू लागतो. स्वतःशी–) काय खरं आहे ? पलिकडला आनंदाचा क्षण, मघाचा भीतीचा की, आताचा ? (थांबून) ते तुकडे मला पुन्हा मिळणार की गेले असेच मातीत... शोधायला हवं (पुन्हा जमिनीवर शोधू लागतो) इथे एक तुकडा आहे...तिथं एक तुकडा आहे.. तो पहा तिथे एक हं. हा एक सापडला. ( थांबतो. ) (हातातील तुकडे फेकल्या प्रमाणे) हुं : आता काय उपयोग मिळालेले तुकडे कितीही नीट जुळवले तरी पूर्वीसारखे ते जुळणार आहेत का ? शक्य नाही ? का शक्य नाही ? आज जगात सारं शक्य आहे. पाण्यापासून वीज... वीजेपासून उष्णता अणु अणुंचा बॉम्ब, लाखो लोकांची कत्तल एक क्षणात चंद्रावर माणसाचे पाय टेस्ट ट्यूब बेबी. सारं शक्य आहे मग हे का शक्य नाही ?

**दिनू :** काय करीत होतास तू ?

**आनंद :** माझ्या आनंदाचे तुकडे वेचीत होतो.

(एकजण प्रवेश करतो.)

**एकजण :** (घाईने दिनूकडे जाऊन) का हो तुमच्याकडे एखादं भांडं आहे का ?

**दिनू :** कशासाठी ?

**एकजण :** मलाही काही तुकडे गोळा करायचेत.

**दिनू :** कशाचे ?

**एकजण :** माझ्या बायकोच्या देहाचे. काल मी आणि ती नेहमीप्रमाणे लोकलने ऑफीसला चाललो होतो. ती दारात उभी होती, निर्भयपणे. मी आत लोंबकळत होतो, सुरक्षित. तेवढ्यात आत कुणाचे तरी पाकीट मारले गेले म्हणून गोंधळ उडाला.

**आनंद :** मग ?

**एकजण :** त्या गोंधळात माझ्या बायकोला कुणाचा तरी धक्का लागला.

**दिनू :** मग ?

**एकजण :** मग ती बाहेर फेकली गेली, समोरून येणाऱ्या लोकलवर जाऊन आदळली...पुन्हा या लोकलवर...पुन्हा त्या लोकलवर (भरधाव धावणाऱ्या लोकलचा आवाज ऐकू येतो. त्या आवाजात एकजण हातवारे करीत आहे.) तिचे काही तुकडे झाले. मला वाटलं खूप तुकडे झाले असतील. पण तुकडे थोडेच झाले, अपेक्षेपेक्षा. मला ते गोळा करून घरी न्यायचे आहेत...आहे का भांडं तुमच्याकडे ? भांडं नसेल तर पेटी द्या. माझ्या घरी फ्रीज आहे. आमच्या दोघांच्या पगारातून हप्त्याने खरेदी केलेला.

**आनंद :** हप्ता कितीचा बसला ?

**एकजण :** अकराशे सुरवातीला. नंतर दरमहा शंभर रुपये. असे...असे किती हप्ते ? (आनंदला) किती हो ?

**आनंद :** मला माहित नाही म्हणून तुम्हाला विचारलं.

**एकजण :** अरेच्च्या ! विसरलोच...पण ते भांडं किंवा पेटी ?

**दिनू :** तुमच्या घरी नाहीत का ?

**एकजण :** पुष्कळ आहेत. पण सगळी एंगेज आहेत.

**दिनू :** का ? काय ठेवलंय त्यात ?

**एकजण :** दहा भांडी भरून रक्त आहे. एका मोठ्या पातेल्यात हाडं आणि दुसऱ्यात मांस आहे. काचेच्या एका सुंदर भांड्यात हृदय आहे. पण डोकं कुठं ठेवावं ? ते कळत नाहीय. काय हो कुठं ठेवावं ? आणि डोकं कुठं गेलंय तेही कळत नाहीय.

**दिनू :** डोकंच नसेल.

**एकजण :** (आनंदाम) पण तुम्हाला निश्चित माहित असेल कुठं ठेवावं डोकं ?

**आनंद :** माहित होतं पण आता मी विसरलोय.

**एकजण :** च्...च्. च्. विसरलात ! अच्छा, जाऊ दे. फरगेट इट. विसरून जा...विसरून जा. (जणू सिगरेट काढण्यासाठी खिशात हात घालीत) तुमच्याकडे काडीपेटी आहे का ? भांडं नसेल तर काडीपेटी निश्चित असेल.

**आनंद :** (काडीपेटी देत) सिगरेट ओढणार आहात वाटतं ?

**एकजण :** करेक्ट ! द्या सिगरेट द्या. (आनंद कडून सिगरेटचे पाकीट घेऊन सिगरेट पेटवतो. आरामशीरपणे बसून झुरके घेतो. मग रुबाबाने आनंद व दिनूपुढे पाकीट करीत) घ्या तुम्हीही ओढा हवी तर (दिनू व आनंद सिगरेट घेऊन ओढू लागतात. काही वेळ कुणीच बोलत नाही.) चला वरं झालं.

**दिनू :** काय ते ? बायकोबद्दल म्हणताय का ?

**एकजण :** छे : साखरेबद्दल बोलतोय. साखर मिळत नाही ते वरं झाले म्हटलं. नाहीतरी डायबेटीस म्हटलं की गोड खाण्यावर कंट्रोल पाहिजेच नाही का ? काय हो तुम्हाला काय वाटतं ? (कुणीच उत्तर देत नाही.) अच्छा निघतो मी. साहेबांना भेटून कालच्या रजेचा अर्ज पुट करावा लागेल. येतो मी—थँक्स फॉर दि सिगरेट. (जाऊ लागतो, जाता जाता पुन्हा वळतो) पण अर्जात काय लिहावं ?

**आनंद :** काहीही लिहा.

**एकजण :** छे तसं कसं चालेल ? साहेबाला खरं वाटायला हवं ना ?

**आनंद :** मग लिहून टाका लोकलवर आदळून बायकोचे तुकडे झाले म्हणून.

**एकजण :** छट् चालायचं नाही.

**दिनू :** का ?

**एकजण :** साहेब म्हणेल 'तुकडे बायकोचे झाले तुमचे तर नाही ना झाले ! तुम्ही कामावर यायला हवं होतं.'

**दिनू :** बायकोचे तुकडे वेचण्याचं काम होतं म्हणून लिहा.

**एकजण :** नाही. तेही चालणार नाही.

**दिनू :** का ?

**एकजण :** अहो, साहेब म्हणेल, 'पुरावा पाहिजे. अर्जावरोवर सगळे तुकडे जोडा !' आणि अजून तिचं डोकं कुठं मिळत नाहीय. नाही तरी वेंधळीच होती ती. गॅस पेटवला तर चहाचं भांडं च ठेवायची नाही. चहाचं भांडं ठेवलं तर गॅसच पेटवलेला नसे. हं विनडोक साली.

**दिनू :** तुम्ही असं करा साहेबाला झकासपैकी पार्टी द्या.

**एकजण :** द्या टाळी. झकास आयडिया. पार्टी देऊन, लिव्ह सँक्शन करून घ्यायची बायकोचे तुकडे झाल्यावद्दल...पण वायकोचे काही ऑब्जेक्शन तर येणार नाही ना ?

**दिनू :** ती कशाला मरायला ऑब्जेक्शन घेईल ?

**एकजण :** अँ हँ. तिचं काही सांगता येत नाही.

**आनंद :** अहो पण, तुमची मेलेली बायको ऑब्जेक्शन कसं घेईल ?

**एकजण :** पण ती मेलीय कुठं ?

**दिनू :** च्याय...तुम्हीच म्हणालात ना आत्ता वायकोचे तुकडे झाले म्हणून.

**एकजण :** हो, असंच म्हणालो मी. 'वायकोचे तुकडे झाले' असंच म्हणालो मी. पण ती मेलीय असं कुठं म्हटलं मी ?

**आनंद :** तिचे तुकडे झाले म्हणजे ती मेलीच की !

**एकजण :** मला नाही पटत तुम्ही म्हणताय ते. तुम्हाला ते गाणं माहित आहे का ?

**दिनू :** कोणतं

**एकजण :** ते हो. दिलके टुकडे टुकडे करके मुस्कुराकर चल दिये जाते जाते ये तो वता जा हम जियेंगे किस के लिये ?

आता या गाण्यातल्या प्रियकराच्या दिलाचे अगदी तुकडे तुकडे झालेत. तरी तो म्हणतोय, विचारतोय की, हम जियेंगे किसके लिये. म्हणजे तुकडे होऊनही तो जिवंत आहे.

**आनंद :** पण ते अलंकारिक अर्थानं म्हटलंय.

**एकजण :** काय ते ? तुकडे होणं हे अलंकारिक की जिवंत राहणे हे अलंकारिक ?

**दिनू** (वैतागून) डोकं फुटायची वेळ आलीय.

**एकजण :** फुटल्यावर मला सांगा. साहेबांच्याकडे अर्जा-वरोबर जोडायला वायकोचे डोके म्हणून जोडून देईन. प्लीज...तेवढं माझ्यासाठी...अहो परवा रॉकेलच्या पाळीत उभा होतो. उभं राहून-राहून तंगड्या तुटल्या. अपंग वर्ष आता येईल त्यामुळं मी एका लंगड्या भिकाऱ्याला दान करून आलो त्या.

**आनंद :** छान केलंत. तुमच्यासारख्या मानवतावादी मानवांची फारच गरज आहे राष्ट्राला.

**एकजण** राष्ट्र ? कुठं आहे ही कंपनी ? कुणाची ? प्रमोशनचे चान्सेस बरे आहेत का तिथं ? नाही-तरी फ्रीजचे हप्ते आता माझ्या एकट्याच्या पगारात भागवणं जरा जड दिसतंय. पण जाऊ दे. पुन्हा त्या राष्ट्राकडे अर्ज करा, इंटरव्हयू द्या. नकोच ती कटकट. आहे त्यात भागवू कसं-तरी. मारा गोळी त्या राष्ट्राला. लंगड्याची गोष्ट सांगतो. माझ्या तंगड्या मिळाल्या म्हणून खूप आनंद झाला त्याला पण...

**दिनू** पण काय ?

**एकजण** परत आला तो माझ्याकडे. म्हणाला, "साहेव मी लंगडा होतो तेव्हा सगळे भीक द्यायचे मला. आता कुणीच देत नाही. मी कसा जगू ? तुम्ही तुमच्या तंगड्या घ्या परत."

**आनंद :** मग घेतल्या का तुम्ही परत ?

**एकजण :** मी म्हटलं, "वराच दिसतोस की. माझ्या तंगड्या माझ्याच गळ्यात अडकवतोस काय ? आणि मी एकदा दान केलेल्या तंगड्या परत घेत नसतो. समजलास ? (मोठ्याने हसून) आता तो साला लंगडा, पोस्टमन म्हणून कामाला लागलाय आमच्याच बीटला आणि उभा असतो रॉकेलच्या पाळीत, स्वत:च्या पायावर ! (खुनशीपणे हसू लागतो. संगीताचा तीव्र ध्वनी येतो. काही क्षण अंधार-उजेड होतो. रंगमंचावर एकटा आनंद आहे. तो पळताना दिसू लागतो. दिव्यांची उघडझाप हळूहळू चालू आहे.)

**आनंद** (पळता पळता) कुठून आलोय मी ? कुठे धावतोय मी ? सकाळच्या ब्रेकफास्टपासून रात्रीच्या डिनरपर्यंत जिवंत राह्यचे हेच का माझे जीवन आहे ? लहानपणी कुलकर्ण्यांचा





अनुक्रमणिका

पोर म्हणून चार मुलांनी उचल बांगडी करून शाळेत टाकला...शाळेतल्या अभ्यासाबरोबर फरफटत कॉलेजमध्ये थडकलो...बालकवीपासून मर्ढेकरापर्यंत मर्ढेकरापासून बापट, बोरकर, अनिल, पाडगावकर, चित्रे, ग्रेस, कोलटकरापर्यंत. आपटे, फडके, खांडेकर, भावे, गोखले, गाडगीळ, जी. ए., चोरघडेपासून सारे कुलकर्णी, देशपांडे घेऊन गडकरी, खाडिलकर, देवल, खानोलकर, कानेटकर, मतकरी, आळेकर, एलकुंचवार, तेंडुलकर, तावडे यांच्या तावडीतून सुटून असे ज्ञानेश्वरांपासून नाडकर्ण्यापर्यंत सान्यांना आयुष्याचे तुकडे वाटत वाटत यावे–तर समोर उभा आहे प्रबंधाचा कवंध. थिसीस : ओ थिशिस, सकाळी थिसीस, दुपारी थिसीस रात्री थिसीस. डोक्यावरचा एकेक केस थिसीसला वेचून द्यायचा (थांबतो)–

टकलावर रामदास
खांद्यावर तुकाराम
तोंडाशी ज्ञानेश्वरी
मीरा छातीला जाम
पायाशी असू देत
मात्र हिजड्यांचा धाम
हिजडे तुला गुदगुल्या करतील
हसू नको हलू नको
घेतला वसा टाकू नको
उतशील मातशील
घेतला वसा टाकशील
–तर तुझ्या पावणे आठ पिढ्या
मास्तरकीच्या भोसड्यात जातील'
पेपरात डोके डोक्यात पेपर
चुळचुळ मुतली
चिमणी चुळुकभर
तिच्या मुतात न्हावून जा
तूप रोटी खाऊन जा.
चिमणी मुतते जिवानिशी
पिणारा म्हणतो फळशील कशी
बुब्बुळाचा स्कायलॅब करून
शोधून काढ गाईड
लिंगाचे कातडे टाक फाडून
तिथे भेटेल फ्रॉईड–
गाईड आणि फ्रॉईड
दोघांच्या भगभगीत मिठीत
खांद्यावरचे अंडे–
खाना मेरीऽऽ जान मेरीऽऽ जान
संडे के संडे !
तू थव्या बरोबर
थवा तुझ्या बरोबर
सान्यांच्या डोक्यावर उडताहेत चिमण्या
हगेल चिमणी टाळक्यावर
त्याला भाग्यवान म्हणायचं
थिसीस पुरा करायचा तर–
असं हाग्यवान व्हावं लागतं
काफिला गेला ज्या गुलमोहाराखालून
त्यांची बेडकी गोळा करून
कर व्ही. सी. च्या टेबलावर पेश
सोबत त्याच्या ट्रे मध्ये
स्वत:ची लाळ ठेव फ्रेश
असा सगळा भोंगळा गुंतावळा
तू वन त्यातील ऊ
एक होती ऊ
तिला झाली टू
ऊ आणि टू
दोघांचा झू
झू मध्ये भेटेल माकड
त्याला दाखव थिसीस
ओह ! गुड थिशिस !

–हाच माझ्या सान्या जन्माचा अर्थ म्हणावा का ? (थांबतो. दमलेला. बसतो. मंजिरी येते. पंख्याने वारा घालू लागते. तिच्या हातात दुधाचा ग्लास आहे.)

**मंजिरी :** फारच थकायला झालं वाटतं इकडून ? दूध घ्यावं स्वारीनं. बदाम दिखील टाकलेत म्हटलं.

**आनंद :** बरं केलंस.

**मंजिरी :** स्वारी नाराज दिसतेय. दासीकडून काही गुन्हा तरी झाला नाही ना !

**आनंद :** दासी ? कोण दासी ?

**मंजिरी :** ही काय स्वारीची गंमत म्हणायची ? मी आपल्या पायाची दासी नाही का ? (पाय दाबू लागते.)

**आनंद :** मला राजाची दासी माहिताय् फक्त. पायाची दासी नाही माहित.

**मंजिरी :** आज इकडून वरंच विनोद करायचं चाललंय.

**आनंद :** इकडून ? म्हणजे कुठून ? (इकडे तिकडे पाहातो.)

**मंजिरी :** इश्श, हे काय ! दासीच्या भाषेवर स्वारीची थट्टा चाललीय. आम्ही आपली जुन्या रीतीची माणसं. म्हणून तर मामंजींनी आमची निवड केली.

**आनंद :** मामंजी ? हां. म्हणजे माझा बाप.

**मंजिरी :** थोर माणसांबद्दल स्वारीनं असं बोलू नये.

**आनंद :** माझा बाप थोर होता असं वाटत तुला सॉरी, तुम्हाला ?

**मंजिरी :** यात काय सौंशय. लहानपणापासून मामंजी-बद्दल आमच्या घरी आदर आहे. घरी यायचे तेव्हा आमचंही खूप कौतुक करायचे. एकदा तर कौतुकानं खूप सारी खेळणी आणली होती त्यांनी. त्यातली एक बाहुली अजून ठेवलीय आम्ही जपून. झोपली की डोळे मिटते उठवली की उघडते. आता तिचे डोळे जागेवर नाहीत म्हणा, पण बाहुली सुंदरच.

**आनंद :** डोळे नसलेली बाहुली...तरीही सुंदरच हं.

**मंजिरी :** मामंजी असेच एकदा घरी आले होते त्यावेळी आम्ही पलंगावर झोपलो होतो.

**आनंद :** आम्ही म्हणजे कोण–कोण ?

**मंजिरी :** आम्ही म्हणजे मी हो. एकटीच.

**आनंद :** तुम्ही कधी लोकलचं नाव ऐकलंय का ?

**मंजिरी :** लोलक माहिताय आम्हाला. तर आमचा फ्रॉक नीट करून मामंजी म्हणाले, 'अगदी बाहुली सारख्या झोपल्यात सूनबाई.' आम्ही टक्कन् डोळे उघडले. भारीच बाई लाज वाटली आम्हाला. आम्ही पळून गेलो माँ साहेबांकडे

**आनंद :** माँ साहेब ?

**मंजिरी :** (आपल्याच नादात) मामंजी म्हणाले, 'तायडे तुझी कार्टी भलतीच स्मार्ट दिसते बरं.'

**आनंद :** छे: असं नसतील म्हणाले. ते म्हणाले असतील 'ताईसाहेब आपल्या कन्यासाहेब खूपच सुंदर दिसताहेत.'

**मंजिरी :** (दुर्लक्ष करून) स्वारीला आठवतं ? एकदा आम्ही भातुकलीचा खेळ खेळताना स्वारी तिथं आली होती. जरीची टोपी घालून. टोपीतून शेंडी भुरभुरत होती. त्यावेळी मैत्रिणींनी कित्ती थट्टा केली आमची. म्हणाल्या 'तुझा नवरा भारी गोड दिसतो ग. आम्ही पापा घेऊ का त्याचा.' आठवतं त्यावेळी आमच्या साऱ्या मैत्रिणींनी स्वारीचे पापे घेतले.

**आनंद :** न आठवायला काय झालं ? एकीनं तर पापा काय चावाच घेतला (गालावर हात फिरवीत) हलकट साली, कुठं असते ती ?

**मंजिरी :** कोण ?

**आनंद :** नाव नाही आठवत पण तिचे केस कुरळे होते· वेणी छोटीच पण दाट व्हायची तिची. तिने चावा घेतलान् मी तिच्या वेणीला घट्ट धरून हिसका दिला तशी ती खालीच आपटली. ऐवढाले डोळे वटारून पाहू लागली. मी म्हणालो, 'बघतेस काय डोळे वट्टारून' त्यावर ती म्हणाली 'डोळे आमचे आहेत आम्ही वट्टारू नाही तं झाकून घेऊ, तुला काय करायचंय !'

**मंजिरी** (हसत) हो, त्यावर स्वारी म्हणाली 'मग पापा दिखील आमचा आहे. तू कशाला घेत-लास ?' तर पमी म्हणते कशी, आता आठवलं पमी तिचं नाव, तर म्हणे 'पापा असतोच मुळी दुसऱ्यानं घेण्यासाठी.' हे ऐकताच स्वारीनं पमीचा पापा घेतला ... आमच्या देखत. (हसत राहते. हळूहळू हसणं कमी होते) तर काय सांगत होतो आम्ही. अं हं माँसाहेब म्हणाल्या, 'भावड्या तुझ्या घरी सून म्हणून शोभेल हो !'

**आनंद :** कोण, पमी ?

**मंजिरी :** नाही हो. आमच्याबद्दल म्हणाल्या त्या. मामंजी दिखील म्हणाले 'नंदूला अशीच बायको करायची !'

**आनंद** (एकदम उसळून) अशीच बायको करायची पण कुणी ? कुणाला करायची बायको ? माझी बायको कशी हवी हे बापानं ठरवायचं कारण काय ? पण त्यानं ते ठरवलं. कारण तो थोर होता कुलकर्णी वतनदार होता. गावात आणि घरात त्याचा दबदबा होता. त्या

दबदब्याखाली पोरालाही दाबायचा त्याला अधिकार होता. त्याप्रमाणे त्या थोर बापाने पोराला दाबलं, त्याच्या इच्छेला दाबलं. मोकळ्या–मोकळ्या कापसाला मशीन खाली दाबून त्याचा व्यवस्थित गठ्ठा करून, त्यावर गोणपाट बांधून वरून लोखंडी पट्ट्या ठोकाव्यात तसं. लोक म्हणाले बाप थोर. आनंदा म्हणजे थोर बापाचा थोर पोर. पण पोराचं मन पिंजलेल्या कापसासारखं पिंजून गेलंय हे कुणी जाणलंच नाही. आता माझ्या इच्छेला दाबणार कुणी राहिलंच नाही. ते काही नाही आता मला माझ्या बायकोचे तुकडे करावेच लागतील लोकल खाली. (लोकलचा धडाधडाट व जोरदार शिट्टी ऐकू येते. आनंदच्या चेहऱ्यावर प्रखर लाल प्रकाशाचा खेळ सुरू होतो. हळू हळू अंधार असतानाच आनंद खुर्चीवर बसलेला. डॉक्टर त्याच्या डोळ्यावर टॉर्च पेटवतात. हळूहळू प्रकाश येतो. दिनू बाजूला उभा आहे.)

**डॉक्टर :** (तपासणी पूर्ण करून दिनूकडे वळतात) यांना असं केव्हापासून सुरू झालं ?

**आनंद :** (आपल्याच तंद्रीत) हजारो वर्षांपासून हे असंच चाललंय.

**दिनू :** मलाही ते निश्चित आठवत नाही पण कधी–कधी विक्षिप्तासारखा वागायचा. आता तर त्याला वाटतंय की आपण आपल्या बायकोचे तुकडे केलेत.

**डॉक्टर :** हं. दिवसातून किती वेळ झोपतात ?

**आनंद :** एक युग...एक युग म्हणजे काळपुरुषाची एक जांभई.

**दिनू :** झोपला तर झोपूनच राहतो. जागा झाला तर जागतच राहतो.

**डॉक्टर :** संसारात काही दुःख वगैरे ?

**आनंद :** क्षुद्र जीवांची संसारातील सुखदुःखांची बेरीज–वजाबाकी म्हणजे महासागरात सूक्ष्म जंतुंचे आक्रंदन. हे परमेश्वरा ! तू जिवंत असलास तर या माणसांना थोडी अक्कल दे. पण छे...माणसं आता राहिलीत कुठे ! माझ्यातला माणूस देखील मी संपवून टाकलाय. माणूस ? नव्हे माणसाचे तुकडे...होते माझ्या हृदयात थोडे तेही काळाच्या मांजराने मटकावून टाकले आणि मी...कुत्र्याच्या शेपटीला अपयशांच्या फटाक्यांची माळ पेटवून द्यावी ... प्रत्येक फटाक्याच्या स्फोटाबरोबर जीव घेऊन कुत्र्यानं पळावं तसा पळतोय...ही मांजरं फार हरामखोर असतात. टेबलावर ठेवलेला दुधाचा ग्लास सांडतात–फोडतात नकळत.

**डॉक्टर :** वैनींना बोलवा जरा.

(क्षण भर अंधार–ग्लास फुटल्याचा आवाज होतो.रंगमंचाच्या दुसऱ्या भागात आनंद रागाने थरथरत उभा आहे. आनंद किंचाळतो.)

**आनंद :** कुणी सांडलं हे दूध ?

(मंजिरी पळत येते. मान खाली घालून उभी राहते.)

**आनंद :** कुणी सांडलं हे दूध ?

**मंजिरी :** आम्हाला माहित नाही.

**आनंद :** तुम्हाला काय माहिताय हे तरी आम्हाला कळू द्या. तुम्हाला सॉस माहित नाही. तुम्हाला ऑम्लेट माहित नाही. तुम्हाला लिपस्टिक माहित नाही. तुम्हाला एटीकेटस् माहित नाहीत. तुम्हाला काहीच माहित नाही. याची आम्हाला शरम वाटते हे तरी तुम्हाला माहित आहे का ?

**मंजिरी :** हो.

**आनंद :** 'हो' म्हणून उलट उत्तरं देता.

**मंजिरी :** नाही

**आनंद :** नाही काय नाही...

**मंजिरी :** यापुढं उत्तरं देणार नाही.

**आनंद :** पुन्हा मूर्खपणा. अहो उत्तरं हवीत आम्हाला, उलट उत्तरं नकोत समजलात ? (आनंद तावातावाने बोलतच आहे. लाथा बुक्क्याने तिला तुडवत आहे. तुझे तुकडे तुकडे करून लोकल खाली टाकेन असे किंचाळत आहे. मंजिरी रंगमंचाच्या पहिल्या भागात रडत उभी आहे.)

**डॉक्टर :** सगळं ठीक होईल वैनी. जरा धीर धरा.

**मंजिरी :** डॉक्टर खूप खूप केलं आम्ही यांच्यासाठी. देव दैवक झाले. अंगारे धुपारे झाले पण काही उपयोग होत नाही. उलट त्यांना अधिक संताप होतो. पिसाळल्यासारखे...

**डॉक्टर :** त्यांना राग येणं साहाजिक आहे. अंगारे धुपारे उपयोगाचे नाहीत यासाठी. बरं तुमच्याशी हे पूर्वीपासूनच असे वागतात की...

**मंजिरी :** नाही हो. पहिल्यांदा तर खूप मन लावलं होतं त्यांनी. म्हणायचे 'मला तुझ्यासारखी बायको मिळाली आणि मी धन्य झालो.'

**डॉक्टर :** हूं.

**मंजिरी :** त्यांना खूप कौतुक वाटायचं. कधी कधी अचानक नवे कार्यक्रम आखायचे. इकडे फिरायला जाऊ, तिकडे खरेदीला जाऊ. हे नाही ते असं सारखं चालायचं. आम्हाला अगदी पुरे पुरे व्हायचं. बऱ्याच वेळा त्यांना अडवावं लागायचं. एकदा तर खूप रागाला आले म्हणाले, 'मी तुझ्यावर इतकं प्रेम करतोय पण तुला त्याची किंमतच नाही. तुला माझ्या प्रेमाची किंमत नाही आणि माझीही. मधू असती तर किती खूष झाली असती.

**डॉक्टर :** कोण ?

**दिनू :** आनंद बरोबर कॉलेजमध्ये होती ती.

**डॉक्टर :** अच्छा...मग आता कुठं आहे ती मधू ?
(मधूचे नाव ऐकताच आनंद विचित्रपणे सावध होतो. हळूहळू डॉक्टर, दिनू व मंजिरीकडे येतो. आनंद डॉक्टरच्या जवळ येतो.)

**आनंद :** कुणी घेतलं मधूचं नाव ? सांगून ठेवतो माझ्यासमोर मधूचं नाव कुणी घ्यायचं नाही. मला विसरायचंय ते सारं. मधूला विसरायचं असेल तर काय करावं लागेल ? सांगा डॉक्टर, तुम्हाला सांगायलाच हवं. कारण तुम्ही डॉक्टर आहात.

**डॉक्टर :** (मृदू स्वरात) तुम्हाला काय वाटतं ? काय करावं ?

**आनंद :** साधी गोष्ट आहे. एखादी गोष्ट विसरायची असेल तर...तर दुसरी गोष्ट आठवावी...पण आठवण्यासारखी दुसरी गोष्ट कोणती ? सगळ्या आठवणी तर मधूच्याच आहेत.(डॉक्टर मंजिरीला जाण्याची खूण करतात) सॉस किती छान करायची मधू (मंजिरी स्फुंदत जाते.) ऑम्लेट खावं तर तिच्या हातचं. बॉब केलेले केस. सावळ्या रंगाला शोभेलसा मेकप आणि सुंदर शेडची लिपस्टिक. अजून आठवतेय त्या लिपस्टिकची चव. ती गरोदर होती तेव्हा तिच्या सावळ्या रंगावर आलेलं ते तेज अजून आठवतेय. म्हणायची 'आनंदा, तुला मुलगा हवा की मुलगी ?' पण आमचं लग्न कुठं झालं होतं ! आणि लग्नाचा काय संबंध प्रेमात. बडवे देखील हरामखोर. मी म्हटलं पांडुरंगाला साक्षी ठेवून प्रेम केलं तसंच लग्न करू तर म्हणाले. पांडुरंगालाच सांगा लग्न लावायला ... हं स्वर्गातून पुष्पवृष्टी झाली. साऱ्या देवांनी पुष्पवर्षाव केला आमच्यावर पण म्हसोबानं नाही केला. मी विचारलं असं का तर म्हणे मरी आई भेटली नाही म्हणून नाराज होता. फोन केला कार्टरला सारं सांगितलं. (फोन करीत असल्याचा अविर्भाव) हॅलो कार्टर, गुड मॉर्निंग यस्...आनंद चिंतामण स्पिकींग...अे... कॉंग्रॅट्स्. कशाबद्दल ? हं...ते नॉव्हेलच्या प्राईजबद्दल म्हणताय ... अच्छा थँक्यू...काय ? हं...ते काम ना ठीक आहे आय वील डू इट...बट...पण तेवढं युरेनियमचं लक्षात असू द्या... बघतो म्हणताय ? बटं ...सी. यू अगेन (अण्णासाहेब प्रवेश करतात. चेहऱ्यावर क्रूर स्मित आहे.)

**अण्णासाहेब :** काय चाललंय आनंदराव ?

**आनंद :** कार्टरला फोन करतोय.

**अण्णासाहेब :** अस्स का ? वा...वा मग आमचाही नमस्कार सांगा.

**आनंद** (फोन ठेवीत) हॅट् लुंग्यासुंग्याचा नमस्कार तो घेत नसतो (तंद्रीत जातो)

**अण्णासाहेब :** बरं बुवा राहिलं. काय म्हणतात कार्टर साहेब ?

**आनंद :** अं...कार्टर साहेब ? कोण कार्टर ? मला माहित नाही. त्या तिथे पलिकडे, चौकशीच्या खिडकीकडे, चौकशी करा.

**अण्णासाहेब :** अहो पण आताच तुम्ही फोन केला नं. म्हणजे कार्टरची तुमची चांगली ओळख दिसतेय.

**आनंद :** काय वेडे आहात हो तुम्ही. फोन करायला ओळख कशाला लागते. तुम्हीही करा वाटल्यास पण जपून बोला हं...हे टेलीफोन ऑपरेटर्स कान देऊन असतात इकडे...साऱ्या ऑपरेटर्सचे कान कापून टाकले पाहिजेत. किंवा कान कापलेल्या माणसालाच ऑपरेटर म्हणून नेमावं ... पण केवळ कान कापून चालेल का ? कान

फोडायलाच पाहिजे...फोनची नळी घालून. तुम्हाला काय वाटते डॉक्टर? नुसते कान कापून बहिरे होतील की, कान फोडावे लागतील? पण छे...तुम्ही कसं उत्तर देणार? तुम्ही मनोरुग्ण तज्ञ, सायकॅट्रिस्ट, वेड्यांचे डॉक्टर आणि मी वेड्यासारखा तुम्हालाच विचारतोय! खरं म्हणजे हा प्रश्न इ. एन्. टी. च्या कक्षेतला. त्यांनाच विचारला पाहिजे. (थांबून) आणखी एक सांगतो. (अण्णाकडे बोट दाखवून) आमचे हे शेजारी. हेही त्या ऑपरेटर्सच्याच जातीतले. यांचेही कान कापण्याची व्यवस्था करायला हवी. पुन्हा फोन करायला पाहिजे. काय साली कटकट आहे. बारीक-सारीक गोष्टोसाठी बिचाऱ्या फोनला त्रास होतो. (नाजुकपणे फोन उचलून) अस्सलाम आलेकुम् खुमेनी, खोमेनी, खौमेनी किंवा खुमैनी काय असाल ते...हं ऐकताय ना...काय कसं काय तेलपाणी? ठीक आहे ना?...हं हं...जाऊ द्या हो युद्धाचं काय घेऊन बसलात, अहो त्यापेक्षा भयंकर प्रसंग आहे...आमचे ते अण्णासाहेब...अं... हं...तेच तेच...बरोबर...आमचे शेजारी आहेत ते हं, तर त्यांचा कान सारखा आमच्या घराकडे असतो हो... काय म्हणताय...परत पाठवून देऊ? ...पण कान घराकडे असतो म्हणजे कान तसा त्यांच्याजवळ असतो पण ते आमच्या घराकडचं सारं ऐकतात...हं...आता आलं ना लक्षात...तर काय करावं कळत नाही...नाही हो मधूलाही विचारलं...पण ती म्हणते पंढरपूरहून परत आल्यावर सांगेन...तुमचं आता काय म्हणणं... अण्णासाहेबांच्या कानाबाबत...जी नही, आप हुक्म फर्माइये हम फौरन उसकी तामील करेंगे जी नही अण्णासाहेब के कान काटनेमे कोई देरी नही होगी...(आनंद असाचं फोनमध्ये बोलत आहे.)

**अण्णासाहेब :** बिचाऱ्या आनंदरावांचं काय झालं हो हे! इतका हुशार माणूस त्याचं हे असं व्हावं! आम्हाला खूप वाईट वाटतं बघा.

**डॉक्टर :** ते असू द्या. पण कृपा करून तुम्ही इथून जा आता.

**अण्णासाहेब :** आमचं काय. आम्ही चाललो. फक्त खात्री करून घ्यायला आलो होतो.

**डॉक्टर :** कशाबद्दल?

**अण्णासाहेब :** भाऊसाहेबांशी पैज लावलीय मी. आनंदराव वेडे होणार म्हणून, झालेच ना शेवटी वेडे? काय हो हे आता बरे होणार का? पहा हो, कुलकर्णी वतनदारांचा पोरगा एकुलता. आता तरी बाप गेला तरी पैशा अडक्याची काही कमी नाही म्हणा. उत्पन्न भरपूर बघा गावाकडचं. पण पोराचं हे असं झालं ते बघून त्याच्या बापाचा आत्मा स्वर्गात तळमळत असेल हो! पण काय हो, हे आता बरे होणार का?

**डॉक्टर :** तुमची काय इच्छा आहे? की त्याबद्दल दुसरी पैज लावायची आहे?

**अण्णासाहेब :** हचॅं...हचॅं...छे हो म्हणजे आम्ही कोण हो इच्छा करणारे! हॅं: हॅं: म्हणजे आमच्या इच्छेनं काय होणार?

**डॉक्टर :** तर मग तावडतोब इथून चालते व्हा!

**अण्णासाहेब** जातो...जातो...एवढे जोरात कशाला सांगायला हवं? (जाताजाता पुटपुटतो) हं: वेड्यांचा डॉक्टर म्हणजे म्हणजे हाही वेडाच झाला की काय? (दिनू आणि मंजिरी येतात.)

**डॉक्टर :** बरं का वैनी. आनंदरावांना मानसिक विश्रांतीची खूप गरज आहे. त्यांच्या समोर मधूचं नाव काढू नका. सतत विचार करणे आणि वैयक्तिक अपयशाचे धक्के यामुळे यांना हा मानसरोग जडलाय. बहुधा मॅनियाची केस दिसत्येय. आपल्या साऱ्या दुःखाचं मूळ आपली पत्नी आहे असं समजून तुम्हालाच मारण्याची सोयीस्कर कल्पना त्यांनी करून घेतलीय. आपल्या असमाधानाचं मूळ नाहीसं झालंय असं त्यांना वाटतेय. असू द्या तसंच ते. पण बोलताना खूप जपून बोलावं लागेल त्यांच्याशी. कोणताही क्षण धोक्याचा असू शकतो. त्यांच्या स्वतःसाठी ...किंवा इतरांसाठी. यांना आता सिडेटीव्हची गरज आहे. गार्डीनलच्या गोळ्या लिहून देतो मी. त्या आणाव्या लागतील. (गोळ्या लिहून देतात. जाऊ लागतात.) आणि हो मघाशी सांगितलेलं सारं लक्षात राहील ना? काळजी

करू नका, सारं ठीक होईल. अच्छा ! (जातात. काही क्षण अंधार. पुन्हा उजेड येतो तेव्हा आनंद स्वत:शी बडबडत बसलेला. दिनू येतो.)

**दिनू** आनंद

**आनंद :** अं ? कोण ? दिनू का ? ये ये बैस असा. केव्हा आलास ?

**दिनू :** आत्ताच.

**आनंद :** वाटलंच मला. कसं काय चाललंय तुझं ?

**दिनू :** ठीक आहे.

**आनंद :** माझ्याबद्दल फार काळजी करू नकोस तू. अरे हो बरं झालं आठवलं. मागच्या महिन्यात तुमच्या बँकेतले कर्वेसाहेब भेटले होते.

**दिनू :** अच्छा.

**आनंद :** काय म्हणाले माहिताय ?

**दिनू :** काय म्हणाले ते ?

**आनंद :** कोण ? (थोडा वेळ विचार करून) हां... हां... कर्वेसाहेब. तर कर्वेसाहेब म्हणाले की अलीकडं तुझं कामात फारसं लक्ष नाहीय. मागे म्हणे तीन हजाराच्या चेकचे साडेतीन हजार पेमेंट केलंस तू ? खरं का हे ? (दिनू काही बोलत नाही.) छे असं चालायचं नाही हं. बालपणीचा मित्र ना तू. म्हणून तुझ्यावर रागवायचाही अधिकार आहे म्हटलं मला. हो की नाही ?

**दिनू :** आहे ना.

**आनंद :** बरं आपला बबड्या कसा आहे ? त्याची काळजी घे हं नीट, मोठा गोड पोरगा आहे. त्याच्या शिक्षणासाठी पाच हजार मी काढून ठेवलेत त्याच्या नावानं ... पण बबड्या कधी आठवण काढतो की नाही आनंदकाकाची. भेटायला हवं एकदा. मधूचा मुलगा जिवंत असता (मंजिरी पाणी घेऊन येते. दिनू गोळ्याच्या बाटलीतून गोळ्या काढतो.)

**दिनू :** आनंद ह्या गोळ्या घे जरा.

**आनंद :** गोळ्या ? कसल्या गोळ्या ? बघू ... (दिनूच्या हातातून गोळ्या घेऊन पाहतो मग मंजिरीच्या हातातून पाणी घेऊन गोळ्या पाण्याबरोबर घेतो) दिनू तुला विश्रांतीची खूप गरज आहे. बँकेत कॅशियरचं काम करायचं म्हणजे, प्रकृती चांगली हवी. डोकं ताळ्यावर हवं (दिनूपुढे गोळ्या अचानक धरून) घे तूही गोळ्या घे या.

**दिनू :** छे, अरे तुझ्या आहेत त्या गोळ्या.

**आनंद** (हसून) गोळ्यावर फक्त कंपनीचं नाव असंत कुणी घ्यायच्या त्याचं नाव नसतं. घे तूही घे. (दिनू नकारार्थी मान डोलावतो. आनंद हुकमी आवाजात) घे म्हणतो ना (दिनू मुकाट्याने गोळ्या घेऊन खिशात ठेवू लागतो) माझ्यासमोर पाण्याबरोबर घे. (दिनू घेतो) हं छान (झापड येतेय आनंदला) असं वागावं...माणसानं श...हा...ण्या...मु..ला ...सा...र...खं... (असे पुटपुटत डोळे मिट-तात निळसर प्रकाश पसरतो. अंधार होतो पुन्हा प्रकाश येतो. दिनू गोळ्या देतो. आनंद गोळ्या घेतो. पुन्हा निळसर प्रकाश ... नंतर अंधार पुन्हा प्रकाश ... आनंद काल्पनिक शत्रूबरोबर तलवारीचे हात करीत आहे... पुन्हा सहा काळ्या आकृत्यांशी झगडत आहे. धडपडत आहे...सगळे जण त्याच्या वर धावून जातात ... आनंद किंचाळतो धडपडत त्यांच्या कोंडाळ्यातून बाहेर येतो. थकलेला. प्रकाश मंद–प्रखर असा होत शेवटी पूर्ण प्रकाश येतो. आनंद बसलेला हातात गोळ्यांची बाटली आहे. समोर VAT 69 ची बाटली आहे. बोलत बोलता एकेक गोळी त्यात टाकत आहे.

**आनंद :** गोळी एके गोळी, गोळी दुणे गोळी, गोळी त्रिक गोळी ! सकाळी गोळी, दुपारी गोळी' रात्री गोळी. गोळी कशासाठी जगण्यासाठी जगणं कशासाठी. भावनांशी, विकारांशी झगडण्यासाठी. परमेश्वरा साऱ्या माणसांना निर्विकार केलं असतं तर तुझ्या बापाचं काय गेलं असतं ? पण परमेश्वराला बाप आहे की नाही ? असू देत नसू देत आपल्याला त्याच्याशी कर्तव्य नाही. परमेश्वराला माणसांशी खेळण्याचा मोह आवरला नसावा म्हणून त्याने सहा विकारांचे युद्ध जुंपून दिलेय माणसांबरोबर किंवा माणसांनी त्याची आठवण म्हणून त्याला लोभ झाला असावा किंवा माणसांवर त्याचा क्रोध असावा, किंवा त्याच्या परमेश्वरपणाचा त्याला मद झाला असावा, किंवा माणसांचा

त्याला मत्सर वाटला असावा. म्हणून हे असं झालं. इथंच तर सगळी गोम आहे. मला कळलंय. हे सारं मधूला आणि तिच्या चिमुकल्या बाळाला सांगायला हवं. त्याच्या इवल्याशा कानात नाहीतर चंद्रभागेच्या वाळवंटात पुरलेला तो चिमुकला अभागी जीव तसाच गुदमरत राहील या जगण्यात...पोरा हे जगणं फार कुरूप असते रे फार कुरूप! लवाड हसतोय. त्याला वाटतंय आपला बाप वेडया-सारखा वरळतोय. नाही रे बेटा आता मी शहाणा झालोय. गोळ्या घेऊन जगण्यापेक्षा गोळ्या घेऊन मरणं खूप चांगलं रे! तू ही लक्षात ठेव हे. मी खूप दिवस झगडलोय या सान्यांशी. माणसांच्या या शत्रूंना हरवायचं म्हणजे एकच उपाय. हाराकिरी! हाराकिरी म्हणजे विजयी मरण. चिअर्स! लेडिज ॲन्ड जंटलमन नाऊ गुडबाय् (VAT 69 ची बाटली तोंडाला लावून पिऊन टाकतो.) ब्रेव्हो! आनंदा, आता तुझा विजय अटळ आहे. फोर्टी गार्डिनल्स प्लस वॅट सिक्स्टी नाईन इज इक्वल टू व्हिक्टरी! तो पहा एक एक पाऊल टाकत मृत्यू येतोय माझ्याकडे. त्याच्या हातात हार आहे माझ्या गळयात घालण्यासाठी. मेंदूत सुरुंग उडताहेत सुरुंग, एकेका गोळीचा एक सुरुंग. आता जीवनाचा ओबड धोबड खडक फुटेल आणि निर्मळ शितळ पाण्याचा जिवंत प्रवाह वाहू लागेल. जीवन म्हणजे मृत्यूच्या बांधाने बांधलेले, गढूळ सडलेले पाणी...आता हा बांध फुटणार आणि खळखळाट करीत पाण्याचा प्रवाह वाहू लागेल. विस्फोटाचे आवाज येताहेत. कुरूप, बीभत्स, अर्थहीन जीवन संपवून सुंदर मृत्यूचं स्वागत करणारे विस्फोट! अंधारवृक्ष कोलमडतोय...प्रकाशाचे झाड फुलतेय.. मोरपंखी मुलायम, मधूची बोटे सर्वांगावरून फिरताहेत...चिमुकल्या बाळाचा मऊ उबदार स्पर्श असतो तसा मरणस्पर्श अवर्णनीय आहे... जड मानवी शब्दांच्या शक्तीपलीकडचा. मंजिरीला भेटायचंय...तिची क्षमा मागायचीय. अंधार कोठडीसारखं जीवन होतं .येतोय सूर्याचा तललख, ताजा कवडसा...हलका होऊन सारा अंधार उडून जातोय आता.. हा विस्फोट...विस्फोट नाही. .हा तरंग आहे सतारीच्या तारांतून झंकारलेल्या स्वरांच्या गंधाचा...इंद्रधनुष्यातून परीचा नाजूक हात धरून तरंगत जावं तसं वाटतंय कुठे तरी जिवंत रक्ताचा खळबळाट ऐकू येतोय...अशरीरी संवेदनेला जाणवतेय मातेच्या गर्भाशयातील ऊबदार गादीच्या स्पर्शात तरंगत असावं तसं... वाटतेय...का. य. आहे...हे...क..ळ..त नाही ..सां..ग ता..ही..येत..नाही ये...णार...नाही...कळलं...तरी...

(हळूहळू अचेतन होत जातो.)

पडदा पडतो.

**चंद्रभूषण कुलश्रेष्ठ**
५ फॉरेस्ट, सोलापूर–४१३००१

# अनुत्तरित

आश्विनी धोंगडे

(हे एक समूह–नाट्य. स्त्री–समूहानं सादर केलेलं.)

उच्चभ्रू वर्गातील स्त्रियांपासून तो नाडलेल्या दलित स्त्रियांपर्यंतचा हा एक समूह असहाय्यता आणि पराभव यात घुसमटून, गुदमरून स्वत्त्व टिकविण्यासाठी धडपडणाऱ्या जिवांचं हे एक जिवंत नाट्य : यातील कोणतीही व्यक्ती 'कॅरॅक्टर' म्हणून महत्त्वाची नाही. ती केवळ एक समूहाची प्रतिनिधी म्हणून उभी राहते.

(हातात शृंखला अडकवल्याप्रमाणे परस्पर हात गुंतलेले व घाण्याला जोडलेल्या बैलाप्रमाणे संथ, थकिस्त पावले वृंदामध्ये 'अ' उभी. आजूबाजूला चार लहान समूह)

**अ :** लोक हो
तुमच्या न्यायालयात मी फिर्याद आणली आहे.
तुम्ही तरी मला न्याय द्याल का ?
स्वतःच्याच घरात निर्वासित असलेली मी
उपेक्षेची जन्मठेप भोगतेय जन्मोजन्मी.
माझा पिता, माझा भाऊ नि माझा पती
या गोंडस भारदस्त नात्याच्या भाराखाली
माझं पोकळ अस्तित्व दवलं जातंय.

**समूह :** दवलं जातंय,
दवलं जातंय, पावला पावलावर दवलं जातंय.

**ब :** माझा हक्क

**क :** माझं स्वातंत्र्य

**ड :** माझं मन ...

**ई :** माझं वेगळेपण

**अ :** सारं सारं कसं परतंत्र झालंय,
सारं सारं कसं दुरावलंय.

**ब :** माझ्याच घरात

**क :** माझ्याच समाजात

**ड :** माझ्याच देशात

**ई :** कुणीच नसलेली मी ...

**सर्व समूह :** मी कोण ? मी कोण ?

**अ :** मी कोण ? मला उत्तर हवंय
'मी कोण ?' याचं मला उत्तर हवंय.
(समूह अर्धवर्तुळाकार. स्त्रियांच्या विविध व्यवसायाचे दर्शन. उदा.–टायपिंग शिकवणे, भांडी घासणे, धुणी धुणे, दळणे, गवत तोडणे, शिवणकाम वगैरे मूक हालचाली.)

**फ :** (प्रत्येक व्यवसायगटातून फिरत)
माझ्या अंगा-वर झिरपतात
अपमानाच्या खोल जखमा.
आमची इज्जत लुटली जातीय
जातीयतेच्या धर्मांध व्यासपीठावर.
आमचं शील जळतंय
धर्मग्रंथांच्या पानापानावर.
हजारो द्रौपदींचे वस्त्रहरण होत असता
बंधूनो, भीष्म पांडवांसारखे फक्त
खाली माना घालून बसू नका.
हा पराजित इतिहास बदलण्यासाठी
आव्हान देणारे बलदंड हात मला हवे आहेत.

**समूह :** बलदंड हात मला हवे आहेत.
लोकहो, तुमच्या न्यायालयात मी फिर्याद आणली आहे.
मला न्याय हवा आहे.
(समूहाची रचना पोलीस ठाण्याच्या खोली-सारखी. सर्वांचे हात मागे ताठ–पोलिसांसारखे. फक्त 'ब' व 'ड' प्रेक्षकांसमोर–

ब : काही वर्षांपूर्वीची गोष्ट.
स्थळ एक पोलिसठाणे.
तेव्हा मंजुळा होती फक्त
एक चौदा, सोळा वर्षाची कोवळी पोर.
तिला ठाऊक नव्हते
या जगाचे अघोरी नीति–नियम.
तिला ठाऊक नव्हतं
कायद्याचे रक्षणकर्तेच असतात
कायद्याचे मारेकरी.
आणि आपलं शरीरच असतं आपलं
जन्मोजन्मीचं वैरी.

ड : ती अनाथ होती.
आपल्या भावाकडे मोलमजुरी करून रहात होती.
किशोर आणि मंजुळा
दोघांनी विवाहबद्ध व्हायचं ठरवलं.
२६ मार्च १९७२.
किशोरनं मंजुळेला पळवून नेल्याची फिर्याद
तिच्या भावानं नोंदवली.
मंजुळेला पोलीसठाण्यात बोलवण्यात आलं.
मंजुळा आली.

समूह : पोलीसठाण्याची दारं बंद;
दिवे बंद.

क : बाहेरचे लोक ?

ड : बाहेरचे लोक ?

समूह : त्यांची सुद्धा मने बंद; हातपाय थंड; मने बंद, हातपाय थंड.

क : (चिडून) एका अनाथ अबलेवर होत होता अमानुष बलात्कार आणि थंडपणे उभा होता बाहेरचा जनसमुदाय परकेपणानं पहात, सारं काही पहात निमूटपणे सहन करीत, सारं काही सहन करीत.

समूह : (रचना पुनश्च अर्धवर्तुळाकार चालीवर)
आमुच्या डोळ्यातील महापूर पाहून
तुम्ही पिटल्या टाळ्या आनंदानं
कुणाचीही नाही झाली
एवढी बेचिराख, केलीत आमुची मनं

फ : (पुढे येऊन) आकाशवाणी—आपल्याला बातम्या देत आहे. काल नाशिकमधील एका प्रतिष्ठित माध्यमिक शाळेत भर दुपारी शाळा चालू असता एका सुशिक्षित स्त्री शिक्षिकेवर अत्याचाराचा प्रयत्न झाला. भारतात अशा प्रकारचे गुन्हे वारंवार घडू लागल्याने पंत-प्रधानांनी आज संसदेत चिंता व्यक्त केली आहे.

समूह : (चालीवर) आम्ही, आम्ही जळतो आहोत
अमुच्या सुखदु:खांसहित
गुदमरतो आहोत,
धुराच्या सर्वव्यापी लोटात.....

ग : (पुढे येऊन) अहमदनगरके सरकारी रुग्णालय मे कल रात के समय कुछ गुंडोंने गुंडागर्दी की। खबर है कि वहाँ के स्त्री डॉक्टरों एवं परि-चारिकाओं पर उन्होंने अत्याचार किये। रुग्णालय की प्रमुख सिस्टर तरूलतापर होनेवाला अत्याचार देखते हुअे भी वहाँ के पुरुष कर्मचारी उनको कुछ भी सहाय्यता नही कर सके! हमारे दूरदर्शन के संवाददाताने बताया है की इस मामलेपर कडी जाँच की जा रही है।
आज के मुख्यसमाचार फिर एक बार.....

समूह : (चालीवर)
कशासाठी, कोणासाठी, किती आणि कुठवर
सोसायाचा ऐसा गाडा इमाने जन्मभर

**समूहाची अनेक समूहात आपापसात चर्चा—**
–अग ते वंदना गार्गीचं प्रकरण वाचलंस का ?
काय भयंकर आहे नाही ?
चक्क पोलिसांनी बलात्कार केला तिच्यावर
आणि ते देखील भरदिवसा–रस्त्यावर
ही बघ बातमी.
बालगंधर्व पुलाखाली एका शाळकरी मुलीवर सामूहिक बलात्कार
बलात्कार करणाऱ्यात सर्व समाजाच्या प्रतिष्ठित थरातले.
वरून पाचपन्नास लोक बघे म्हणून पहात उभे.
–पिप्रा, नारायणपूर, पारसबिघा, बिहार, सूरजपूर यादी वाढतेच आहे. कमाल आहे, कोणी काहीच कसे करत नाहीत ?

एक विक्रेता : संध्या वाचा संध्या.....सासऱ्याचा सुनेवर बलात्कार. पुण्यात घडलेली खळबळजनक घटना.

(समूहाचा कलकलाट एकदम शांत. समूह स्तब्ध)

**निवेदिका :** कोठेही जा, तेच आवाज,
त्याच बातम्या,
तेच व्यभिचार, भ्रष्टाचार, अत्याचार.
लेख प्रसिद्ध होताहेत,
कथा लिहल्या जाताहेत,
अशिक्षित आदिवासी स्त्रीपासून तो
शहरी सुशिक्षित नोकरदार स्त्रीपर्यंत,
झोपडपट्टीपासून अलिशान दिवाणखान्यांपर्यंत
ऐकू येतील एकच आवाज.
(समूहातून वेगवेगळे आवाज)—
हमे जिने दो !
आमाके मानुषेरमातेन जीवन देवो.
live and let live.
आम्हाला जगू द्या, माणसांसारखे.
अमणे जिव्वा दो, माणुसनीजेम.
(वरपर्यंत चढलेला आवाज एकदम शांत. समूह स्तब्ध)

**समूहातील एक :** होय, मला जगायचं आहे, माणसासारखं. या अंधार कोठडीत नव्हे, तुमच्यासारखं उजळ माथ्यानं. का? का हिरावून घेतला त्यानं माझा आनंद? काय हक्क होता त्याला वळजवरीनं माझं सर्वस्व लुटून नेण्याचा? अवघी पंधरा, सोळा वर्षांची होते मी त्यावेळी. कॉलेजच्या पहिल्या वर्षातली तरुणी. जन्मापासून आईविना पोरकी पोर. वावांनी तळहाताच्या फोडासारखी वाढवलेली. मोकळेपणानं हुंदडणारी, वागडणारी. परिकथेतल्या राजकुमाराची स्वप्नं पाहणारी. माझ्या छोटयाशा घरकुलाची चित्रं रंगवणारी. वावांचे मित्र म्हणून घरी येणारा तो—निर्लज्ज, जंगली जनावर—मी त्यांना काका म्हणायची. वावांसारखा आधार वाटायचा मला त्यांचा! वाटायचं, वावांची नोकरी फिरतीची. एवढया अफाट शहरात जवळचे वाटणारे फक्त काका. वावा नसताना निवान्याला जायचं ते फक्त काकांच्या! आणि एक दिवस—काका म्हणून जवळ घेणाऱ्या त्या लांडग्यानं माझा घात केला. माझं शील, माझं सर्वस्व जवरदस्तीनं लुटून नेलं. काय झालं—कसं झालं—काही काही कळलं नाही मला. मी शुद्धीवर आले आणि माझ्या शेजारी घोरत पडलेल्या त्या काकाचा मी गळा दावला—खरं सांगते—मी खून केला—मी खुनी आहे. वावा आले तेव्हा माझ्या हातात वेड्या होत्या: खटला चालला आणि मला शिक्षा झाली—सक्त मजुरीची—दया झाली माझ्यावर! मी तरुण—त्यातून मुलगी—म्हणून नाही फासावर चढवलं त्यांनी मला. जिवंत ठेवलं, हे शरीर. कशासाठी? कशासाठी हवंय हे शरीर मला? इथं, या अंधार कोठडीत रावण्यासाठी? किळस, किळस येते मला या शरीराची. वस्स,. पुन्हा शरीर. .

**समूह :** (गंभीरपणे, चालीवर)
करतं घात हे शरीर
करतं घात हे शरीर

**निवेदक :** मंजुळा, वंदना, मीना, नीला
कित्येक आल्या, कित्येक गेल्या
कोणाच्या क्षणभर सुखासाठी
कित्येक अवला बळी गेल्या
कोणाची तहान भागली.
कोणाची भूक भागली.
निष्कासितांचे डोळे लेवून
मुकी कोकरे बळी गेली.

**समूह :** कोकरांनाही जीव असतो.
—कोकरांनाही असते मन
—कोकरांनाही हवा असतो मोकळा वारा
—कोकरांनाही असतो त्यांचा कोवळा जीव प्यारा.

**ग :** विचारं कोकरू, कधी शेतात असतं, कधी तळच्यावर, कधी रानात एकाकी. कधी घरात अगदी स्वत:च्या. कधी ऑफिसात, कधी कुठे, तर कधी कुठे. त्याला ठाऊक नसतं असं मोकळ एकाकी आयुष्य आपल्यासाठी नसतं—आपल्या सुरक्षितेसाठी उभारलेलं कुंपणच आपलं आयुष्य खायला असं आ वासून उभं असतं. छोटचाशा खोपटाचं मातीचं कूड असो नाहीतर एअर कण्डिशण्ड इमारतीतली पेन्टेड वॉल. ह्या सुरक्षिततेच्या भिंतीच वखवखलेल्या दातानं चालून येतात

अशा अंगावर आणि फडशा पाडतात, त्या बिचाऱ्या कोकराचा, एका घासात. बिचारं कोकरू...हजारो वर्षं भस्मसात होण्याचा हाच शाप घेऊन फिरतंय तुमच्या आमच्यातून– तुमच्या आमच्यातून.

**समूह** : (मुतकी चेहऱ्याने खाली माना घालून वसला आहे.)
मुकी कोकरे बळी गेली..
मुकी कोकरे बळी गेली.
(काही सेकंद संपूर्ण शांतता. मग समूहातील एकेक जण वर मान करत.)
–आवाज उठवायला हवा.
–आवाज उठवायला हवा.
–आवाज उठवायला हवा.
(समूह आता खेडेगावातील वायका. दोघी तिघी पत्रकार)

**पत्रकार १** : प्रिय भगिनींनो, तुमच्या गावात आजवर इतके अत्याचार आणि बलात्कार झाले. इतक्याजणींचा बळी पडला. आज तुमचं जीवन असुरक्षित आहे.

**पत्रकार २** : आम्ही शहरात सुरू केलेल्या स्त्री मुक्तीच्या चळवळीविषयी आपण ऐकले असेलच. स्त्रीला सुद्धा मन आहे. तिच्यावरचे अन्याय म्हणजे स्त्रीच्या आत्म्याला केलेला दंश आहे. स्त्रीची अस्मिता, तिची प्रतिष्ठा ह्याना वाचा फोडण्यासाठी आज स्त्रियांच्या भरभक्कम अशा एकजुटीची राष्ट्राला गरज आहे.
(सर्वांचे चेहरे काही न कळल्यासारखे)

**खेडुत १** : बाई, काय बी कळलं नाय, जरा आमच्या भाषत बोला की.

**पत्रकार २** (चिडून) कमालच आहे, काय अडाणी वायका आहेत, मी काय इंग्रजीतून बोलतेय.

**पत्रकार ३** : अग थांब, रागावू नकोस. मी सांगते त्यांना समजावून. हे बघा बायांनो, ही तुमच्या गावातली एक बाई, हिराबाई नांदे, पेपरात तिचा फोटो आला आहे. तुम्हाला माहितीय ही बाई ?

**खेडूत स्त्रिया** : अवं आमच्या बरुवर यायची ना ती गवत तोडायला. आता माझी तर शेजारीच व्हती कीवं ती. पोटुशी होती बघा चार महिन्याची. बया काय झालं असलं रं देवा हिरावाईचं...

**पत्रकार ३** : बाई तुमचं नाव काय ?

**खेडुत** : कमलवाय

**पत्रकार ३** : हिरावाईला तुम्ही ओळखता ?

**कमलाबाई** : व्हयं जी.

**पत्रकार ३** : संध्याकाळच्या वेळी गावातली दोन चार मंडळी हिरावाईच्या घरात शिरली माहीत होतं तुम्हाला ?
(ती गप्प)
तुम्ही ओळखता त्या माणसांना ?
(उत्तर नाही.)
का हो कमलाबाई, हिरावाई तर तशी चांगल्या चालीची वाई होती म्हणतात.
(उत्तर नाही.)
तुम्ही सगळ्या अशा गप्प का ? तुम्ही कोणीच पाहिलं नाहीत तिच्या घरी कोण शिरलं ते ?

**पत्रकार २** : आणि जेव्हा ती घरातून ओरडू लागली तेव्हा तर म्हणे तुम्ही सगळ्या बाहेरच जमला होतात. तुम्ही कोणीच गेला नाहीत तिच्या मदतीला ?
–(उत्तर नाही.)

**पत्रकार १** : बघा तुम्हीच अशा गप्प वसलात तर– म्हणजे त्या बिचाऱ्या हिरावाईचा प्राण गेला. तिच्यासाठी कोणीच नाही, काही करायचं ? तुम्हाला काहीच का वाटत नाही तिच्यावद्दल ?

**खेडुत १** : त्ये समंद खरं वाई, पर बोलनार कोन ?

**पत्रकार ३** का ग ? तुम्हाला कोणाची भिती वाटते ?

**खेडुत २** : वाई, आमी काई सांगितलं तर उद्या आमचं बी मुडदं पडत्याल.

**पत्रकार १** : बायांनो ही काही मोगलाई नाही. आपलं सगळ्याचं मिळून हे स्वतंत्र राष्ट्र आहे. शिवाय पोलीसही तुमच्या मदतीला आहेत.

**कमलाबाई** : पोलिसाचं काय बी सांगू नका वाई. तुमाला ठावं नाय. हिरावाईचा मुडदा कोनी पाडला त्ये पोलिसांला बी चांगलं ठाव हाय. पर एकाची बी टाप नाई खरं नाव घ्यायाची.

पत्रकार २ : हे बघा, पण तुम्हीच अशा गप्प बसलात तर दिवसेंदिवस ह्या गोष्टी वाढतच जातील.

खेडुत : आपल्याला लई भ्या वाटतं वाई, पर आपुन काय कोनाचं नाव घेणार नाई.

पत्रकार ३ : ठीक आहे. तुम्ही आम्हाला नावं सांगितली नाहीत तरी चालेल, पण आम्ही ठरवलं की तुमच्यावरील अत्याचारांविरोधी एक निवारण समिती काढायची आणि या समितीनं इथं झालेल्या अन्यायाविरुद्ध लढा द्यायचा.

खेडुत १ : आमावानी बायका काय लडनार ? त्ये मोठ्या मानसाचं काम हाय.

पत्रकार २ : तुम्ही वायका झालात म्हणून काय झालं. तुम्ही ही पुरूषांच्या बरोबरीनं शेतात काम करता, गवत काढता, पेरणी करता, पुरूषांच्या बरोबरीनं पैसे मिळवता. तुमच्यासारख्या स्त्रियांवर अत्याचार झाले तर तुम्हीच त्याच्याविरुद्ध उभं रहायला हवं.

पत्रकार ३ : आम्ही सर्व पत्रकार आहोत. हिरावाईवरचा बलात्कार आणि नंतर तिचा झालेला मृत्यु हे आम्हीच वर्तमानपत्रात छापून आणलंय .तुमच्यासाठी आम्ही मंत्र्यांना भेटू, मोठ्या सभा बोलावू, हे प्रकरण कोर्टात देखील नेऊ, पण आधी तुमची संघटना हवी.

समूह : (पुन्हा अर्धवर्तुळाकार)
इथं कुणी गायची नाहीत गाणी
शरीराची केवळ निगराणी
फुलण्याआधीच संपते.
कित्येकांची जन्म कहाणी . . .
(समूह दोन वेगवेगळ्या गटात विभागलेला. हे दोन शहरातील सुशिक्षित समूह.)

समूह : १ (गोलाकार) त्यातील १ जण (दुसरा समूह–परिसंवादाचे मूक दृष्य चालू )
मंजुळेसारख्या अनाथ मुलीवर बलात्कार झाला. ही घटना काही फार नवीन नव्हे. चावडीपासून कोर्टापर्यंत न पोचलेले कितीतरी बलात्कार आजवर स्त्रियांना त्यांच्या आयुष्यातून उठवून गेले असतील. पण ही घटना काही अपप्रवृत्तींची प्रतिनिधी म्हणून विशेष लक्षवेधी ठरते. नुसते कायदे बदलून समाजाचा दृष्टिकोन बदलणार नाही. स्त्री म्हणजे केवळ उपभोगण्याची वस्तू आहे ही सनातन वृत्ती बदलली पाहिजे.

(आवाजाविना भाषण व चर्चा पुढे चालू राहते.)

(याच वेळी दुसऱ्या परिसंवादाचा समारोप)

–तेव्हा भगिनींनो, आजच्या ह्या बलात्कार विरोधी परिषदेने खालील ठराव सर्वानुमते समंत केले आहेत असे मी जाहीर करते.

ठराव (१) : सध्याच्या बलात्कारविषयक कायद्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे.

(२) बलात्कार प्रकरणात स्त्री न्यायाधिशांना विशेष अधिकार असावेत अगर ह्या प्रकरणांची चौकशी गुप्तपणे व्हावी.

(३) गुन्हेगारांना दहशत बसेल अशी कडक शिक्षा देण्यात यावी.

(पुन्हा पहिला समूह समारोप करताना)

तेव्हा भगिनींनो, मंजुळा प्रकरणी सुप्रीम कोर्टाचा निकाल मंजुळेच्याच बाजूने लागेल अशी मला आशा वाटते. मंजुळा प्रकरणातील आरोपींना शिक्षा होणं, आणि मंजुळेला न्याय मिळणं हा एकट्या तिचा विजय नसून साऱ्या स्त्री जातीचा गौरव आहे.

(दृश्य–– न्यायालय. समूहातीलच एक न्यायाधीश.)

न्यायाधीश : सेशन कोर्ट व हायकोर्ट येथे मंजुळा प्रकरणी झालेली सर्व चौकशी निर्णय देताना या कोर्टाने लक्षात घेतली आहे. तथापि ह्या न्यायालयाने खालच्या कोर्टाचा निर्णय अवैध ठरविला आहे. ज्या अर्थी हे दोन 'सद्‌गृहस्थ' मंजुळेला अपरिचित असूनही तिने प्रतिकार केला नाही, त्याअर्थी तिची ह्या प्रकरणाला संमती होती असे या कोर्टाला वाटते. वरील सर्व साक्षीपुराव्यांची छाननी करून हे कोर्ट असा निर्णय देते की भास्कर व रंगराव हे दोन्ही पोलीस निर्दोष आहेत व कोर्ट त्यांची मुक्तता करीत आहे.

(सर्व समूह अतिशय संतापलेला, रागाने शब्द बाहेर फुटत नाहीत. समूहाचे रूपांतर मोर्चात)

—मंजुळाप्रकरणी फेरतपासणी झालीच पाहिजे.
—न्यायालयाने आपला निर्णय बदललाच पाहिजे.
—नारी की प्रतिष्ठा, देश की प्रतिष्ठा.
—हम जले तो देश जलेगा.
—मंजुळाप्रकरणी निर्दोष सुटलेले आरोपी फासावर लटकलेच पाहिजेत.

(पुन्हा न्यायालय.)

**न्यायाधीश :** मंजुळा प्रकरणी न्यायालयाने एकदा दिलेला निर्णय कोणत्याही कारणास्तव बदलला जाणार नाही. कोणत्याही महिला संघटनेला सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची फेरतपासणी करण्यासाठी अर्ज करण्याचा कायदेशीर अधिकार नाही. विशेषत: महिला संघटनांनी मोर्चे निदर्शने वगैरे मार्गांनी जे आंदोलन उभे केले तो न्यायालयावर दडपण आणण्याचाच एक प्रकार असल्याने, तो कधीही सहन केला जाणार नाही. महिला संघटनांनी न्यायालयाचा निर्णय अशा प्रकारे रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न केल्याने ह्या महिला संघटनांचा हे न्यायालय धिक्कार करीत आहे.

(समूह अपमानित. समूहातील एकेकजण)

१. न्यायालयानेच पाठ फिरवल्यावर ही माझी फिर्याद मी कोणाकडे नेऊ ?
२. ही माझी फिर्याद न्यायालयावर नाहीच.
३. अत्याचार करणाऱ्या वासनासूरांवर नाहीच.
४. ही माझी फिर्याद आहे, आपल्या कर्मठ संस्कृतीवर
५. जिने आम्हाला बंद कोठडीत कैद केले.
६. जिने आम्हाला वहिष्कृत आयुष्याचे दान दिले.
७. जियला वारा आम्हाला परक्यासारखा वागवतो.
८. जियल्या मातीत आमचं बीज अव्हेरलं जातं.
९. जियला पाऊस आम्हाला फक्त दुष्काळच देतो.
१०. जियलं पाणी आमच्याशी मृगजळाचा जीवघेणा खेळ खेळतं.
११. आणि जियलं चांदणं आम्हाला अग्निवन होतं.

(समूहाची प्रेक्षकांकडे पाठ)

**समूह :** हे जहर मिसळलेलं अशुद्ध जीवन आम्ही नाकारीत आहोत; त्रिवार नाकारीत आहोत.

(समूहातील एकजण बाहेर येत. त्वेषाने.)

अपमानाची भीक झोळीत टाकणाऱ्या,
त्या अभद्र भूतकाळाला,
ह्या पेटलेल्या वर्तमानाचा सुरुंग लावा.
जळून जाऊ द्या ती शतकांचं दास्यत्व
पत्करणारी,
लाचार आगतिक मनं.
इथला प्रत्येक श्वास
कसा बेचैन आहे.
इथल्या प्रत्येक प्रकाश किरणाला
अंधाराचा शाप आहे.
हे आकाशसुद्धा फितूर आहे.
त्या काळचाकुट्ट ढगांना
ही धरतीसुद्धा सामील आहे.
पूर्व नियोजित कारस्थानांना,
या तापलेल्या रक्ताची शपथ घाला.
आणि सांगा
"जुल्मी राजवटींना सुद्धा भयानक शेवट असतो
मातीत मिसळण्याचा नि फासावर लटकण्याचा"

□ □

**आश्विनी धोंगडे**
झाला फ्लॅटस्, कर्वे रोड, कोथरूड, पुणे ४११०२९

(या एकांकिकेमध्ये हिरा बनसोडे यांची 'फिर्याद' ही कविता व अन्य काही कवींच्या काव्यपंक्ती यांचा उपयोग केला आहे.)

# प्रश्न आणि उत्तर

पद्माकर बेळगांवकर

(एक ओका–वोका रंगमंच–अर्ध्या भागावर खूपसा प्रकाश तर अर्ध्या भागावर धूसर अंधार–क्षणभरात धूसर भागातून एक व्यक्ती यावी. तिची एंट्री, ती स्वत:भोवती गोल फिरत व्हावी–या लेखनातली ती 'प्रश्न' ही व्यक्तिरेखा आहे. ती धूसर भागात थांवते व तो भाग प्रकाशमय होतो. प्रश्नाचा एक हात सरळ वर व दुसरा कमरेपासून लांब तो सरकवतो आणि बोलायला सुरवात करतो.)

**प्रश्न :** मी प्रश्न आहे–फक्त प्रश्न–म्हणजे ते मीच निर्माण करतो–सर्वांपुढे–सर्वांमुळे–किंवहुना ते निर्माण करण्यासाठीच माझी निर्मिती आहे. (वरचा हात खाली–खालचा पण नीट–अगदी नॉर्मल व्यक्तीसारखा) मला वरती शेंडी सारखी गांठ आहे. त्या गांठीच्या गोलात–म्हणजेच त्या चक्रव्यूहात मी सगळ्यांना डांबून ठेवतो. मला खाली बूड नाही. पण मी तसा हुषार आहे. लोहचुंवकाचा एक टिंव खाली ठेवून मी त्याच्यावर माझा वॅलेन्स ठेवून उभा आहे.

(तेव्हडयात दुसऱ्या वाजूने प्रश्नाने एंट्री घेतली –त्याचप्रमाणे दुसरी व्यक्ती येते–ही या लेखनांतील "उत्तर" ही व्यक्ती रेखा आहे.)

**उत्तर :** मी प्रश्नाचं उत्तर आहे. मला नेहमी इनव्हर्टेड कॉमात राहावं लागतं. कारण ते उत्तर "वरोवरच" आहे–याची खात्री या प्रश्नाला व्हावी लागते. आणि वरोवरच आहे की, नाही तर ते चुकीचं असेल असं या प्रश्नाला वाटेल ना! किंवा मी तरी काय ??? – टांगलेल्या प्रेतासारखा लोंवकळतच राहीन.

**प्रश्न :** प्रश्न? प्रश्न? प्रश्न?—मी जगातून उत्तरांची जागा पुसून टाकणार आहे (डोळ्यांत खूपसा राग)

**उत्तर :** (शांतपणे) मी तसं होऊ देणार नाही. उत्तरांच्या ओळींनी मी फळा इतका लिहून काढीन की, प्रश्नांना तिथं जागाच उरणार नाही.

**प्रश्न :** (कुत्सित हसतो) शक्य नाही ते–प्रश्नांना जागा नसते तेव्हा ते अदृश्यपणे वावरत असतात.

**उत्तर :** (थोडयाशा रागानं) उत्तरांच्या प्रकाशानं मी त्यांचं अदृश्यपण हुडकून काढीन.

**प्रश्न :** माणसं प्रेम का करतात ?

**उत्तर :** त्यांना काहीकाळ जगायचं असतं म्हणून–

**प्रश्न :** ते का जगतात ?

**उत्तर :** त्यांना मरायचं नसतं म्हणून. (प्रश्न गप्प झालाय क्षणभर) बघितलंत, उत्तरं चटचट दिलीत की, प्रश्नालाही प्रश्न पडतो (थोडा मध्यावर येतो)

**प्रश्न** (जागा चेंज करतो) खोटया उत्तरांनी प्रश्न कधी फसत नसतात.

**उत्तर :** वघितलंत, मी उत्तरं दिलीत पण त्याला "इनव्हर्टेड" कॉमा नव्हता. मी–उत्तर–लोंवकळतच राहिलो. आणि त्याला मात्र शंका घ्यायला जागा झाली.

**प्रश्न :** मुलांना शाळेत पास करवून घेण्यासाठी, मुलांनी खोटी उत्तरं दिली तरी चालतात–पण मी तसा फसणारा नाही. तुझ्यासारख्याच एका उत्तराची मी कशी भंबेरी उडवतो वघ.

(उत्तर जागा सोडतो व रस्त्याने येण्याऱ्या माणसासारखा चालत येतो–प्रश्नही जागा सोडतो–जणू काही एखादा परिचित इसम–पाठीवर थाप मारतो उत्तराच्या)

प्रश्न : काय मिस्टर, किती झाला पगार ?

उत्तर : (गोंधळतो) अं......अं ?

प्रश्न : मला 'उत्तर' खरं हवंय.

उत्तर : (पटकन्) १२५ रुपये ९० पैसे.

प्रश्न : यात, तुझं कसं काय भागणार रे ?

उत्तर : मग भागवावंच लागणार–

प्रश्न : हां, हे तुझं उत्तर, जरा डेफीनेट जरी मला वाटलं नाही तरी सुद्धा मला चालण्यासारखं आहे.

उत्तर : मग काय करणार ? तसा पगार ६२५ रु. पण पाकीटात मात्र १२५ रु. ९० पैसे.

प्रश्न : का ?

उत्तर : अहो, आता काय सांगायचं–
फेस्टिव्हल अॅडव्हान्स्–
सोसायटी अॅडव्हान्स्–
विमा पॉलिसी–
जी. पी. एफ. कपात–
सायकल अॅडव्हान्स्–

(हळूंच) सायकल न घेता मिसेसची तिसरी डिलिव्हरी भागवली—

प्रश्न : तरीही तुमचं एवढ्याशा पगारात भागणार ?

उत्तर : तो सिंधी आहे ना—नाक्यावरचा—तो देतो मला—दहा टक्क्यानं—त्याच्याकडून दोनशे घ्यायचे—

प्रश्न : मागचे द्यायचे आहेत ना पण–

उत्तर : हो, मागचे शंभर द्यायचे आहेत–ते द्यायचे आणि शंभरला हात पसरायचा–

प्रश्न : तरीही भागणार नाही.

उत्तर : (बेफिकिरीनं) अं...एखादा दागिना ठेवून द्यायचा–पुढच्या महिन्यात मी फंडाच्या कर्जाला ड्यू आहे. तेव्हा सोडवून घेऊ.

प्रश्न : कुठला दागिना ठेवणार आहेस तू ?

उत्तर : ठेवू कुठला तरी–

प्रश्न : (जणू त्याला खिजवतोय–जागा वदलतो–त्याला एका एका अँगलमधून बघतोय) कुठला दागिना ?

उत्तर : (भेसूर प्रश्नांकित)...अं...

प्रश्न : (जरब देऊन) कुठला दागिना ?

उत्तर : (कनफ्यूज झालाय) अं...

प्रश्न : (थोडासा ओरडून) कुठला दागिना ?

उत्तर : (रडकुंडीला आलाय–एकदम ओरडतो) मंगळसूत्र !!! (तोंड झाकून रडतोय – क्षणात दोघांचेही मूड चेंज–प्रश्न निघून जातो – चेंज होऊन पुन्हा येतो.)

प्रश्न : स्त्रीचं सौभाग्य लेणं–ते सुद्धा तुला पुरत नाही. तू जिवंत आहेस, ही पत्नीजवळची खूण सुद्धा तू बाजारात गहाण टाकतोस प्रश्न ! प्रश्न !! आणि प्रश्न !!!

उत्तर : (आवाज पडलेला) उत्तर ! उत्तर !!! आणि उत्तर !!! प्रश्न ?

प्रश्न : मी निर्माण करीत जाईन.

उत्तर (पडलेल्या आवाजात) मी ते सोडवत जाईन (एकदम निश्चयी सुरात) मी ते सोडवत जाईन.

प्रश्न : कशाला मला डिवचतोस ?

उत्तर : मी कुठं डिवचतोय–तूच मला डिवचतोस. आणि मी करेक्ट आहे म्हटलं की चरफडतोस तू.

प्रश्न : माझं कामंच आहे ते–

उत्तर : चरफडणं ?

प्रश्न : चूप बैस ! मला प्रश्न विचारू नकोस–माझी जागा घेतोस ? मरशील तरफडशील अशानं तू.

उत्तर : (घाबरून–गयावया करतो) नको, नको–मला मारू नकोस–मला जगायचं आहे–मला जगायचं आहे.

प्रश्न : (खुनशी हसतो) जगायचं आहे ना...! मग, माझं अस्तित्व पुसून टाकतोस ? मीच पुसलो गेलो तर तू निर्माण होणार नाहीस.

उत्तर : म्हणजे ?

श्न : दाखवतो आत्ताच.
(दोघेही जागा वदलतात–उत्तर हा चिंताग्रस्त असून, घरात फिरतोय)

प्रश्न : (एक साधारण ओळखीचा माणूस झालाय) मग,–केव्हा करतोस मुलीचं लग्न ?

उत्तर : (एकदम चमकून) अं ! हो. करायचं ना ! म्हणजे यंदा व्हावं असं वाटतं !

प्रश्न : पैसे आहेत का...???

उत्तर : अं    !!!
प्रश्न : लग्नाला...?
उत्तर : अं.. !
प्रश्न : नाही म्हणजे प्लॉट घेतलाय ना...! त्याचे उरलेले पैसे द्यायचे आहेत.
उत्तर : मी करतोय त्यापेक्षा जास्त ओव्हरटाईम करीन फॅक्टरीत–.
प्रश्न : ते पैसे सुद्धा पुरे पडणार नाहीत.
उत्तर : हप्त्याने विकत घेतलेल्या वस्तूचे पैसे गोळा करण्याचं काम सांगून आलंय–ते करीन.
प्रश्न : मुलाचं शेवटचं वर्ष आहे कॉलेजचं – त्याचं काय ?
उत्तर : मी काय वाटेल ते करीन —
प्रश्न : (कुत्सित) वाटेल ते करून चालणार नाही. (एकदम निघून जातो–व पुन्हा प्रश्न होऊन येतो–तो येतांना एका अंधुकशा प्रकाशातून यावा) फक्त चालत राहावं लागेल. (उत्तर हळूहळू चालतोय–प्रश्न आणि उत्तर एकमेकांच्या जागा बदलतात–उत्तर थांबलाय) सारखं चालत राहावं लागेल. पाय दमेपर्यंत उरफुटेपर्यंत तुला चालत राहावं लागेल–तू थकशील–या संसाराचं ओझं डोक्यावर घेत चालत राहावं लागेल. तू थकशील. (उत्तर एकदम थकलाय. तो थकत थकत कुठंतरी सारखा चालतोय. या वेळी प्रकाश योजनेचा वापर व्हावा) आणि एक दिवस मान टाकून मरशील (उत्तर मान टाकून मेलेला माणूस दिसावा–क्षणात चेंज–अंधारात निघून जातो–एकदम प्रकाश–उत्तर उभा आहे.
प्रश्न : तू मेलास तरी हरकत नाही–पण मरेपर्यंत तू जगत राहिला पाहीजे–आणि, म्हणूनच तू जिवंत आहेस तो माझ्या अस्तित्वानं.
उत्तर : (रडकुंडीला आलाय) पण, तू मला असा छळण्यासाठीच जन्माला आला आहेस !!!
प्रश्न : अर्थात !
उत्तर : तू खूप निर्दय आहेस.
प्रश्न : असेन ..तसाही असेन.
उत्तर : जा ना तू या जगातून.
प्रश्न : असा वरा जाईन–जातांना, मी अनेक प्रश्न निर्माण करून जाईन. मग जगण्याचा अर्थच संपून जाईल आणि ज्या जगण्याचा अर्थ संपून जाईल तोच माझा प्रश्न राहील–जगाच्या अंतापर्यंत–कायम !
उत्तर : तू जगण्याचा अर्थही संपवू शकतोस ?
प्रश्न : होय, मी जगण्याचा अर्थही संपवू शकतो–! कुणाच्या नशेत मिसळलो, तर त्याला नशेनं बेभान करतो–कुणाच्या कुशीत शिरलो तर त्या प्रेमाच्या आशेनं बेभान करतो !!!
उत्तर : प्रेमाच्या आशेनं बेभान करतोस !!!
प्रश्न : नसतांना, त्याचे त्यालाच प्रश्न निर्माण करू देतो – आगीशी खेळायला लावतो–प्रेमाच्या आगीशी–आणि मग त्याच आगीच्या प्रश्नात तो स्वतःला जाळून घेतो–भस्म होतो–प्रेमाचा भस्मासूर डोक्यात घोळवून त्याचा हात त्याच्याच डोक्यावर ठेवायला लावून त्याला स्वतःलाच भस्म करायला भाग पाडतो. (मागे मागे जाऊ लागतो–एक जागा घेतो–उत्तर नॉर्मल–तो आता एक कॉलेजकुमार आहे–बागेत प्रेयसीची वाट पाहातोय–आतुरतेने ती आली आहे–प्रत्यक्षात ती रंगमंचावर आलेली नाही पण तिचं अस्तित्व उत्तराच्या अभिनयानं दाखवण्यात यावं–)
उत्तर : ए, किती उशीर ग !  .काय म्हणालीस ? काल मी उशीरा आलो होतो म्हणून तू आज उशीरा आलीस होय ? म्हणजे, मी एखादी चूक केली–की तू सुद्धा ती करायचीस होय–उलट, नवरा बायको– (जीभ चावतो) सॉरी हं !–ए तू लाजतेस किती सुंदर–तुझ्या घरी बोलाव ना मला–सगळ्यांशी ओळख तरी होईल. .वरं, वरं, बाबा–आत्ता नाही, बस ! आपली परीक्षा झाल्यानंतर–(जणू ती एकदम जायला निघाली) हे काय, हे काय ! लगेच निघालीस.. ! ए, आपण, असं करू या त्या––हं त्या जाईच्या वेलीजवळ जाऊ या (हळुवारपणे तिला घेऊन जाईच्या वेलीजवळ बसतो. तिच्या खांद्यावर हात टाकलेत, एकमेकांच्या डोळ्यांतील खुणा एकमेकांना कळल्यांत, ओठांना ओठ भिडलेत, तृप्त झालाय, खूपसा सुगंध, आनंद, अणू रेणूत रिचवून घेतलाय.) ए. या जाईचा सुगंध हा अन् या जाईचा हा. तुझे डोळे मला खूप

आवडतात ग. या डोळ्यांवरून सारा जीव ओवाळून टाकावासा वाटतो. ( ती जायला निघाली.) निघालीस, उद्या याच वेळी... काय ?...उद्या नाही ? अग, क्लासला उशीर झाला म्हणून सांग ना ! ...वरं, वरं, पुढच्या गुरुवारी–वस् !

**प्रश्न :** असेच गुरुवार–वार–अशाच तारखा–असेच दिवस–अशाच रात्री–पौर्णिमेच्या–अमावस्येच्या (उत्तर जणूं बाकावर वसून पेपर सोडवतोय–प्रश्न सुपरवायझर आहे. उत्तर हा प्रश्नपत्रिका सोडवतोय–पेपर संपवून तो सुपरवाईझरच्या हातात देतोय–परीक्षा हॉलच्या बाहेर पडतोय.)

**प्रश्न :** (हळूहळू त्याच्या ओरिजनल जागेवर गेलाय) परीक्षा संपल्या–कॉलेज संपलं–तो वाट पाहतोय–ती आली नाही–तो वाट पहातोय–ती आली नाही. एक दिवस अचानक गर्दीत ती दिसली (तो प्रफुल्लित झालाय) पण तिच्या बरोबर कुणीतरी आहे. ती ओळख करून देते. तो बेचैन आहे (ती जायला निघते) ती ओळखसुद्धा पुसलेली ओळख.

**उत्तर :** मला, तुझ्याशी काही बोलायचं—

**प्रश्न :** आता तिला वेळ नाही–मग कधीतरी भेटेन–निघून गेली.

**उत्तर :** निघून गेली–कुणा बरोबर ?

**प्रश्न :** तो कावरावावरा झालाय–सुन्न झालाय–आणि एक दिवस ती अचानक पुन्हा दिसली–त्याला खूप आनंद झाला–पण क्षणापुरताच. तो पुन्हा तिच्या बरोबर होता. तिनं ओळख करून दिली. एक वेगळी ओळख, हे माझे मिस्टर–अचानक त्याचे हात जोडले गेले. हसावं लागलं. मन रडत असलं तरी सुद्धा–ती निघून गेली. पुन्हा कधीही न भेटण्यासाठी.

**उत्तर :** (एकदम ओरडतो) नाही ! नाही !! तो–ते डोळे–मला सोडून जाणार नाहीत.

**प्रश्न :** तिथंच तू फसलास. तू फसलास–आपण होऊन फसलास–अरे मोहानं फसलास तू, म्हणून तिनं तुला फसवलं.

**उत्तर :** पण, माझा गुन्हा काय ?

**प्रश्न :** प्रेम करण्याचा !

**उत्तर :** प्रेम करण्याचा गुन्हा असू शकतो ?

**प्रश्न :** होय प्रेम करण्याचा गुन्हा ! पण हा गुन्हा कोणत्याच पोलीस चौकीवर नोंदवला जात नाही, की त्याची केस कोणत्याच न्यायालयात चालत नाही.–तो फक्त जगाच्या बाजारात विकला जातो–आता तुला मरावं लागेल (उत्तर एकदम दचकतो) तुला वेडं व्हावं लागेल. (उत्तर वेड्याची ॲक्शन करतो) तुला मरावं लागेल (उत्तर डोळे ताठ ठेवून मेलेल्या माणसासारखा) पण तू मेलास तरी प्रश्न सुटणारा नाही. मी अनेक प्रश्न जगापुढं ठेवणारच–मी चिरंतन आहे–तुझा वारसा घेऊन असाच कुणीतरी तिला फसवणार आहे. मग ती कुणाला तरी–मग तो कुणाला तरी–सारे प्रश्न असेच ठेवून–कुणीतरी–उत्तरं शोधण्याच्या धडपडीत–आणखी प्रश्नांच्या ढिगाऱ्यात-प्रेम शोधणार आहे की जे कधीच सापडणार नाही. दिसणार नाही. फक्त, ते रेकॉर्डच्या तवकडीवर एक संगीत–गीत म्हणून वाजणार आहे (कुठून तरी–अजीब दास्ताँ तेरी, कहाँ शुरू कहां खतम्. ए मंझीले हैं कौनसी..हे गीत वाजतंय–उत्तर, ते भ्रमिष्टा-सारखा ऐकतोय–हंसतो, वेड्याची लहर आली तसा–क्षणात वेड्यासारखा रडतो. विस्फारलेल्या नजरेने बघतो. प्रश्न त्याच्या समोर येतो. त्याला झाकून टाकतो. उत्तर क्षणाक्षणाने मागे जातो–एकदम नाहीसा होतो. प्रश्न–उत्तर दोघेही एकदम् मूड चेंज करतात.)

**प्रश्न :** काय, कशी काय वाटली ट्रॅजेडी–मी अशाच शोकांतिका निर्माण करतो.

**उत्तर :** पण नको रे, तू हे असं नको करूस–माणसाच्या मनात, भावनेत, बुद्धीत, शरीरात निर्माण होणारे प्रश्न काय कमी असतात ? मग तू आणखी प्रश्न का निर्माण करतोस ? शोकांतिका ऐवजी सुखांतिका का निर्माण करीत नाही ?

**प्रश्न :** (कुत्सित हसतो) मूर्खा, सुखांच्या राशी जिथं पसरलेल्या असतात, त्या पलिकडे दुःखाचे झरे वाहात असतात–अखंड–अश्रूंच्या धारांनी–ते कधीच आटत नाहीत.

**उत्तर :** पण काहीही असलं तरी तू प्रश्न निर्माण करू नकोस रे.

**प्रश्न :** तो माझा धंदा आहे. छंद आहे. माझा आत्मा आहे. प्राण आहे. प्रश्न निर्माण करायचे–त्याची उत्तरं देण्यास भाग पाडायचं–ती देता देता–तू जगत राहिला पाहिजे–तू मरत राहिला पाहिजे मी चांगल्याला वाईट बनवतो. वाईटाला चांगलं–पण ते चांगुलपण, मला धार्जीणं नाही–बघतोस ?–बघच–

(दोघेही पोझिशन चेंज करतात. आता उत्तर एक सर्वसाधारण, भंगार माणूस–एका पडक्या घरात विडीचे झुरके घेत बसलाय–घरात कुणी-तरी मुलगी असल्याची जाणीव व्हावी–तो मटक्याच्या आकड्याची खबर ऐकण्यासाठी उत्सुक आहे.

**उत्तर :** ए, शिवड्या, काय आला रे ? . . . . काय पंजा ! (आनंदाने) आं, हा, . . . . पहा तीनशे–अठ्ठेचाळीस–हात तिच्या आयला, साला मेट्रोचा चान्स होता यार, – सालेने, एस. पी मारला (प्रश्न, शिवड्या होऊन रंगमंचावर आलाय) शिवड्या, चायला, साल्यानं एस. पी मारला यार,–खरं तर मेट्रोचा चान्स होता साला आज–

**प्रश्न :** (शिवड्या) जाऊ द्या मास्तर. अहो सुटे खेळून पैसा कमवून घ्यायचा–हा मटक्याचा खेळ सुट्यात कमाईचा असतो बघा.

**उत्तर :** (एकदम संभ्रमात) .सुटे. .हां, हां. खरं आहे यार–तू म्हणतोस ते खरं आहे. पण पैसे कमी मिळतात ना, म्हणून तर लोक जोड्यांच्या मागे लागतात (जणू काही खिडकीतून कोणी-तरी डोकावतोय) कोण रे . . . . ? . . . .

काय रे साल्या ...... (एकदम बातमी ऐकून शॉक) ... काय ?–छक्का आला, अरे पण पहिली आलेली खबर. . . . ? –रॉंग. . . . . (एकदम रडकुंडीला आलाय.) च्यायला, तेव्हढेच दोन रुपये होते रे–कालपासून उपाशी राहून, लावून ठेवले होते यार,–च्यायला क्लोजला लावायला पैसे पण नाही यार,–आयला शिवड्या, एखादा रुपया दे यार,–पाव मिसळ तरी खातो यार मी–काल पासून उपाशी आहे. (शिवड्या, म्हणजेच प्रश्न काहीही प्रतिसाद न देता एक तुच्छतेचा नकार दर्शवून निघून जातो. उत्तर जणू त्याच्या मागे मागे लागतोय. 'शिवड्या', 'शिवड्या' म्हणून तो निघून गेलाय) सुखात सगळे आपल्या बरोबर हसतात पण दु:खात कोणी आपल्या बरोबर रडत नाहीत. (आशाळभूतपणे सगळीकडे बघतो) फार भूक लागली आहे. (रस्त्यावरच्या गाडीवाल्याला उद्देशून) ए, भैया, यार एक रगडा दे यार, (खूप रडकुंडीला आलाय) अरे किसीका झुठा होगा-तोभी चलेगा यार–ओ शेट, एक पाव भजी–शेट तुमच्या पोराला मी फुकट शिकवणी करीन हो–मी त्याला कविता शिकवीन हो—कविता (हळूहळू भूतकाळात जातोय. एका वर्गातला मुलांचा गोंधळ ऐकायला येतो. कुठल्यातरी वर्गात पाढे मोजतात मुले–कुठे गणितं चाललीत असा आवाज. . .) मी शाळेत...कविता शिकवायचो मुलांना, छोट्या–छोट्या, चिमण्यांना–पाढे शिकवायचो–एक एकाचा-दोन दोनाचे .बे–एके बे,बे दुणे चार, –एक गुणिले एक नऊ एक गुणिले एक्यांशी–(एकदम संभ्रमात) अं . .नाही, नाही. काही तरी चुकतोय मी. . .काहीतरी-आठवणींचा गुंता कुठंतरी पिंजला जातोय–छे कसल्या आठवणी आणि कसलं काय ?– मनाचे खेळ सगळे-आता आपला खेळ म्हणजे एक रुपया लावला की, नऊ मिळतात. जोडी लागली तर एका रुपयाला एक्यांशी मिळतात. पण माझं गणित असं नव्हतं. मी असा शिकवत नव्हतो.

आठवणी–आठवणी. . .या आठवणींवर माणूस खरंच कधी तरी जगतो का ?-जीवघेण्या आठवणी–विसरणारे विसरतात. . .जणूं कांही घडलंच नाही असं वागतात (एकदम नॉर्मल) मी. . . .मी. . . .एक शिक्षक होतो. छोटंसच–माझं घर होतं. . .छोटासाच माझा संसार. . . तसा, ओढताणीचाच संसार–पण सुखात होतो –माणसाला सुखात सुख लाभत नाही. सुखाची लालसा चढत्याभाजणीच्या गणितासारखी चढत जाते–एका चौथीच्या विद्यार्थ्याला, स्कॉलर-शीपच्या परीक्षेला, मी सुपरवायझर असताना

... मी पेपर लिहून दिला--पालक श्रीमंत होते–पुढारी होते. पैशाच्या अमिषाला... सुखाच्या अभिलाषेला मी बळी पडलो...मी ते केलं ..अडकला गेलो. नोकरी गेली. जेल–शिक्षा–कारण मी गुन्हा कबूल केला.. आणि या जगाचा न्याय तोच आहे, जो गुन्हा कबूल करतो तो शिक्षेला पात्र ठरतो, जो नाकबूल करतो तो कायद्याच्या कसरती करून निर्दोष सुटतो. माझं घर..संसार...सारं सारं गेलं. उरलो, मी, बायको, आणि माझी एक चिमणी. बायको गेली...अहं...मेली नाही. ती–पळून गेली, कुणा बरोबर तरी. परी उडून गेली–चिमणी माझ्या घरट्यात सोडून गेली. माझ्या चिमणीचं मी सारं करायचो–तिला भरवायचो–तिला आंघोळ घालायचो–तिला कपडे घालायचो याच हातांनी–तिचं कौतुक डोळे भरून याच डोळ्यांनी बघायचो... आणि आज–आज, त्याच चिमणीला दुसऱ्यांसमोर कपडे काढायला मी भाग पाडतोय (रडतो)–(तुच्छतेने थुंकतो) थूं, तुझ्या जिण्यावर माणसा! अरे कसली उत्तर शोधतोस तूं (सार त्राण निघून गेलंय) आता मी जगतोय–वीतभर पोटाची खळगी भरतोय. उत्तर शोधायच्या भ्रमांत–प्रश्नांच्या गर्दीत–जगण्याच्या गर्तेत गाडला जातोय–उत्तर सापडलं तर प्रश्न उभा करतो, उत्तर किती हीन सांपडतात. (असं म्हणत मागे मागे जातो. जणू अंतर्धान पावतो.)

**प्रश्न :** (हळू हळू पुढे येतो–विहलनीश हंसतो) मूर्ख मानवा! तू फक्त उत्तरं शोधायचीस (उत्तर हळू हळू रंगमंचावर येतो) ती शोधतांना शोक करायचा! चरफडायचं! जगायचं! मरायचं! ...तक्रार करायची नाही.

**उत्तर** (दुःखावेगाने) पण कां ?

**उत्तर :** सगळं जग मला प्रश्नांकित करायचं आहे. उत्तरं शोधतांना मानवाची दमछाट करायची आहे. त्याची मान माझ्या प्रश्नरूपी गोलाकार साखळीत अडकवून ठेवायची आहे. (तो प्रश्नरूपी गोलाकार जणू काही उत्तराच्या मानेत अडकवला आहे–उत्तराला खूप यातना होतायेत.)

**प्रश्न :** मला फक्त प्रश्न निर्माण करायचे आहेत.

वुद्धीचा ओघ सत्याकडं
जाऊं द्यायचा नाही.
भावनेचा अविष्कार दयेकडं
न्यायचा नाही.
श्रमाचा कल शरीराकडे
जाऊ द्यायचा नाही.

म्हणून मी ॲथल्लो निर्माण करतो–मॅक्बेथ निर्माण करतो–हॅम्लेट, सुधाकर, सिन्धू, तळीराम, राम, रावण, सीता–निर्माण करतो–माझं अस्तित्व भरीव करतो–तुला निमित्त मात्र ठेवतो–बोल ? मी मेलो तर तू जिवंत राहशील ?

**उत्तर :** नाही, नाही तू मरूं नकोस–मला जिवंत ठेव. (एकदम सगळा अंधार व्हावा. प्रश्न हंसतोय उत्तर 'मला जिवंत ठेव, मला जिवंत ठेव' म्हणतोय.)

☐ ☐

**पद्माकर बेळगांवकर**
न्यू करन्सी नोट प्रेस,
जेल रोड, नासिक रोड

# चिता ओलीय...घासलेट आणा !

प्रकाश जोशी

[ प्रेतयात्रा निघाली आहे...एक जण मडकं धरून समोर चाललाय, त्याला आपण 'तो' म्हणूया.]

**सर्वजण** रघुपति राघव राजाराम अखेर याने म्हटले राम...दया करि रे हे घनःशाम याला नरकात घाल रे राम...

**तो :** कुठे आहे ते स्मशान ? अजून कशी वाट सापडत नाहीए. चालून चालून माझे पाय तुटायला आले आहेत...

**१ :** बोलू नकोस..मुकाटयानं चालायला लाग. तोंडातून रक्त पडायला लागलं तरी थांबायचं नाही .चालत रहायचं.

**तो :** नका...नका रे मला असं छळू. कोणी तरी हा अग्नी धराना. (मागे वळून पाहू लागतो)

**२, ३ :** ए भोसडीच्या..मागे वळून पहायचं नसतं प्रेत मागून येत असतांना...

**४ :** मुस्काड फोडीन पुनः मागे पाहिलंस तर.

**५ :** प्रेताच्या नेहमी पुढे बघायचं असतं.

**सर्व :** प्रेताला भूतकाळ नसतो...

**२ :** प्रेताला भविष्यकाळ नसतो.

**सर्व :** प्रेतं फक्त वर्तमानात जगत असतात.

**तो :** पण...पण प्रेताच्या मागे का पहायचं नाही ?

**सर्व :** तो जगाचा नियम आहे.

**तो :** कोणी केला हा नियम ?...

**सर्व :** जगानं...

**तो :** केव्हा केला ?

**सर्व :** माणसं मरायला लागली तेव्हा.

**तो :** पण याला कोणी विरोध का केला नाही ?

**सर्व :** (हसतात...तो पुनः विचारतो...पुनः हसतात एकदम स्तब्ध होऊन गंभीरपणे.)

कारण सगळी माणसं जिवंतपणीच मेली होती.

**तो :** का ? कशामुळे ?

**सर्व :** जन्मल्याबरोबर प्रत्येकानं आपापले निखारे मडक्यात काढून ठेवले होते.

**तो :** कोणी त्यांना तसं सांगितलं होतं ?

**२ शुः** बोलू नकोस...विचार बंदी आहे या भागात.

**सर्व :** आळी मिळी...गूपचिळी...शांतता बाईच्या अंगात खॉकी चोळी...खॉकी चोळीवर (भुलाबाईच्या गाण्याच्या तालात.)

**काही :** वटहुकुमांचं भूत

**सर्व :** वटहुकुमांच्या भूतावर

**काही :** सांडली लाचारी...

**सर्व :** माणसं विचारी चिरडली...चिरडली...

**तो :** अरे ए बाबांनो मला त्रास होतोय रे...हे मडकं आता हाती धरवत नाही रे.

**सर्व :** सहन कर...

**तो :** मडक्यातून निघणाऱ्या धुरानं माझ्या डोळयांची आग होतेय.

**सर्व :** सहन कर...

**तो :** अंगातल त्राण नाहीसं झालय...

**सर्व :** सहन कर.

**तो :** चालतांना, महागाईचे काटे पाय रक्तबंबाळ करीत आहेत.

**सर्व :** सहन कर.

**तो :** अरे पण हे सहन करता करता मडक्यातले निखारे विझताहेत.

**३ :** त्यावर रक्ताचे थेंब शिंपड...अग्नी चेतत राहिला पाहिजे.

**सर्व :** अग्नी चेतत राहिला पाहिजे.

**१ :** राष्ट्र कल्याणासाठी अग्नी चेतत राहिला पाहिजे..

२ : माणूस म्हणून जन्माला आला आहेस...ह्या अग्नीच्या प्रकाशात तुला आपला मार्ग धुंडाळायचा आहे.

तो : अरे पण या अग्नीनं माझ्यातली शक्तीच खाऊन टाकली आहे तर मी चालू कसा ?

३ : तुझीच नव्हे...आमच्या सगळ्यांच्यातली शक्ती त्या अग्नीनं जाळून टाकली आहे.

तो : अरे मग आपण चालतो आहोत कसे ?

४ : तळातल्या माणसाला रोटी, कपडा आणि मकान मिळेल यासाठी आपलं शासन प्रयत्नशील आहे.

२ : त्या आशेवर आम्ही चालत आहोत.

३ : आशा हे जगातलं सर्वात स्वस्त आणि मस्त, सर्व व्हिटॅमिन्सनी युक्त असं अन्न आहे.

५ : आजच विकत घ्या...लोकशाही सरकारनं खास जनतेसाठी निर्माण केलेलं.

४ : पचनास हलकं. किमतीत स्वस्त.

३ : एक वेळ विकत घेऊन बघा.

५ : लोकशाही छाप अन्न.

२ : किमत फक्त तुमचे एक मत...लोकल टॅक्सेस एक्स्ट्रा.

३ : या अन्नावर करोडो भारतवासी जगत आहेत.

२ : तुम्ही जगा...तुमच्या कुटुंबियांना जगवा.

तो : कारे...मला मिळेल का ती आशा ?

१ : तुला ती ऑलरेडी मिळाली आहे.

३ : एकदा मिळाली असताना पुनः पुनः मिळवितोस ?

२ : आशेचा स्टॉक करतोस काय ?

४ : अरे हा साठेबाज आहे...पकडा पकडा याला.

तो : तुम्ही मला पकडूच शकणार नाही.

सर्व : का म्हणून ?

तो : (दांडूका दाखवत) या दांडूक्याला विचारा...

२ : काय ? हा दंडूका बोलतो ?

३ : होय दंडूका स्वतः बोलतोही आणि इतरांना पण बोलायला लावतो.

४ : खरंच ?

तो : अगदी खरं...तुम्ही विचारा तर खरं...

सर्व : सांग ऽऽ सांग ऽऽ दंडूकनाथ...तुला भूक... लागेल का ?

(एकाचा पाठीत दंडूका बसतो तो...नंबर तीन कळवळून, खोट्या समाधानानं.)

तीन : छे...छे...भूक मला अजिबात लागत नाही... भूक लागली की पोटाची आतडी हातावर काढून रेशन कार्डाला महानैवेद्य दाखवितो.

सर्व : सांग...सांग दंडूकनाथ तुला रहायला घर आहे का ?

चार : हो ! हो...सेल्फ कंटेंड गटार आहे माझं... अगदी आनंदात राहतो मी...मला तर वाटतं सबंध हिंदुस्थानात आता घरांचा प्रॉब्लेमच नसावा.

सर्व : सांग सांग दंडूकनाथ...तुला घालायला कपडे आहेत का ?

दोन : भरपूर ! भरपूर कपडे आहेत मला...हा बघा व्हेंटीलेटर्स असलेला एअर कुल्ड शर्ट. ही बघा खिडक्या असलेली एअर कंडिशन्ड पॅन्ट...यात भरपूर सोय असते बघा...हवा सतत खेळत राहते...बाहेरची आत...कधी आतली बाहेर.

तो : अरे बाबांनो माझ्याकडे लक्ष द्या रे...कोणी तरी मला आशा आणून द्या ना...

एक : सांगितलं नं की तुला ती ऑलरेडी मिळाली आहे म्हणून...

तो : मला मिळाली ? कुठे ? कधी ?

दोन : आठव तो दिवस...ह्या आपल्या परंप्रिय भारत देशाला स्वातंत्र्य मिळालं होतं त्यादिवशी. सगळे देशवासी आनंदोत्सव साजरा करीत होते. त्या दिवशी. आठवतं...तू एका जुनाट, पडक्या खोलीत. विकलांग झालेल्या, मरायला टेक-लेल्या एका स्वातंत्र्य सैनिकाच्याजवळ बसला होतास.

[ इतर सर्व खाली ओणवे होऊन कॉट तयार करतात. त्यावर एक जण स्वातंत्र्य सैनिक बनून अखेरचा श्वास घेत आहे...तो त्याच्या जवळ उभा आहे. ]

स्वा. सैनिक : पोरा ! तुरुंगवासानं माझ्या शरीराला एक चमत्कारिक रोग जडलाय...मी काही आता जगत नाही...घटकाभरात मी मरणार.

तो : मग मी काय करू ?

सैनिक : फक्त माझी एक इच्छा पूर्ण कर.

तो : मरायला टेकलात तरी अजून इच्छा सुटत नाही.

सैनिक : शेवटची इच्छा आहे पोरा...

तो : सांग काय ते...

**सैनिक :** माझ्या प्रेताला फक्त अग्नी देऊन माझं क्रिया-कर्म कर.

**तो :** बोंबला ! इथे विष खायला पैसे नाहीत अन् तुमचं क्रियाकर्म कसलं करू डोंबलाचं.

**सैनिक :** कसं तरी कर रे बाळा...मेल्यावर माझी इस्टेट तुझीच आहे...

**तो :** (आनंदाने) काय तुमची इस्टेट मला मिळेल ?

**सैनिक :** होय सर्व इस्टेट तुला मिळेल.

**तो :** ठीक आहे...मरा मग.

(पुन: पूर्ववत होतात)

**एक :** तर ती इस्टेट तुला मिळाली आहे आणि म्हणूनच तू हे मडकं धरून चालला आहेस.

**दोन :** त्या मडक्यात तू निखारे घेतले आहेस.

**चार :** ते तुझ्या शरीरातले आहेत.

**पाच :** त्यांनी तू ह्या प्रेताला अग्नी देणार आहेस.

**३ :** मग तो अग्नी ह्या पापेश्वराची राख करणार आहे.

**तो :** ए ! बाबांनो मेलेल्या माणसाबद्दल असं बोला-यचं नसतं.

**४ :** मरत जगणाऱ्यांनो मेलेल्याबद्दल असंच बोलायचं असतं.

**५ :** असं बोललं म्हणजे ते यमाला ऐकू जातं.

**३ :** कारण माणूस मेला म्हणजे यमाचे कान उघडतात. ह्या माणसानं जिवन्तपणी काय काय केलं ते यमाला ऐकायचं असतं. आपण चांगलच बोलत राहिलो तर त्याला ते खरं वाटतं त्यामुळे त्याला काही शिक्षा न करता तो थेट स्वर्गात पाठवितो.

**तो :** आणि वाईट ऐकलं तर ?

**३** बघायचं आहे काय होतं ते ? चल बघ मग (यमाचा दरबार...एकजण रेडा होतो. त्यावर एक जण यम म्हणून बसतो...बाकीचे फेर धरतात.)

**सर्व :** कॅव ऽऽ कॅव ऽऽ घम घम रम...रम...रम
रेड्यावर बसला राजा यम...
यम यम यम...माणसा तू कम
काय काय केलंस ते सांग एकदम...
पापांची फेड इथे करायची तुला
फेडलेली पापं इथे कॅश करायची तुला
(एक येतो)

**एक :** राजाधिराज यमराजांचा जयजयकार असो...

**यम :** कोण आहे रे तिकडे ?

**एक :** महाराज मी आपल्या कचेरीतला कारकून आहे...

**यम :** काय काम आहे ?

**एक :** महाराज पृथ्वीवरचा एक जीव आला आहे.

**यम :** आण त्याला आत.

(घेऊन येतो)

**माणूस :** यमराजांचा जयजयकार असो. महाराज मी २८ मे १९७९ साली मृत्यू पावलो...

**यम :** काय म्हणतोस ? २८ मे १९७९ ? मग आजची तर २८ जून आहे, म्हणजे १ महिना तू होतास कुठे ?

**माणूस :** महाराज ! पृथ्वीभोवती भटकत होतो. माझी तेरवी कुणी करायची या बद्दल माझ्या मुलांत भांडणं सुरू झाली. तीं विकोपास गेली... मारामाऱ्या खुनापर्यंत मजल गेली त्यांची त्यातला एखादा येईलच तुमच्या दरबारात... माझं क्रिया कर्म केलं नाही तर कसं होणार ? या विवंचनेत मी होतो ... शेवटी माझ्या पत्नीनं स्वत:चे दागिने मोडून एका भटजी-करवी माझं सगळ व्यवस्थित पार पाडलं... म्हणून मला इथे यायला उशीर झाला.

**यम :** ठीक आहे. दिवाणजी ! लोक याच्याबद्दल काय बोलतात ?

**१ :** फार सज्जन माणूस होतो हो...

**२ :** कधी कुणाला दुखवलं नाही.

**३ :** एक वेळ उपाशी राहिला पण कुणासमोर हात पसरले नाहीत.

**४ :** उपास, तापास, नेम, धर्म सगळं काही व्यवस्थित पार पाडायचा हो !

**५ :** याचं ऑफीस म्हणजे पैशांची एक खाणावळच होती. .चपराशापासून तर साहेबापर्यंत सर्व-जण पैसेच खात असत...पण यानं एक पै देखील खाल्ली नाही.

**यम :** ठीक आहे दिवाणजी, याला गाढव योनी द्या.

**दिवाणजी :** महाराज तिकडे वेटिंग लिस्ट आहे.

**यम :** मग डुक्कर योनीत चान्स आहे का ?

**दिवाणजी :** होय महाराज तिकडे मिळू शकेल...

**यम :** अहो काय बोलता आहात ? परवाच्या तुमच्या-ऑडिट रिपोर्टमध्ये तुम्ही म्हणता की डुक्कर योनीत वर्षभर जागा नाही.

**दिवाणजी :** ते बरोबर आहे पण मोरादावादेत अनेक डुकरं मेली त्यामुळे

**यम :** ठीक आहे टाका याला डुक्कर योनीत

**दिवाणजी :** जशी आपली आज्ञा महाराज...याची कर्मभूमी कोणती ठेवू ?

**यम :** द्या टाकून महाराष्ट्रात.

**दिवाणजी :** पण महाराज ! तिथे आपण आधीच शिदोडं, अजगरं, बेडकं, सरडे, शेमड्या, साप हे थंड रक्ताचे प्राणी जन्माला घातले आहेत...

**यम :** मग असेना का...त्या लोकांची घाण उपसायला डुक्कर नको का ? द्या याला पाठवून.

**दिवाणजी :** जशी आज्ञा (त्याला) जारे तू महाराष्ट्रात (तो डुकरासारखं ओरडत निघून जातो.)

**यम :** चला नेक्स्ट !

**१ :** महाराजांचा जयजयकार असो ... महाराज मी मदनलाल...करोडोपती, डायबेटिस नं कालच दगावलो...

**यम :** दिवाणजी याच्याबद्दल लोक काय बोलतात ?

**२ :** अहो ! मदनलाल मेला...कळलं का ?

**३ :** मेला ! बरं झालं...पेढे वाटा...

**४ :** साला ... नंबर एकचा बदमाश, हरामखोर, भ्रष्टाचारी.

**२ :** त्यानं माझी तरुण पोरगी नासवली हो.

**३ :** अहो जबरदस्तीनं माझी १३ एकर शेती लाटली भडव्यानं.

**५ :** कित्येक खून पचवले आहेत त्यानं...

**यम :** ठीक आहे याला मुक्ती देऊन टाका.

**दिवाणजी :** महाराज ! एवढी पाप केल्यावर याला-मुक्ती कशी ?

**यम :** (हसतो) तुला ते कळायचं नाही ... याला मी कोणत्याही योनीत जन्म दिला तरी हा असाच वागणार ! चला...पुरे करा आजचं काम...

(पुनः पहिलं दृष्य)

**तो :** पण मला एक कळत नाही हे सर्व अधिकार यमाला कसे प्राप्त झाले ?

**२ :** तिथे पण एकाधिकारशाही सुरू आहे...

**३ :** अरे...ते बघा स्मशान आलं.

**तो :** अरे वा! वा! स्मशान आलं...आता माझं काम संपणार...याला एकदा अग्नी दिला की याची सगळी इस्टेट माझी होणार ... माझी बेकारी हटणार...मी आरामात बसून खाणार वा ! वा ! मेलेल्या माणसा...मरता मरता तू मला जिवन्त केलंस : थॅंक्यू व्हेरी मच डेड मॅन.

**३ :** हं...आलं स्मशान...ठेवा त्याला इथे ..(चिता रचतात...सर्व गंभीरपणे गुणगुणतात...) जीवनाची इतिश्री ... वर्षमहिन्यांचा संपलेला हिशेब...आत्म्याला निरोप द्यायचा इथं, अथांग अफाट काळोख्या महासागरात..लोटून द्यायचा एक फरफटत आणलेला क्षण !
स्मशान ! स्मशान !...स्मशान

**स्मशानवाला :** साहेब ! क्रिया कर्म नाही का करायचं ?

**१ :** नाही भडाग्नी द्या

**स्मशानवाला :** का बरं ?

**२ :** भटजी अॅव्हेलेबल नाही.

**३ :** एक गेला आहे सत्यनारायण सांगायला..एक लग्न लावायला...एक भूमिपूजनाला.. एक तेरवीचं जेवायला

**स्मशानवाला :** पण मेलेल्या माणसासाठी आधी यायला पाहिजे.

**१ :** अरे कशाला येतील ? इथे सगळा फुकटचा मामला आहे
(तो..एका कोपऱ्यात हटून उभा राहतो.)

**स्मशानवाला :** ठीक आहे चिता रचली...अग्नी कोण देणार ?

**एक :** अरे...तो मडकं धरणारा कुठे आहे ? बोलवा त्याला

**२ :** लवकर आटप म्हणावं

**३ :** चल लोकांना काम धंदे आहेत...हा तर मेला
(तो हट्ट धरून बसला आहे)

**४ :** (त्याला) उठ रे अग्नी दे...

**तो :** मी उठणार नाही...अग्नी देणार नाही.

३ : मग तुझ्या शिवाय हे कोण करणार ?
तो : मला माहिती नाही.
२ : अरे पण एकाएकी तुला असं झालय काय ?
तो : अटीप्रमाणे सगळं काही झालं पाहिजे.
१ : कसली अट ?
तो : त्यानं केलेलं मृत्यूपत्र वकिलांकडे आहे. वकिलांना घेऊन या..यानं माझ्यासाठी काय काय ठेवलय ते वाचून दाखवा. त्या शिवाय मी प्रेताला अग्नी द्यायचा नाही...
२ : जारे...कोणीतरी वकीलाला आणा...
३ : पण वकील सापडेल कुठे ?
४ : बार मध्ये
५ : बार मधला वकील ईथपर्यन्त कसा येईल ?
३ : अरे बार म्हणजे कोर्टातला बार..
२ : अच्छा अच्छा...आणतो मग..
१ : पुरंदरे...वकील...हाजीर है...
वकील : मी मोरोपंत गणेश पुरंदरे वकील मयत श्रीमंत केशव बुधाजी सोनटक्के यांनी तयार केलेलं मृत्यूपत्र सर्वासमक्ष वाचून दाखवितो. मी केशव बुधाजी सोनटक्के, वय ५३, धंदा बेकारी, राहणार खरडापूर तब्येत उत्तम असताना...मला दिसत व ऐकू येत असताना लिहून देतो की मी माझं जीवन ज्या आशेवर काढलं..ती सर्व आशा श्रीमान कमलाकर वळवंत धारप यांना माझी इस्टेट म्हणून देऊन टाकावी...
तो : (आनंदाने) काय ? एवढी इस्टेट मला एकट्याला मिळणार ? धन्य धन्य तो पुण्यात्मा
सर्व : मग पेटव चिता...पेटव...
तो : जरूर पेटवेन...चिता पेटवेन
(प्रयत्न करतो ती पेटत नाही)
२ : अरे पण चिता पेटतच नाही
स्मशानवाला : ती वली हाए साहेब.. घासलेट आणा..
सगळे : चिता ओली आहे घासलेट आणा
(आणतात...ओततात )
तो : इतकं घासलेट ओतलं तरी चिता पेटत नाही.
वकील : मित्रांनो ही आशेनं ओली झालेली चिता आहे. घासलेटानं पेटायची नाही तिला घासलेट हवय आशेचं
हा माणूस आशेवर जगला
आशेनं मेला...त्याच्या आत्म्याला
आशेच्या घासलेटानच मुक्त होवू द्या.
आज देशात अशा लाखो ओल्या चिता आहेत
त्यांना आशेच्याच घासलेटानी पेटू द्या
सगळे : चिता ओली आहे ..घासलेट आणा

□ □

( प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी अत्यावश्यक )

**प्रकाश जोशी**
पारिजात, उमरी
अकोला-४४४ ००५





अनुक्रमणिका

## कविता

### जेरबंद करून आणलेल्या दिवसांसाठी-

अनंत अमदाबादकर

जेरबंद करून आणलेल्या दिवसांसाठी
इतका उतावीळ होऊ नकोस. कारण--,
प्रत्येक गोष्टीला कारण देण्याची माझी पद्धत
तुला अश्लाघ्य वाटेल, पण
शोधाच्या वाटेवरील अमीट पावले समजून
तू त्याकडे दुर्लक्ष कर.
कारण पिंपळपानांच्या सळसळीला
वाऱ्याचे कारण देताना
माझ्या भुक्कडपणावर अनेकदा उखडूनही
मला परतवता आले नाहीत संध्याकालीन उन्हातले अश्रू
कारणं दिल्याशिवाय.
तर जेरबंद करून आणलेल्या दिवसांसाठी
गहाण टाकू नकोस कुठलेही वादळ
आवळआपट करीत येणाऱ्या ह्या भविष्यासाठी
हुरखू नकोस.
कारण ह्या कपटाची सूचना मिळण्यासाठी—
तू अजून नष्टतेच्या काठावर नाहीस.
हे मी तुला सांगतो कारण ते मला माहित आहे.
पुढच्या वाढदिवसाला कुठल्या पारिजातकाची
फांदी खुडावी तू
हे तुला माहित नसले तरी
पुढच्या पुण्यतिथीला तू कुठल्या गुलाबाची
डहाळी व्हावे
हे त्यांनी अगोदरच ठरविले आहे.
म्हणून जेरबंद करून आणलेल्या दिवसांसाठी
इतका उतावीळ होऊ नकोस
एक स्वप्न चिणून टाक निर्मम
आणि फिरून जागृतीसाठी मोकळा हो.

□

### महायात्रा

बबन चहांदे

ही महायात्रा कोणाची
चिमण्यांची, कावळयांची की गिधाडांची
मुंग्यांची, मुंगळयांची की माणसांची
की हिंस्र श्वापदांची
माझ्या मते ही सर्वांची
कोणी काळोखात साजरी करतात दिवाळी
कोणी उन्हाळयात साजरे करतात होळीचे सोहळे
सर्वच कसे आंधळे
एकदाही पायाच्या भेगा बुजवित नाही
भोवळगतीच्या आकाशव्यापी पायऱ्या वाढत्या
पायाखालचे नीट दिसत नाही
सरकताही येत नाही तसूभर
वाढत्या कुंपणाच्या माळा गळयात पृथ्वीच्या
कसे म्हणावे नि कुणास सांगावे
की सर्वांनी फक्त आपापलेच पहावे
आधीच आपले फाटके कपाळ
तशात असतो प्रत्येकाचा प्रत्येकावर आळ
कोणालाच वाटत नाही
आपापले बूड तपासावे
आयुष्याचे काय असते
त्यात काही खरे नसते
असे काही यांत्रिक म्हणतात
त्यांचे बरे असते ते असतात आस्तिक
बोटांची टोके आकाशाकडे करून झटकतात काखा
महायात्रेची धुरा असते अशावेळी
नास्तिकाच्या खांद्यावर.

□

## तीन कविता

श्रीधर पांडे

### राजीनामा

विशिष्ट गटाची माणसे म्हणून
त्यांनी एकाच रंगाच्या टोप्या घातल्या.
समान विचारापुरता टोपीचा विचार ठीक होता
पुढे
टोपीत डोके जाम झाले आणि
टोपीच विचार करू लागली
गटाचे गटार झालेले पाहून
त्याने टोपी भिरकावली तेव्हा
टोपीवाले
एक डोके नसलेला माणूस म्हणून
त्याच्यावर तुटून पडले.

### जमेल तसा मेकप करावा

जमेल तसा मेकप करावा
आपल्या प्रतिमेकडे पाहून डोळा घालावा
अन् टाळी घ्यावी

असेच शेंदरात जाऊन लपून बसावे
टाळ आपले काम करीत बसतात
दानशूराच्या भूमिकेत शेटजी पडद्यावर येतात
त्याप्रमाणे पेलेल ती ढाल वापरून
सपासप चकित करावेत प्रेक्षक

टाळ्यांना काही तोटा नाही
शेपटांना काही वाण नाही
पुतळे पुतळा उभारू लागतात

इकडे जिवंत प्रार्थना
जी स्रवत जाते करुण डोळ्यातून
एकाकी वाटेने दुर्लक्षित
खडकाळ गर्दीतून पुतळ्यांच्या
ती पाठमोरी दिसेल–असेही होत नाही

कारण
लागायचेच नसतात कधी
अभागी पुतळ्यांचे
फ्यूज्ड् ट्युब लाईटस्–संगमरवरी.

### किल्मिषांचे सघन अंधार पांघरलेले आसमंतः

पंचपाळातील बंदिस्त वासना
ओलांडू शकत नाहीत उंबरठे
वासनेला बहाल केलेली नाके
भानावर येतात तेव्हा—
आढळतात एखाद्या नरकपेठेत.

कुंपणासाठी घरे पेटतात
आणि पक्षांच्या अंधश्रद्ध टोप्यांप्रमाणे
ओळीत निघून जातात सरपटत झुंडी.

गारुड्याच्या खेळात जसा खिसा
तसे आयुष्य गमावले जाते
घंटाखुर्चीच्या खेळात रमून जातांना
तरीही सातमजली हास्य उभेच असते तटस्थः
खोडदिमाखासारखे–तेही
टाळ्यांच्या प्रचंड गर्दीत

एकूण असे चालतात झिंगत
पाय असणारे, नसणारेही

किल्मिषांचे सघन अंधार पांघरलेले आसमंतः
कधीच किंचाळत नाही
निरभ्र होण्यासाठी
मग गोंधळलेले चौक पळू पहातात
मिळेल त्या वाटेने.

□

## शांततेचं गाणं

शरद साटम

हे घे जाळायला
जाळूनही जे जळत नाहीय
हे घे उगवायला
पाणी घालूनही मातीतून जे उगवणार नाहीयः
मग उजाड
एकाकीपणाच्या पायांत घुंगुर बांध
आणि ऐक
शांततेचं गाणं कसं जळतं.

□

## केव्हाचा...

उ. रा. गिरी

केव्हाचा दाढी कुरवाळतोय एखाद्या पुराणपुरुषासारखा
इथला हा सनातन अंधार...
नद्या, तळी, माळराने, कुरणे इत्यादिकांना
झाकून घेत आपल्या काजळकाळ्या चादरीखाली...
गुदमरतात प्रार्थनांचे प्राण दूरच्या देवळात
हताश उभे कितीएक तुकाराम ओळीओळीत अभंगा–
अभंगांच्या
आता हाकाहि ऐकू येत नाहीत एखाद्या
एकाकी ज्ञानदेवाच्या
काळोख–लाटावर हेलकावणाऱ्या
अनाथ एकनाथांना...
"जो जो वांच्छिल तो ते लाहो"च्या किनाऱ्यावर
आता सर्वत्र "दुरितांचे तिमिर" दाटलेले !
बाबांनो, तुमच्या अमृतमय ओवीचे
आभाळच फाटलेले !!

केव्हाचा दाढी कुरवाळतोय एखाद्या पुराणपुरुषासारखा
इथला हा सनातन अंधार...
तरी...तरीसुद्धा हे लक्षावधी डोळे बघताहेत
अक्षांश–रेखांश ओलांडून
पलिकडचा प्रकाश धुवांधार !!

□

## तळ

रंजना विगम

समुद्रावर बोट फिरविलेस तू
पण तळ शोधला नाहीस
तिथे तर माशांची प्रचंड उलथापालथ
सुरू झाली आहे.
असंख्य वाळवंटी मृगजळ
मनात पेरून तू निघून जाशील
रेतीत बुडत जाणाऱ्या पायांचा
तोल सावरीत सावरीत
मी क्षितीजाशी सरकत असेन.
एक पान टिपून घेतलेस तू
अख्खे झाड आपल्या तृषार्त नजरेनी
तुझाच वेध घेत आहे
हे तुला कळलेच नाही !

□

## अज्ञात प्रदीर्घ कालखंडातून

गजमल माळी

या अज्ञात प्रदीर्घ कालखंडातून
जेव्हा काही जीर्ण कसरी कागद फडफडतात
आयुष्येची आयुष्ये
मोडलेल्या अक्षरांच्या आदबशीर हालचालीतून
उधळलेल्या युद्धभूमीवरील घोड्यांसारखी
गंजलेल्या ढालीच्या पाठीवरील काळोखातून
दूरवर पसरत जातात
तुकडे तुकडे होऊन गळणाऱ्या
अक्षरांच्या थकलेल्या ओळी
उतरलेल्या काळ्या ढगांनी बुजलेले त्यांचे उकार
आणि मधूनच
काळाच्या झग्यात नाहीशी झालेली
सुरेख वेलांटी वळणे;
अन्वयभंगाची सायंकालीन वाळलेली कुरणे
मुडक्या अर्ध्या परिघाचा
अर्थ, अर्थहीन टिबांनी नोंदवून ठेवतात.
वळणावळणाने वाहणारे दिग्विजयाचे पाणी
कुठे लांब देखणे चक्रवर्ती तुरे
कुठे विजयंते राजर्षी घटनाक्रम, उभे स्तंभ.
तर कुठे कोमेजून गेलेले सुदीर्घ श्वास, फलवंशी
मनोभंग.
थरथरत्या निमुळत्या बोटावरील
अक्षरे,
जीर्ण उद्ध्वस्त राजवाटावरून चालतात;
गळतात तेव्हा—
सबंध अज्ञात इतिहासाच्या पर्वातील
विझू आलेले सूर्य आणि
पुरातन फाटलेल्या विदीर्ण पानावर उतरतात
शोकात बुडून गेलेले मखलाशी विवर्ण.

□

## तीन-कविता

मृणाल चिंचाळकर

१

कंकण बांधले त्या गोष्टीला
कितीक हिवाळे होऊन गेलेत
स्वतःचाच विचार करीत
उडविली पाखरं-अवसेपुनवेला
आणि आता, पोपटाचं पिलू, स्वखुशीनं
खेळविते तळहातावर...
...ऋतुंच्या चौकटी मजबूत नसतात गं !
पोपटाला कंठ फुटेस्तोवर
ब्रेललिपी शिकून घेईन म्हणते
निदान, हिवाळा आणि अंधार
दोन्ही सारखेच सामोरे आले तर
झाडांची भाषा तरी
समजून घेता येईल
आणि भिंतीवरच्या चंद्रसावलीला
अंगाई गात जोजविता येईल.
ऋतूंसंपेपर्यंत...!

२

लवकर अंधार पडतो हिवाळ्यात म्हणून आई
घरी लवकर परतण्याविषयी
नेहमी सांगत रहावयाची ..
आता सवयच झालीय
अंधारातून चालत रहायची

३

अजून बराच अवकाश
रिंगरोड तयार व्हायला
आणि चंद्रही घडी लागलेला...
वळणावरच्या चौकातील कुठल्याशा
सिनेमाचे
कापडी बॅनर पळवून नेताना
सलमा सापडली होती—
—त्या रात्री
तिची तान्ही बहीण
थंडीनं कुडकुडत
अल्लाला प्यारी झाली म्हणे;
आणि आई
पल्याडच्या खोपटातील
दिवा विझवीत होती—-

□

## झोपडपट्टीतल्या कविता

प्रभाकर पाटील

१

अर्धवट उघड्यानागड्या तरुणांचा
मळकट जत्था पिंपळाखाली.
फाटता गोंधळ जत्थाभर.
त्यांचा नायक गोंधळ आवरीत त्वेषाने ओरडला,
"आजवर अंधारात आपण जगत आलोय, जगतोय
पण, सूर्य काही आपल्याकडे फिरकत नाहीए ! – तेव्हा
दोस्तहो ! आता – डोळेच सूर्य होऊ द्या !"
मग क्षणात जत्थ्यात सूर्य उगवू लागलेत.
जत्था : अगणित सूर्यांचा एक प्रचंड सूर्य
बाजूस उभा असलेला एक आगंतुक खी खी हसला,
म्हणाला "डोळ्यांवर हात झाकला तर
सूर्यही झाकता येतो
स्वतःपुरता-पण, तेव्हाच डोळ्यांवरही
नकळत सावली पडून जाते
स्वतःच्याच हाताची-त्याचे काय ?"

२

निवडणुकीच्या धामधुमीत
कुठल्याशा पक्षाचा कुठलासा नेता
झोपडपट्टीत आला
टाळ्यांच्या कडकडाटात भाषण ठोकून निघून गेला.
दुसऱ्या दिवशी :
एक कावळा झूल पांघरला
झोपडपट्टीवरनं उडतउडत गेला
नाते आपले लोकांशी सांगत सुटला
तिसऱ्या दिवशी :
झोपडपट्टीबाहेर कावळ्याची झूल
लोकांना भूल

□

## बर्फगार चाहुली

वा. रा. सोनार

तू नितांत आर्त मी
कुठून कथा हालली
का मनावर बावरते
कमळ–कळीची सावली.

सोडले तू पाय तेथे
मी न हाक घातली
आठवांच्या संत डोही
सुखे त्रिपुरा सोडली.

पाऊल तुझे नक्षीवंत
जशी सतार मनातली
मीं ऐकतो होत नवा
तार जळता जुळलेली

तू कुठे ? मी न इथे
दरीच अशी दुभंगली
उमल बाई चंद्रसाक्ष
मी बुडेन माझ्यातळी.

तू नितांत आर्त मी
सांज भैरवीतली
थांब, थव्याला वेचु दे
या बर्फगार चाहुली.

□

## दोन चार फुले मनात उतरलीत

सय्यद अकबर

रोजचा केरकचरा
लक्षात आला नव्हता
लोकांनीही आपल्या दारची झाडलोट
तियेच लावली होती
कधी ?
तेही लक्षात आले नव्हते
...आता उकीरडा जमला आहे
तळघाकाठच्या
राखाडी मातीवर पडलेली
दोनचार फुले मनात उतरलीत
तेव्हापासून
सारखे जाणवते आहे
स्वत:मोवतालचे देऊळ

तसा बऱ्याच काळापासून
नित्य नेमाने काहीतरी ढासळण्याचा आवाज
मी रोजच ऐकत आलो आहे.
...पण तिकडे लक्ष नव्हते

आता वाटतं
उकीरडयात गाडल्या गेली ती
त्याच देवळाची माती असेल तर ?
तर ती अलग करायची कशी ?
...काही कळत नाही.

□

## गाव

दे. शि. दुधलकर

सोवळयाचे गाव तिथे
भक्तीचा सुकाळ
देवळात भुकेजली
रांडवी सकाळ

दिंडी पहाटेची मोठी
अभंगाचा थाट
आज कशी ओरडली
पायाखाली वीट

मुक्या मुक्या माळावर
आरतीला दाटी
प्रसुतीच्या वेदनेने
रडते वांझोटी

रोज इथे कावळयाला
नवे नवे डोळे
मोक्षासाठी व्हावे आता
खुशाल आंधळे

□

## माणूस....

अरविन्द विश्वनाथ

माणसाला मरण्याची भीती वाटते
माणसाला सारखी वाटते भीती आभाळाला टेकू
नसल्याची
माणसाला उठवावा लागतो घट्ट पडलेला चरचरता
अंगठा
सर्वसत्ताधारी करारपत्रावर
आणि लावलेली गडद शाई जोपासावी लागते
पाच पाच वर्षं
माणसाला
तर माणसाला जगण्याची धास्ती वाटते
मनातल्या मनात तो काढतो फडफडते वटहुकुम
आणि मनातच वाचतो मनातली वृत्तपत्रे
मनातल्या मनात सुलभ नोकऱ्यांच्या जाहिराती
दिवाळीचा भरपूर बोनस जाहीर
आठ तासाऐवजी पाच तास काम
आणि सारे नोकरदार पर्मनंट
आवेगानं चोळामोळा करून वृत्तपत्राचा तो
कवटाळून खुपसतो तोंड
सुखसमृद्धीच्या डौलदार बातम्यात
मनातल्या मनात
टराऊन फाटतात खोलवरचे पातळ पापुद्रे
अन् उघडं पडतं पांढऱ्याफटक पेशींनी कब्जा घेतलेलं
ॲनिमिक रक्त
माणसाचं रक्त लाल असावं : निदान दिसावं
असं थोर लोक सांगून गेले
म्हणून मग माणूस पिचपिच्या डोळ्यांनी पाहू पहातो
न दिसणाऱ्या क्षितिजावरचा नवा सूर्य
भगवे ध्वज फडफडतात खांद्यावरून
आशाळू डोळ्यांभोवती उठत असतात काळेशार तवंग
वर्षानुवर्षं. उज्ज्वल भविष्याचे उलटे पाय
सरकत असतात शिरशिरी आणत
प्रत्येक क्षणाच्या टणक कातडीवरून
कापडी बांधणीचे झेंडे बेलाशक भडभडून ओकतात
किरकिरती स्फुर्ती गीते
ढकलला गेलेला माणूस पुन्हा ढकलला जातो
पुन्हा ढकलला जाऊन पुन्हा ढकलला जातो कुठेतरी
पुन्हा ढकललं जाण्याची वाट पहात असतानाच
कार्यक्रम संपतो.
वैधानिक इशारे वाचून माणूस हिरव्या दोऱ्याच्या
स्वस्त बिडया ओढतो छातीभरून
वैधानिक इशारे वाचून माणूस करतोच कुठेकुठे
सगळया रिस्पेक्टेडांना सिन्सिअरली अर्ज
वैधानिक इशारे वाचून माणूस करकचून मारतो
क्षणसुखी स्पर्शाचे धक्के रस्तोरस्ती
वैधानिक इशारे वाचून माणूस चढतो
जडावलेल्या माडया
माणूस आढयाचे वासे मोजून झाल्यानंतर बांधतो
एक हिंसक दोर गळयाला
वैधानिक इशारे वाचून.
त्याला उलटी दिसतात स्वत:वर गोंदवलेली
जन्मजात लेबले.
दारुच्या रिकाम्या बाटलीसारखा ते आतून घमघमतो
आणि हेलकावे घेत रहातो
पेनची निब न मोडताच.
एव्हाना फोल ठरलेली असते माणसाची
सततची भीती
आभाळाला टेकू नसल्याची,
आणि धास्ती
कपाळ पुसून निघून गेली असते.

## सांगाडे

सध्या मी जो उभा आहे
आणि रुतत नाही आहे कुणाच्या खांद्यावर कारण,
माणूस हा पायशील असतो.
।। स्वत:च्या पायावर उभं रहायला हवं आयुष्यात ।।
कारण पाय उगवून आलेले कमरेखाली
दिसामासांनी ताणलेले लांबलांब,
—तर पाय.
जे लोंबकळतात स्वत:खाली
शेवाळी वनस्पतीप्रमाणे. काळेकाळे केसाळ.
आणि आत पोकळ हाडे.
या हाडांवर पुन: केस. अस्ताव्यस्त
ज्या केसांनाही आत पोकळ पोकळ
विमनस्क हाडं.
ज्या विवर्ति हाडांनाही पुन:...

उपरनिर्दिष्ट सांगाडे माझ्या त्वचेवर, आत खोल...
सांगाड्यांच्या पावलांना झडलेल्या मांसाचा
करपट वास
सांगाड्याच्या पावलांना असंख्य बोटे आणि
मोवरी भेगा गजकर्ण खरूज
सांगाडे चक्क उभे रहातात डगमगत
आणि विस्फारलेले भरतमढे प्रेक्षक
कडाकडा वाजवतात टाळ्या हड्कुळ्या बोटांनी
सलाम करणारे जीर्ण सांधे उखडून लोंबतो
ताठर पंजा
पायांच्या दिशेने बोट रोखून.

## मी जिथे उभा आहे

मी जिथे उभा आहे
ती जागा माझी नाही
मी जे खातो आहे
ते अन्न माझे नाही
मी जी स्त्री भोगितो आहे
ती स्त्री माझी नाही
मी जे जगतो आहे
ते जगणे माझे नाही
--हे निवेदन प्रसृत करण्याचे कारण म्हणजे
मी जे वापरतो आहे—
ते आयुष्य शरीर आत्मा वगैरे तत्सम
भुसार मालावर
माझी कोणतीही मालकी नाही
ज्ञात होइजे ।

□

## : सोईस्कर

मधु पांढरे

झाडं कशी नैसर्गिक अस्वस्थ होतात !
माणसं ?
: सोईस्कर.
अर्थात् झाडांनाही देता येतात वेगवेगळे आकार
पण तो प्रकार वेगळा
मला रानातल्या झाडांबद्दल बोलायचय् !
रानातले देव कसे नैसर्गिक वाटतात
मंदिरातले ?
सोईस्कर
अर्थात् रानातल्या देवांनाही देता येतात नवस
पण तो प्रवास वेगळा
मला माणसातल्या देवाबद्दल बोलायचय् !

अर्थात् पुन्हा सोईस्कर...सोईस्कर !!

## आभाळात पानी

आभाळात पानी
छपरावरून गळतांना आनी
डोळ्यात पानी
सांगावं कोन्ही ?

वल्ल्या गवतात
खुंदलतात ढोरं
पोट आपूरं...आपूरं...
भरावं कोन्ही ?

पोऱ्हासोराचा संसार
सम्द पान्याचच् देनं
पान्याचं गानं
म्हणावं कोण्ही ?

आसोकसी देल्ही
हायात् ऊधडी
सावध गोधडी
टाकाव् चक्रपानी !

□

कथा

## दक्षिणद्वार

सुनीति आफळे

एक अस्सल सातारी शिवी हासडून श्रीपतीने ती फुलाची पुडी हातात घेतली. दोनचार फुलांना त्या माळचानं अगदी घसघशीत चार आणे किंमत लावली होती. दत्ताच्या दर्शनाला इथं नरसोबाच्या वाडीला आलं की लुटतात लेकाचे !

बाकी लुटत कोण नाही ?...पावसाळचात कृष्णा-नदीला महापूर येतो तसा भाविकांना लुटायलाही पूर उसळतो. घाटावरचं दत्ताचं देऊळ पुरात वुडतं अर्धअधिक. उत्तरदक्षिण वहाणारी कृष्णा देवळाच्या उत्तर दरवाजातून आत शिरते अन् दत्ताच्या पादुकांना धुवून काढीत दक्षिण दरवाजातून वाहेर पडते. ते पादुकांवरून आलेलं पाणी अंगावर घ्यायला दत्ताच्या दक्षिणद्वाराशी हीsss झुंबड उडालेली आहे! त्या लालभडक पुराच्या पाण्यात रेटारेटी करीत लोक दत्ताच्या देवळाला प्रदक्षिणा घालताहेत. दक्षिणद्वार करताहेत...

श्रीपती काठावरून ते सगळं न्याहाळत होता. थिजलेल्या काचेच्या डोळचानं. लहानपणी दक्षिणद्वार करण्यासाठी तो देखील कित्येकदा मोठचा उत्साहानं पुरात पडला होता. पण आज...आज सगळंच नको वाटतंय. म्हाताऱ्या हट्टी आईनं दक्षिणद्वार करण्याचा हट्ट धरला नसता तर आज इथं आलोही नसतो आपण पैसे खर्च करून.

पण म्हातारीचे तऱ्हेतऱ्हेचे अन् चमत्कारिक हट्ट...

श्रीपतीला एकदम जाणवलं की म्हातारी जवळ नाहीयै. कुठं गेली?.. त्यानं नजरेचं भिरभिरं घुमवलं..म्हातारी शेवचिवडेवाल्यापाशी चिवडा खात उभी ! दात नसलेल्या बोळक्यात भसाभसा बोकाणे कोंबीत.

श्रीपतीला एकदम आपल्या आईची चीड आली. किळस देखील. वाटलं तरातरा पुढं होऊन तिच्या हातातला तो तेलकट पुडा हिसकावून घ्यावा...फेकून द्यावा ..गदागदा हलवावं तिला अन् जाब विचारावा...

बाई ग..तुला काल पोटातल्या कळा असह्य झाल्या म्हणून तूच ना आम्हा सगळचांना रात्रभर जागवलंस कण्हून कुंथून?..शेवटी इथं जयसिंगपूरला तुला डॉक्टरला दाखवायला आणलं सकाळ–सकाळीच. बाकी डॉक्टर काय खाक सांगणार म्हणा! डुकरा-सारखी ही चरत हिंडते मिळेल ते हुंगत. डॉक्टरांनी चार आठ औषधांची यादी फेकली तोंडावर आणि वर परत तोच नेहमीचा उपदेशाचा डोस ."पथ्य पाळायला हवं. पोटातला अल्सर म्हणजे साधी गोष्ट नाही. पातळ पदार्थ खा..तिखट तेलकट नको... मसालेदार पदार्थ वर्ज्य...."

आणि आत्ता म्हातारी चक्क चमचमीत चिवडा चापतीयै...! पण सांगूनही काही उपयोग नाही. दटावलं तर चोरून खाते. सुभद्रा कुठं गेली घराबाहेर की सगळे डबे हुसकत रहाते. मिळेल ते खात बसते. मग पोट आवळून कण्हत पडते. सुभद्रा तर सासूच्या या दुखण्याला अन् स्वभावाला कंटाळून गेली आहे. आपण सुद्धा. पण थेरडीला सारासार विचारच शिवत नाही तर करायचं काय ?...

आता आज सुद्धा डॉक्टरकडं हिला दाखवायची म्हणून खेडचातून जयसिंगपूरला आलो. कालच पगार

झालेला. सुभद्राला एक लुगडं घ्यायचं होतं. पार चिध्या झाल्यात तिच्या धडुत्यांच्या. भिम्याला शाळेची पुस्तकं घेऊन देतो म्हटलं होतं. आता यातलं काय काय जमणारै ? . . सुभद्रेचं लुगडं पुढच्या महिन्यावर जाणार. मधेच म्हातारीला दक्षिणद्वार सुचलं ना !

डॉक्टरकडनं बाहेर पडलो. सगळी औषधं घेतली तंवर गाववाली रंगा१का भेटली. तिनं वातमी सांगितली की कृष्णेला पूर आलाय. दत्ताच्या देवळाला वेढा पडलाय. दक्षिगद्वार करायला लोकांची झुंबड उडाली आहे. झालं ! म्हातारीच्या मनानं लगेच दक्षिणद्वार घेतलं. सुभद्रेला अन् भीम्याला स्टँडावरच बसवून नरसोबाच्या वाडीची एस. टी. पकडली. हा वाडीला जाण्यायेण्याचा खर्च वायफळच की दोघांचा. शिवाय इथं हिचा चिवडाशेव सुरू आहेच.

हताशपणे श्रीपतीनं खिश्यातले पैसे चाचपले. सुभद्रेचं न घेता येणारं लुगडं डोळ्यापुढून फाडून काढीत तो ओरडला. "काय वो आयेऽऽऽ आता जायाचं का आंघुळीला ? . . आं ? ."

चवाचवा चिवडा चावीत म्हातारी जवळ आली. तेलकट कागद पुढं करीत म्हणाली.

"इलुसा खाऊनशान घे . . सकाळपास्नं पोटात कायबी नाय् . ."

श्रीपतीला एकदम घामेजली . . अवघडल्या अंगाची भुकेजली सुभद्रा आठवली . . स्टँडवर वाट वघत ताटकळत असेल...हल्ली तिला फार वेळ बसवत देखील नाही . .

'नको मला . . . जा लवकर...आंघुळ आटप की"

'तू न्हाई येत ?. . .'

'आत्ता ! अन् पैशे, कपडे वो कोन बघल त्ये ?. . .जा आटीप विगिविगी...तकडं भीम्या वाटत वघत असल.'

—म्हातारीनं शांतपणे चिवडा संपवला. तेलकट कागदालाच हात पुसले अन् म्हटलं—'कवठाची वर्फी आण वावा इलुशी. . .लई तिखट जाळ होता चिवडा त्यो...'

'खाल्ला कशाला ?...डॉक्टर काय म्हनाले त्ये. . .'

'पुरं रं तुझा डागदर ! काय उपाशी न्हां म्हंता का काय मला समदी ?...जा...जा टैम नगो घालू. वर्फी आण.'

पेंडा भरलेल्या पावलांसारखा निर्जिवपणे चालत श्रीपती कवठाची वर्फी घेऊन आला.

'भीम्याला ठेव थोडी...' चरफडत त्यानं पुडा म्हातारीला दिला.

'आता वो ! इकुशीच तं हाय ! जातानाच्या टैमाला घे त्याला अलग.' म्हातारी म्हणाली अन् वर्फी खाऊ लागली.

हिला एवढी खायखाय सुटते तरी कशानं ?... तिच्या तोंडाच्या मचमच आवाजाकडे दुर्लक्ष करीत तो विचार करू लागला. वडील गेल्यापास्नं तर ही फारच आधाशीपणा करते. वडील म्हणजे जमदग्नीचा अवतार. त्यांच्यापुढं ही वकरी बनून राह्यली. आता ते गेल्यावर अन् आपल्याला नोकरी लागल्या वर तर हिला काय करू न् काय नको, काय खाऊन् काय नको असं झालंय् !

'ही तुझी फुलं...' श्रीपतीनं पुडा पुढं केला. फुलं कसली ?—त्यात आठदहा शिळ्या पाकळ्या ...कुठल्या फुलांच्या ते न ओळखता येणाऱ्या...तुळस... वेलाची पानं. . .अन् त्या सगळ्या जीर्ण पसाऱ्यात एक कळी पण—मुकी—हिरवेपण पांघरलेली. जास्वंदाची लालचुटुक कळी ! देवाच्या नावानं काय काय ओरबाडून आणतात हे लोक ! सगळा वाजार नुसता लुटारूंचा. फुलांचे भाव काय ! वर्फीचा भाव काय ! हा चिवडा देखील काय भाव असेल कुणास ठाऊक !

परतपरत त्यानं दात ओठ खाऊन सगळ्यांना शिव्या मोजल्या. इतरांचं एक ठीक असतं ते लुटतात म्हणून उघड उघड त्यांना शिव्या तरी मोजता येतात. पण प्रत्यक्ष आईच लुटू लागली तर ?...एकदा जन्मदात्रीचा पवित्र शिक्का कपाळावर वसला की सगळे पापपुण्याचे संदर्भ वदलूनच जातात की काय ? . . .

म्हातारीनं आता वर्फी संपवली होती अन् कागदातले उरलेले कण ती जीभ वाहेर काढून चाटीत वसली होती.

'फुलं झाली . . . पण त्ये साखरफुटाणे ? वटीचं सामान बी तं लागेल न रे ! आता माजं काय म्हातारीचं ?—धा गेले अन् पाच राह्यले ! कुणी वगावं गपकन् डोळं मिटले तं ? आल्यासारखं समदं वेवस्तित होऊ दे बावा. . .खन्...नारळ...फनीकुंकाची प्येंटी. .काळी गरसोळी...कृष्णामाईची वटी भरावी लागली वावा...'

श्रीपती मुकाट्यानं उठला. ओटीचं सामान घेऊन आला. म्हणजे भीम्याचं पुस्तकाचंपण आता पुढच्या महिन्यावरच गेलं म्हणायचं. म्हातारी आता लगा-लगा पाण्यात शिरली होती. श्रीपती काठावरून बघत होता...

हिच्या आजारपणापाई किती कर्ज झालंय्. कधी फिटायचं ते ?...वाढतच जाणार. ही कधी सुधार-णार नाहीच. डॉक्टर म्हणालेच. खाणंपिणं सांभाळत नाही तुम्ही लोक अन् आम्ही काय करणार ? बाकी कोण काय करणार ?...आम्ही फक्त झुरायचं. स्वतःच्या जिवाचं वाळवण करायचं.

भीम्या पाठचा भाऊ. पण या थेरडीच्या चोचल्यांपाई त्याला कधी नीट कपडे शिवता येत नाहीत की कधी गोडधोड देता येत नाही. सुभद्राचे दिवस आता भरत आलेत. पावसाळ्याचे दिवस. लुगडं ओलं राह्यलं तर वदलायला तिला धडुतं नाही. सहा महिन्यापूर्वी एक आणलं तर आईनंच मधल्यामधं लाटलं, रंग फार आवडला म्हणून. सुभद्रा परत तशीच. बिचारी काही बोलत नाही पण तिची आपल्या संसा-रात काहीच हौसमौज होत नाही. काही सुद्धा...

लोक कृष्णेची पूजा करीत होते...फुलं फेकत होते. कुणी घरातली निर्माल्य आणून पाण्यात ओतीत होते...

निर्माल्याचं एक किती बरं असतं...! पवित्र असतात खूप. पण नको झाली...घरात अडगळ झाली की सरळ पाण्यात...

म्हातारीकडं बघता बघता एका विचित्र जाणि-वेनं श्रीपतीच्या अंगभर काटा थरथरला.

लालभडक पुराचं पाणी सुसाटपणे घोंघावत धावत होतं.

कशाचीही पर्वा न करता...पवित्र वाटणाऱ्या त्या देवळाला देखील त्यानं निःसंकोचपणे वेढून घेतलं होतं...

म्हातारी पाण्यात उतरली होती. तिनं कृष्णेची पूजा केली का ?...ती फुलं...? ती मगाची लाल-चुटुक कळी देखील तिनं अगदी निःसंकोचपणे या पाण्याला अर्पण केली असेल. ती इवलीशी कळी...ती देखील गेली असेल वाहून या पुरात. का पण ? कशासाठी ?...कुणाला तरी पुण्य लागावं म्हणून... कुणाला तरी सुख लागावं म्हणून...

आपल्याला पुण्य लागावं म्हणून दुसऱ्यांचे बळी किती निःसंकोचपणे देऊन जातात हे लोक...!

श्रीपतीच्या मनोमन आईबद्दल अतोनात चीड दाटून आली. ती देवळाच्या जाळीच्या दरवाजाला पकडून हळूहळू उत्तरेकडून पूर्वेकडे जाऊ लागली होती. मग पूर्वेकडून दक्षिणेच्या दरवाजाकडे...हे दक्षिणद्वाराचं पुण्य लुटतांना तिला पुस्तकाच्या आशेनं भुकेजल्या पोटी तिथं स्टँडवर ताटकळत बसलेला भीम्या आठवेल का ?...भुकेनं गलबलून गेलेली अवघडलेली सुभद्रा आठवेल का ? ..सकाळी घाई गडबडीत चहा घेऊन निघालो आपण. भीम्याजवळ थोडे पैसे देऊन यायला हवे होते. दोघांनी काही खाल्लं तरी असतं.

श्रीपतीनं घड्याळ बघितलं.बारा वाजायला आले होते. सूर्याची पिल्लं पाण्याच्या पृष्ठभागावर थरथरत चमकत होती...सुभद्रा अन् भीम्या भुकेनं कासावीस झाले असतील का ?... आणि आपण तिथं पोचल्यावर दोघांनाही जेव्हा निराश करू, लुगडं आणि पुस्तकं पुढच्या महिन्यात म्हणू, तेव्हा दोघांना काय वाटेल ? ...त्यांचे घामेजलेले चेहरे कसे दिसतील ?...

म्हातारी आता दक्षिणद्वाराशी पोचली होती. जाळीच्या दरवाजाला घट्ट पकडून ती पादुकांवरून येणारं पाणी आपल्या अंगावर घेत होती. त्यात मन-मुराद डुंबत होती...पुण्य मिळवत होती...पाप धुऊन काढून...!! झालं हिचं दक्षिणद्वार ! पण सुभद्राचं लुगडं ?...

पुढच्या महिन्यात तरी शक्यय का ?...तोवर ती बाळंतही होईल. पावसाळा. मुलाला कपडे लागणार... त्याचं औषध पाणी...त्यात अधुन मधुन आईची तब्बेत बिघडणारच. सुभद्राचं पथ्यपाणी म्हणत म्हणत म्हातारीच डिंक अन् तूप चापूं लागली तर ?.. डिंक हिला कसा सोसणार ?...म्हणजे मग परत डॉक्टर... औषधं...पैसे...खर्च...कर्जाचा वाढता डोंगर... केविलवाणं उघडं वाघडं आपलं बाळ...विनपुस्तकांनी शिकणारा हिरमुसला भीम्या अन् फाटक्या लुगडयात कुडकुडणारी ओलीबाळंतीण सुभद्रा...

दक्षिणद्वाराची जाळी दोन्ही हातांनी घट्ट धर-धरून म्हातारी अंगावर पुराच्या पवित्र पाण्याचे लोट घेत होती...

श्रीपतीला अचानक वाटलं हिचे हात या क्षणी सुटले तर...तर...उत्तरेकडून दक्षिणेकडे वेगानं धावणारा

एक प्रवाह...एक पवित्र पण नकोसं निर्माल्य गरगरत घेऊन जाईल...

तो परत शहारला. संस्कारी मनाचे पाप-पुण्याचे हिशेब किती खुळचटपणाचे असतात नै !

म्हातारी आता सुखरूप काठावर येऊन बसली होती. लुगडं बदलीत होती. तिथूनच ती ओरडली... 'कसला रे वेग पाण्याला या...जीव थकुनशान गेला रे...हींवभी भरली बघ...च्या सांग ना...'

श्रीपतीनं एक चहा मागवला.

'तुला ?'

'नको आता. जयसिंगपूर स्टँडवरच घीन मी. ती दोघं तिथं वाट बघत बसलीत की ! आटिप लवकर...'

'आत्ता वो बया ! झोपले का बसले मी ! जीव निसता थकून गेलाय माझा...' म्हणत श्रीपतीकडे न बघताच तिनं शेवमिसळ मागवली.

'तुला खूळ लागलंय् का काय ?...काल तं मरत व्हतीस की पोटापाई...अन् ह्ये शेवमिसळ...'

'त्यानं काय व्होतय्...? अन् व्हायाचं तं होऊं दे इथंच. कृष्णेच्या घाटावरच मरते ! तर काय तं...! माझं म्हातारीचं आता काय बी व्हायलं व्हाई...पर मरायचं त्ये खाल्ल्या पोटी मरू दे...आईला भुकेनं मारलं असा दाग का माथी घेतोस बाबा ?...' आणि शेवेचा बोकणा भरत तिनं सरळ एक प्लेट भजी मागवली.

जयसिंगपूरच्या स्टँडवर सुभद्रा म्हाद्यासमोर श्रीपती म्हातारीला घेऊन उतरला तेव्हा त्याच्या खिशात फक्त पाच रुपयेच जेमतेम शिल्लक होते. अन् ऊन्हं उतरणीला कलली होती.

'चला च्या पिऊया...'

तो उसन्या उत्साहानं म्हणाला आणि सुभद्रा भीम्याची नजर चुकवीत हाटेलात घुसला.

'कवठाची बर्फी आणली का न्हाई ?...हिथं भुकेनं जीव गेला आमचा...' भीम्यानं तक्रार केली. तशी श्रीपतीनं काहीच न बोलता कोरड्या ओठांवरून जीभ फिरवीत पुढचा पाण्याचा ग्लास आधाशासारखा ओठाला लावला.

नवऱ्यानं फक्त चार चहाच मागवले तेव्हा समंजस सुभद्रा काय समजायचं ते समजली अन् चुप बसली.

'काय गाडी गरम झाली होती रं बाबा ! तापून निघाले समदीकडनं...! मला तं च्या नको... थंड घे बाबा काय तरी...' म्हातारी घाम पुसत म्हणाली.

म्हणजे परत दीड रुपयाला खड्डा ! परतीची तिकिटं कशी काढणार ?...

'आता सांजच्या पारी तू मी अन् भीम्या जाऊया की लगालगा चालतच...एकट्या आयेला जाऊदे एस्. टी. नं. काय ? श्रीपती म्हणाला; तेव्हा निमूटपणे बोचकं उचलून सुभद्रा चालायला लागली. भीम्या थोडा कुरकुरत.

श्रीपतीनं उरल्यासुरल्या रुपयाचं आईला तिकिट काढून दिलं...एकटीलाच. उरलेले दहावीस पैसेही तिनंच ठेवून घेतले स्वत:जवळ.

आणि तिघंजणं रिकाम्या पोटी कलत्या उन्हात घराची वाट चालू लागले.

वाटेला लागल्यावर सुभद्रेकडचं बोचकं श्रीपतीनं आपल्याजवळ घेतलं. काही न बोलता सुभद्रा चालत होती पण श्रीपतीला उगाचच अपराधी वाटत होतं. नाही म्हटलं तरी गाव सात मैल दूर होतं आणि सुभद्रेला अशा अवघडलेल्या स्थितीत हे अंतर पायी तुडवावं लागत होतं ... आईपायी ... केवळ आईच्या हट्टापाई...दक्षिणद्वारच्या...

सुभद्रेचा चेहरा घामानं थवथवला होता अन् आता ती मधेच थांबून ओटीपोटाला हात लावून कण्हू लागली होती.

श्रीपतीचा जीव घाबरला. हिला झालंय काय ? ...गावापर्यंत तरी पोचतो की नाही आपण ? ... सुभद्रेच्या चेहऱ्याकडे तर बघवत नव्हतं. सगळ्या वेदना दर श्वासाबरोबर जणू ती पिऊ बघत होती. काल सासूचं पोट दुखणं म्हणून रात्रभर जागरण सकाळी धावपळ...दिवसभर उपास आणि परत सात मैल चालणं...

तिघं कशीबशी घरी पोचली तेव्हा सूर्य बुडला होता. म्हातारी घरी पोचून दोन थालीपिठं चापून निवांतपणे खाटेवर लोळत पडली होती.श्रीपतीला बघून स्वत:च्याच तंद्रीत म्हणाली, आला ?. .चला गरम थालपिठं खावा चला...माझं दक्षिणद्वार मातुर लई बेस झालं बाबा...पयलेच जायाचं ठरतं ना, तं ही

निर्माल्य नेली असती बघ बोचक्यात बांधूनशानं. ही तं हिथंच राहून गेली घरामंदी...'

'मरूदे तुझी निर्माल्य.. हिचा इंथं जीव चाललाय् बघ...' श्रीपती चिडून म्हणाला तेव्हा तिचं सुनेकडे लक्ष गेलं.

'आत्ता वो बया! अजून तं दिस भरलेबी न्हाईत..' ती पुटपुटली अन् सुनेला धरून आत घेऊन गेली. मग तिनं शेजारच्या दोन आयाबायांना हाकारलं. श्रीपतीला सुईणीकडं पिटाळलं.

श्रीपती सुईणीला घेऊन येईपर्यंत अंधार गडद होऊ लागला होता. खोपटात सुभद्राचं कण्हणं वाढत्या अंधाराबरोबर दाट होत गेलं. आणि बाहेर खाटल्यावर बसून श्रीपती स्वतःच्या जिवाची घालमेल कशीबशी थोपवण्याचा प्रयत्न करीत राहिला.

रात्री, चढत्या अंधाराला व्याकूळ करून टाकणार सुभद्राचं कण्हणं मग केव्हातरी एकदमच आर्ततेचा किनारा गाठून अचानक थांबलं.

थोड्यावेळानं म्हातारी नाक पुशीत आणि डोळ्याला पदर लावीत बाहेर आली. एव्हाना आजूबाजूचे चारदोन बाप्पे गडी श्रीपतीच्या सोबतीला खाटेवर येऊन टेकले होते.

'सोन्यासारखा मुलगा झाला होता वोऽऽऽ पर द्येवाजीच्या मनात नव्हतंऽऽऽ नशीव आपलंऽऽऽ'

आतून आता सुभद्रेचं हृदय पिळवटून टाकणारं रडणं ऐकू येऊ लागलं.

श्रीपतीला वाटलं आपणही तिच्या आवाजात आवाज मिसळून रडावं. एवढ्यात कुणीसा शेजारी कानाला लागून म्हणाला——

'रात्र जास्त व्हायच्या आत पुढच्या व्यवस्थेला लागायला हवं...लाल नवा कपडा लागेल... शिवाय.

श्रीपतीच्या डोळ्यापुढून ती जास्वंदाची लाल-चुटूक मुकी कळी महापुरावर तरंगत निघून गेली

पलिकडे म्हातारी कुणाला तरी सांगत होती... 'द्येवाचा कोप वो बाई ... द्येवाचा कोपच ! दक्षिणद्वार कराया ती बी आली न्हाई अन् हा तं थितं येऊन बी तस्साच वापिस आला.. ! आता फुडल्या वर्साला दोघांना बी धाडलं पायजे दक्षिणद्वार कराया...द्येवाचा कोप नगं बाई—ऽऽऽ'

श्रीपतीला क्षणभर वाटलं...दोन्ही हातात या थेरडीची मान धरावी अन् ..अन्

हिला मारणं पाप ठरेल का ?... अन् हिला जिवंत ठेवण्यासाठी...हिचे सगळे चोचले पुरवण्या-साठी झटलो सकाळपासून, ते तरी पुण्य होतं का खऱ्या अर्थानं ?...

पाप पुण्याचे संदर्भ असे पुराच्या पाण्यासारखे रौद्ररूप धारण करून का ढवळून टाकतात सगळं जीव-नचं ?.. का ?...कशासाठी ? ..अन् या पुरात दक्षिणद्वाराची पूजा करण्यासाठी मुकी कळी न उमल-ताच वाहून कशी जाते अन् जुनी निर्माल्य घरीच कशी राहून जातात ? कशी राहून जातात ?...

दोन्ही हातांनी तोंड झाकून श्रीपती फक्त ओक्साबोक्शी रडत राहिला...

□ □

# अण्णासाहेब किर्लोस्करांचा केशराचा मळा

अ. द. वेलणकर

महाकवी कालीदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतलम्।' या नाटकाच्या रूपांतराने अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी 'संगीत शाकुंतल' मराठी रंगभूमीवर आणले तेव्हापासून, इ. स. १८८० पासून, प्रगत अशा मराठी नाटकाची, संगीत नाटकाची परंपरा चालू झाली. या घटनेला आता शंभर वर्षे होत आहेत. मराठी संगीत रंगभूमीचे हे शताब्दी वर्ष आहे.

विष्णुदास भावे यांनी इ. स. १८४३ मध्ये 'सीतास्वयंवराख्यान' सादर करून मराठी रंगभूमीवर पहिला श्रीकार टाकला हे ध्यानी घेऊन इ. स. १९४३ मध्ये मराठी नाटकाची शताब्दी आपण उत्साहाने साजरी केली. वास्तविक तेव्हाच आपण 'संगीत रंगभूमीची शताब्दी' असे त्या घटनेचे वर्णन करायला हवे होते. पण आपण तसे केले नाही. वास्तविक भाव्यांची नाट्याख्याने ही देखील 'संगीत' होती. व्यापक ऐतिहासिक दृष्टीने पाहू जाता मराठी संगीत रंगभूमीचा प्रारंभ आणखी मागे नेता येईल. इ. स. १६८० ते इ. स. १८५० या काळात महाराष्ट्रापासून दूर, तंजावरप्रांती भोसलेवंशीय राजे मराठी–संगीत–नाटके निर्माण करत होते! म्हणजे मराठी संगीत नाटकाची परंपरा आज तीनशे वर्षे चालत आली आहे. हे त्रिशताब्दी वर्ष मानायला हवे. तसेही आपण मानत नाही, याचे कारण तंजावरी आणि विष्णुदासी नाट्याख्याने ही काही संगीत नाटकाची प्रगत रूपे नव्हती. संगीत नाटक परिपूर्ण रूपात, सामर्थ्याने आणि दिमाखाने प्रगट झाले ते अण्णासाहेबांच्या संगीत शाकुंतलाच्या रूपाने. सध्याचे वर्ष हेच मराठी संगीत नाटकाचे व रंगभूमीचे शताब्दीवर्ष आहे.

'संगीत नाटक' हे मराठी रंगभूमीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हे वैशिष्ट्य आज काहीसे पुसट झाले आहे. वास्तववादी, अतिवास्तववादी, प्रतीकशैलीच्या, आणि कौटुंबिक नाटकांनी मराठी रंगभूमी आज गजबजली आहे. व्याज संगीत नाटके आजही कमी प्रमाणात का होईना पण हजेरी लावत आहेत ही गोष्ट खरी, पण एका कलासंपन्न नाट्यपरंपरेची आठवण जागी ठेवण्याचेच कार्य ती करताहेत. तेव्हा या शताब्दीच्या निमित्ताने, संगीत नाटकाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा डोळस हिशोब मांडणे आणि या परंपरेच्या नशिबी अशी ऱ्हासाची रजनी खरोखरच येऊ घातली आहे काय याचा विचार करणे अगत्याचे आहे असे वाटते.

मराठी संगीत नाटकाच्या परंपरेचा परिचय घडविण्यासाठी अनेकांनी अनेक प्रकारचे लेखन केले आहे. त्यात आनुषंगिक माहिती देण्यावरच बहुधा भर देण्यात आला आहे. कलादृष्टीने, नाट्यदृष्टीचे भान राखत लेखन करणारे अपवादाने आढळतात. कै. ह. रा. महाजनी, के. नारायण काळे, संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे आणि पु. ल. देशपांडे हे ते सन्मान्य अपवाद होत. संगीत नाटक आणि नाट्यसंगीत या विषयी महाजनींचा ग्रंथ महत्त्वाचा आहे. इतरांनी प्रसंगोपात्त मते नोंदविली आहेत, तीही मौलिक आहेत. या चार कलामर्मज्ञांचे, आणि नाट्यशास्त्र निर्माण करणाऱ्या भरतमुनींचे ऋण मान्य करून संगीत नाटकाविषयीची माझी भूमिका मी आता थोडक्यात मांडतो आणि या विशिष्ट भूमिकेवरून संगीत नाटकाच्या परंपरेचे अवलोकन करताना जे तथ्य हाती लागते ते नंतर नमूद करतो.

'संगीत नाटक' म्हणजे संगीत आणि नाटक यांचा समन्वय साधून साधलेला नाट्याविष्कार. त्याची संहिता गद्यपद्यमिश्रित संवादांची रचना अशी असते,

आणि प्रयोगात गद्यपद्य संवादांचा साभिनय आविष्कार अभिप्रेत असतो. नाटकातील संवादांकडून आपण नाट्यदृष्ट्या ज्या ज्या गोष्टींची अपेक्षा करतो, त्या सर्वांची पद्य संवादांकडून, पदांकडूनही अपेक्षा, तात्त्विक दृष्ट्या तरी, आपण ठेवायला हवी. नाट्यार्थाशी संवादांचा अवयव–अवयवी–भावाचा संबंध असतो, आणि नाट्यार्थाची अभिव्यक्ती संवादांनीच होत असते. संवाद पात्रानुकूल, अभिनयानुकूल, प्रसंगानुकूल असे असावे लागतात. म्हणजेच नाट्यार्थनिष्ठ, नाट्यानुकूल आणि नाट्यार्थवाचक असे असावे लागतात. गद्य संवाद यापैकी एका गोष्टीत जरी कमी पडले तरी तो आपण नाट्यदृष्ट्या दोष मानतो. अशीच नाट्यदृष्टी आपण नाट्यपदांचा विचार करतानाही ठेवली पाहिजे. पद हे संगीत नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. गद्य नाटकातून संगीत नाटक वेगळे ठरते ते पदरचना–पदगायन यामुळे. म्हणून नाट्यपदांचा असा नाट्यदृष्ट्या विचार करावा लागतो. नाट्यपद नाट्यदृष्ट्या शवल, विकृतार्थ असे असेल, तर 'संगीत नाटक' आकाराला येऊ शकत नाही. 'संगीत नाटक' हा द्वंद्व समास एका कलात्मक अद्वैताकडे नेणारा आहे, निकृष्ट नाट्यपदरचना आणि त्यांचा केवळ सांगितिक आविष्कार यातून नाटक आणि संगीत या दोन प्रभावी कलांचे द्वंद्वयुद्ध सुरू होते, आणि 'संगीत नाटक' कोलमडते.

नाटकातील संगीताचा संबंध 'नाट्यधर्मी'शी आहे. 'नाट्यधर्मी' म्हणजे केवळ सौंदर्यवर्धक असे अलंकरण नव्हे, नाट्यधर्मीचा संबंध नाट्याच्या संकेतांशी असतो. 'स्वगत' हा जसा नाट्याभिव्यक्तीचा संकेत आहे तसाच नाट्यपद आणि त्याचा साभिनय सांगितिक आविष्कार हाही एक संकेत आहे. या नाट्यसंकेताला गद्य संवादाप्रमाणेच बहुविध नाट्याशय व्यक्त करायचा असतो. पात्राचा रंगभूमीवर प्रवेश, त्याचे गमन, आणि त्याचा दरम्यानचा रंगमंच व्यापार, त्याची भावाभिव्यक्ती, यासाठी भरतमुनींनी 'गानं पंचविधम्।' वर्णिले आहे. नाट्यपदाच्या आशयाचे भरतकृत वर्गीकरण महत्त्वाचे आहे. प्रवेशगान, निष्कामगान, प्रसादगान, आक्षेपगान आणि आंतरगान यात कुठलेली नाट्यपद **आशयदृष्ट्या** चपखलपणे बसते. याच्या जोडीला **पदयोजनेची** तत्वदृष्टी स्पष्ट केली की नाट्यपदाकडे व संगीत नाटकाकडे पाहण्याऱ्या नाट्यनिष्ठ शास्त्रीय दृष्टिकोन स्पष्ट होईल. संगीत नाटकात पद तीन प्रकारांनी योजता येते.

१. संवाद म्हणून पद योजता येते. सौभद्रातील 'लग्नाला जातो मी' हे नारदाचे पद संवादाचा भाग आहे.

२. स्वगत म्हणून पदयोजना करता येते. सौभद्राच्या पहिल्या अंकाच्या शेवटी अर्जुनाच्या तोंडी 'प्रिया सुभद्रा घोर वनी या निशाचरे भेटविली' ही साकी योजली आहे, ते त्याचे स्वगत आहे.

३. गाणे म्हणून पद योजता येते. नाटकातील पात्रांच्याही दृष्टीने एखादे पद संवाद किंवा स्वगत नव्हे, तर 'गाणे' असते तेव्हा प्रेक्षकांनी तो त्या पात्राचा संवाद–स्वगत–आविष्कार नसून पात्र नाट्यगत संदर्भात 'एक गाणे गात आहे' अशा दृष्टीने पाहिले पाहिजे. (प्रत्यक्षात, प्रत्येकच पदाच्या गायनाविष्काराच्या वेळी संवाद–स्वगत म्हणून नव्हे तर 'गाणे' म्हणून आणि 'गाणे' म्हणूनच पाहणारे प्रेक्षक आहेत (होते!), पदांचे संकेतस्वरूप दुर्लक्षिले गेले! दुर्दैवाने काही नाटककारही अशा प्रेक्षकांच्या पंक्तीत होते.)–संगीत नाटक आकाराला येण्यासाठी नाट्यपदांची नाट्यगरजेनुसार अशी तीनही प्रकारे योजना होणे आवश्यक असते.

किर्लोस्करांनी संगीत नाटकाचे असे स्वरूप शास्त्राभ्यासाच्या पातळीवर समजून घेतले असे नाही. त्यांना सहजपणे ते प्रातिभ सामर्थ्याने गवसले. कालिदासाच्या अभिजात संस्कृत नाटकाच्या आकलन–आस्वाद–अनुकरणात हे घडून आले. सौभद्र आणि अपूर्ण राहिलेल्या रामराज्यवियोग नाटकातून त्यांनी संगीत नाटक हे अभिनव नाट्यरूप सादर केले. सुदैवाने त्यांचे शिष्य गोविंद बल्लाळ देवल यांनी संगीत नाटकाची परंपरा योग्य रीतीने पुढे चालविली. 'संगीत नाटकाचे' हे घराणे किर्लोस्कर–देवलांपुरतेच सीमित राहिले. या दोघांची संगीत नाटक निर्मिती कलादृष्ट्या निकोप आहे. संगीत नाटक निर्माण करताना कुठलाही न्यूनगंड, अपराधी भावना (Guilty conscience) त्यांच्या ठिकाणी नव्हती. नाट्यपदाचे नाट्यसामर्थ्य दर्शविण्यासाठी देवलांच्या दोनतीन

पदांचा निर्देश करणे योग्य ठरेल. संगीत नाटक लिहायचे तर कल्पनारम्य वा पौराणिक विषयांवरच ते लिहिता येईल हा समज 'शारदा' नाटक लिहून देवलांनी खोटा ठरविला. किर्लोस्करांपेक्षाही देवलांची पदे नाट्यसंपन्न आहेत. शारदा नाटकाच्या तिसऱ्या अंकात हळदीकुंकवाचा प्रवेश आहे. शारदेचे भुजंगनाथासारख्या थेरड्याशी लग्न ठरले आहे. या संदर्भात शारदेच्या मैत्रिणी तिची थट्टा करतात. या संबंध प्रवेशाची रंगत पदांनी कशी वाढली आहे ते मुळातूनच पाहायला हवे. वल्लरी शरयूला सांगते 'घेऊनी ये पंखा वाळ्याचा...' अर्थात शरयू काही पंखा आणत नाही. ही 'श्रीमंतीण'बाईची नुसती थट्टा चालली आहे. जान्हवीच्या संभाषणात 'श्रीमंत पतीची राणी, मग थाट काय तो पुसता'-या पदाने या थट्टेला आणखी एक वळसा मिळतो. थट्टामस्करीच्या या प्रवेशात शारदेची स्थिती क्रमाक्रमाने अनुकंपनीय होत जाते. या श्रीमंत पतीचे 'वय' वल्लरी, अभिनयातून, आपल्या 'म्हातारा इतुका न अवघे पाउणशे वयमान' या पदात सांगते आणि ही सगळी निर्भेळ थट्टा नसून जीवघेणे बोचकारे आहेत हे स्पष्ट होते. रंगमंचावरचा हास्य विनोदाचा भाग करुण रसाला अधिकाधिक परिणामकारक करतो. मंदाकिनी म्हणते 'तुझे ते गाणं म्हण ग,' यावर 'त्या मुलींना माहित असलेले एक गाणे' अशा रीतीने, 'जरठास तरुण हो स्त्री जरी। ती नवरा तो स्त्रीपरी' या पदाची योजना झाली आहे. ही सगळी पदे नाट्यविष्कार करणारी व नाट्यार्थांशी आत्मभावाने निगडित अशी आहेत. ती प्रेक्षकांची 'संगीताभिरुची' सांभाळण्यासाठी लिहिलेली नाहीत.

प्रेक्षकांची संगीताभिरुची जोपासायची, मग त्यांची नाट्याभिरुची बिघडली तरी चालेल ही दृष्टी नंतरच्या नाटककारांची आहे ! श्री. कृ. कोल्हटकर आणि कृ. प्र. खाडिलकर हे दोघे नाटककार संगीताची मोहिनी पडून संगीत नाटकाकडे वळले. त्यांनी आपल्या नाटकातून संगीत 'टाकले.' कोल्हटकरांचा तर काही प्रश्नच नाही. अनेक गोष्टी 'टाकून' त्यांनी आपली चमत्कारिक नाटके निर्माण केली. त्यामुळे त्यांची पदे व नाट्य यांचा एकात्मभाव आढळणार नाही हे उघडच आहे. अनेककेंद्री अशी विसंगती युक्त नाट्यरचना हेच त्यांचे वैशिष्ट्य होते. फारशी-उर्दू रंगभूमीवरच्या थरकत्या-उडत्या चाली आणि कोल्हटकरांची तथाकथित संगीत नाटके ही दोन्ही विस्मरणाच्या पड्याआड निघून गेली. खाडिलकरांचे तसे नाही. ते एक समर्थ नाटककार होते. परंतु 'संगीत नाटक' या नाटककाराच्या प्रकृतीचा खरा धर्म नव्हता हेच खरे. मानापमान, स्वयंवर आणि उत्तरंडीला लागलेली उत्तरायणातील एकखांबी संगीत नाटके एकीकडे आणि स. माधवरावांचा मृत्यू, कीचकवध, भाऊबंदकी इ. प्रभावी गद्य नाटके दुसरीकडे, असे त्यांच्या नाट्यसृष्टीचे सरळ दोन भाग पडतात. उत्तरहिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या, चिजांच्या, बंदीशींच्या आकर्षणाने त्यांची पदरचना परतंत्र झाली आहे. बालगंधर्वासारख्या अद्वितीय गायक नटाचे एक कलात्मक आव्हान खाडिलकरांपुढे होते. त्यांनी संगीत नाटके लिहिली. परंतु नाट्यार्थवाचक ठरण्यासाठी आवश्यक तो प्रसादगुण किमान प्रमाणातही त्यांच्या पदरचनेत नाही ही त्रुटी खाडिलकरांनी गद्यानुकार करून भरून काढली. पूर्वगद्य-उत्तरगद्य यांची मदत घेऊन नाट्यार्थवाचक बनण्याच्या जबाबदारीतून त्यांनी आपल्या पदांची मुक्तता करून घेतली. गायनाला शब्द पुरविण्याचे काम पदांनी केले तरी पुरे. पु. ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे उभे राहून पेश केलेले संगीत जलशे असे रूप पुढे पुढे संगीत नाटकाला येत गेले, ते यातूनच. संगीत नाटक लिहिण्याचा प्रश्न खाडिलकरांनी स्वयंवरात 'एक परिकथा' सादर करून आणि मानापमानात एक 'खोटे नाटक-लुटुपुटीचे नाटक'-लिहून सोडविला असे म्हणणे भाबडेपणाचे आहे. किर्लोस्करांनीही संगीत नाटकाचा प्रश्न 'भावडे नाटक' लिहून सोडविला नाही. त्यांच्यापुढे संगीत नाटक ही काही कलासमस्या नव्हती, त्यांच्या नाट्यदृष्टीचा तो सहज आविष्कार होता.

१९३०-३५ च्या सुमारास रंगभूमीला मरणोन्मुख अवस्था प्राप्त झाली याची अनेक कारणे आहेत, पण संगीत जलशासारखी, नाट्यावर संगीताची कुरघोडी करणारी, नाट्य व संगीत यांच्यात द्वैतभाव राखून निर्माण झालेली संगीत नाटके हेही एक महत्त्वाचे कारण होते ही वस्तुस्थिती आहे. मराठी संगीत नाटकाच्या परंपरेचा 'सांगितिक' दृष्टीने विचार करणाऱ्यांच्या दृष्टीने हे सुवर्णयुग होते, तर नाट्यदृष्ट्या विचार करणाऱ्यांच्या मते ते नाट्यदुष्ट,

रंगभूमीच्या दृष्टीने चुकीचे, असे आत्मघातकी वळण होते. नाट्यमन्वंतरकाळात वास्तववादाच्या धाकाने घडून आलेली ठळक घटना म्हणजे रंगभूमीवरचे जलसे प्रथम बंद करण्यात आले. कोल्हटकर–खाडिलकरांची पदे तांत्रिकदृष्ट्या तरी संवाद / स्वगत अशी योजलेली असत. वास्तववादी दृष्टीला पद्यसंवाद कसे खपणार ? फार झाले तर रंगभूमीवर एखादेच पात्र असेल, आणि नाट्यसंदर्भात ते (भावगीत) गायक असेल, तसा संहितेत निर्देश असेल तर एखाद दुसरे पद 'गाणे' म्हणून योजणे तिथे क्षम्य होते. 'आज मी कार्यक्रमात एक गाणे म्हटले'; 'कोणते ? म्हणून दाखव नं !' असे संवाद योजून 'गाणे' योजण्याची युक्ती नाटककारांना सापडली. सौभद्र–मानापमानापासून आंधळ्यांची शाळा आणि साष्टांग नमस्कार सारखी नाटके प्रसंगी एकसमयावच्छेदेकरून रंगभूमीवर येत होती. त्या त्या नाटकांना प्रेक्षक मिळत होता. याचा अर्थ प्रेक्षकांनी संगीत नाटकाकडे पाठ फिरविली नव्हती. अशा वातावरणात १९६० पासून उजळमाथ्याने संगीत नाटके रंगभूमीवर होऊ लागली. दरम्यान बरेच पाणी वाहून गेले होते ! ही संगीत नाटके मन्वंतरकालीन संगीत नाटकांनाच अधिक जवळची अशी होती; मन्वंतरी नाटकांचीच युक्ती या नव्या संगीत नाटकांनी मोठ्या प्रमाणात व राजरोसपणे वापरली व आपला संसार थाटला. एखाद्या भावगीतगायक पात्रावर नव्हे, तर खानदानी गवय्यांना नाट्यपात्रे करून, वास्तववादी तक्रारींच्या नाकावर टिच्चून गाण्याचे जलशे चालू केले. दोन गवयांच्या जुगलबंदीचे प्रवेश योजल्यावर उभे जलसे करण्याची का पाळी यावी ? साखसुरत बैठकीवर तंबोरे–तबला घेऊन जलसे सुरू झाले. कृष्ण–रुक्मिणीवर नाटक लिहिताच आपले नाटक 'किर्लोस्कर परंपरेतले' आहे असा दावा करायलाही सुरवात झाली. ज्या नाटकामधील ९९ प्रतिशत पदे 'गाणे' म्हणून, वास्तववादी समर्थन देऊन योजली जातात त्यांनी असा दावा करण्यात काय अर्थ आहे ? गद्यानुकार करून थोडा नाट्यांश संवाद–स्वगतपर पदांनी व्यक्त केला, तरीही ते नाटक 'किर्लोस्करी' संगीत नाटक मानता येणार नाही.

शंभर वर्षातील संगीत नाटकाची वाटचाल ही अशी आहे. किर्लोस्करांनी जे केले तेच इतर नाटककारांनी करायला हवे होते असे मात्र म्हणावयाचे नाही. तसे होणे अशक्य होते. संगीत नाटकाचे शिवधनुष्य किर्लोस्कर–देवल–बालगंधर्व यांनाच पेलता आले, ही मात्र वस्तुस्थिती आहे. संगीत नाटकाला यापुढे वाटचाल करताना एक गोष्ट मात्र करावी लागेल : पदांचा नाट्याभिव्यक्ती संकेत म्हणून वापर करणे. आज पुन्हा नाटककार वास्तववादाचा बागुलबुवा उभा न करता पदयोजनेकडे वळले आहेतच. फक्त या पदांचा शास्त्रीय संगीत पद्धतीने गायनाविष्कार करीत नाहीत, तशी त्या पदांच्या बाबतीत गरजही नाही. चिं. त्र्यं. खानोलकरांनी 'एक शून्य बाजीराव'-मध्ये सहजपणे व ताकदीने पद्य स्वगताचा अवलंब केला आहे. लोकनाट्याच्या माध्यमातून एक शोकनाट्य सादर करताना खानोलकरांनी कथेकरी (जुना सूत्रधार) आणि संकेतपर प्रतीकशैलीची पदयोजना असे प्रयोग 'संगीत अभोगी'त केले आहेत. 'तीन पैशाचा तमाशा' मध्ये पु. ल. देशपांडे यांनीही पदरचनेचा विविध प्रकारे उपयोग केला आहे. थीमसाँग, कोरस, भजन, तरानासदृश बडबडकाव्ये यांचा उपयोग आजची नवी नाट्यशैली 'नाट्याच्या गरजेनुसार व नाट्याच्या अभिव्यक्तीसाठी' करते आहे. यातून मराठीचे संगीत नाटक अधिक समर्थ प्रयोग केल्याशिवाय राहणार नाही, असा मला विश्वास वाटतो.

संगीत नाटकाच्या भवितव्याबद्दलचा असा आशावाद व्यक्त करणे चूक की बरोबर ते भविष्यकाळ ठरवील. पण अण्णासाहेब किर्लोस्करांनी संगीत नाट्यकलेचा 'केशराचा मळा' लावला आणि त्याचा सुगंध अजून या मातीतून आसमंतात दरवळतो आहे हेच काय कमी आहे ?

□ □

# एक आगळी कूर्म प्रतिमा

गो. वं. देगलूरकर

श्रीविष्णुमूर्ती विपुल प्रमाणात भारतात आणि भारताबाहेरही आढळतात. त्यात केशवादि चोवीस प्रकारच्या असतात किंवा मत्स्यकूर्मादि दशावताराच्या असतात. याशिवाय अन्य अनेक प्रकारच्याही असतात. विष्णु हा शिवाइतकाच लोकप्रिय असल्यामुळे अक्षरशः सहस्रोप्रतिमा त्याच्या मिळतात, पैकी काही तर ख्रिस्ताब्धापूर्वीच्याही आहेत.

प्रस्तुत लेखात दशावतारापैकी एका आगळ्या अशा कूर्म प्रतिमेसंबंधीचे विवेचन करण्याचा मानस आहे.

**अवतार :**

अवताराची समर्पक आणि अगदी थोडक्यात मांडलेली कल्पना भगवद्गीतेत आढळते. गीतेच्या चौथ्या अध्यायाच्या 'यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत' या आणि 'परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्....' या दोन श्लोकात अवताराची कल्पना मांडलेली आढळते. पण सर्वप्रथम अवताराची कल्पना आढळते ती शतपथ ब्राह्मण आणि तैत्तरीय संहितेत. विशिष्ट हेतुसिध्यर्थ अवतार घेतला जातो आणि प्रजापतीने मत्स्य, कूर्म आणि वराह ह्यांची रूपे सृजन आणि सृष्टीपालनाप्रित्यर्थ घेतल्याचे उल्लेख त्यात आहेत. पुढे विष्णुमहात्म्य वाढल्यावर हे तिन्ही अवतार त्याचेच होत असे समजले जाऊ लागले.

श्रीविष्णुने असे किती अवतार घेतले होते याबद्दल मात्र ग्रंथकारांचे ऐकमत्य झाल्याचे आढळत नाही. महाभारतकारांनी दोन ठिकाणी अवतारांची यादी दिली आहे आणि मौज अशी की यापैकी एकीत कूर्म अवताराचा उल्लेखच नाही आणि दुसरी यादी मात्र दहा अवतारांची आहे. भागवतपुराण तीन वेळा अशी यादी देते. पैकी एकीत (अध्याय १ ला) २२, तर दुसरीत २३ आणि तिसरीत १६ अवतार दाखविलें आहेत. वराहपुराण, अग्निपुराण, आणि मत्स्यपुराणात मात्र दहा अवतार दर्शविले आहेत. यापैकी सगळ्याच यादीत कूर्म अवताराचा उल्लेख आढळतोच असे नाही. उदाहणार्थ मत्स्यपुराणात, वायूपुराणात आणि पांचरात्र संहितेपैकी सात्वत संहितेत असा उल्लेख आढळत नाही.

**प्रयोजन :**

प्रत्येक अवताराचे प्रयोजन असते हे गीतेच्या उपरोल्लेखित श्लोकावरून कळते. कूर्मावतारात श्रीविष्णुने कासवाच्या रूपाने समुद्रमंथनाच्यावेळी मंदार पर्वतरूपी रवीला पाठीचे टेकण दिले होते असे म्हटलेले आहे.

**शिल्प :**

प्रचलित समजाप्रमाणे मत्स्य–कूर्मादि जे दशावतार आहेत त्यापैकी मत्स्य आणि कूर्म हे अवतार नेहमी प्राणीरूपात (थेरिओमॉर्फिक) दाखविलेले असतात. काही वेळा हे अर्ध–प्राणी व अर्ध–मानवी रूपातही कोरलेले असतात. या दुसऱ्या प्रकारात नेहमी खालचा अर्धाभाग मत्स्य वा कूर्म यांच्या रूपातील असतो. साधारणतः सर्व दशावतार एकाच शिलापट्टावर कोरलेले असतात किंवा विष्णुमूर्तीच्या प्रभावळीत हे दाखविलेले असतात. मत्स्य आणि कूर्म प्रतिमा क्वचितच स्वतंत्रपणे कोरलेल्या असतात आणि कोरल्या असल्यातरी त्यांची स्वतंत्र पूजा होण्याइतके महत्त्व त्यांना दिले होते असे म्हणता येत नाही. अशा स्वतंत्र प्रतिमा अलाहाबाद जिल्ह्यात गढवा येथे, ग्वाल्हेरच्या किल्ल्यात आणि मंदिरांच्या मंडोवरावर


काही ठिकाणी आढळतात. पण कुठेही त्यांची स्वतंत्रपणे पूजा करावी असे महत्त्व कुठेही दिल्याचे आढळत नाही.

जेव्हा कूर्मावतार प्राण्यांच्या रूपात दाखविलेला असतो तेव्हा साहाजिकच विष्णुची आयुधे दाखविण्याची आवश्यकता नसते. (जे. एन. बॅनर्जी, डेव्हलपमेंट ऑफ हिंदु आयकॉनोग्राफी, पृ. ४१३) आणि जेव्हा तो संमिश्र (थेरिअनथ्रॉपिक) स्वरूपात कोरलेला असतो तेव्हा त्याच्या मानवरूपातील अर्ध्या भागी असलेल्या हातात शंख आणि चक्र (वा कोणतीही दोन लांछने) दाखविलेले असतात. या अवतार शिल्पांची स्वतंत्रपणे गाभाऱ्यात प्रतिष्ठापना होणे वा पूजा होणे हे साधारणतः दुर्मिळ आहे, (आन्ध्रप्रदेशातील श्रीकाकुलय जिल्ह्याच्या गावाजवळ एक श्रीकूर्ममंदिर आहे.)

**आगळेपण : ( छायाचित्र पहा )**

प्रस्तुत लेखाचा विषय झालेली कूर्ममूर्ती महाराष्ट्र शासनाच्या नागपुरातील मध्यवर्ति वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. कूर्मावतारासंबंधी वर आलेल्या विवेचनापेक्षा अनेक बाबतीत ती वेगळी आहे. एका उत्कृष्टपणे कोरलेल्या रेखीव शाळुंकेच्या मध्यभागी

( पान १६० वर )



छायाचित्र : एक आगळी कूर्म प्रतिमा
( अभिरक्षक – मध्यवर्ती वस्तुसंग्रहालय, नागपूर यांच्या सौजन्याने )

ठरेल. कलेकरिता कला हा दंडक वागीश्वरीला मान्य नाही. 'कला ही ज्ञानाचे प्रसाधन आहे. नीतीची नर्मसखी आहे, सत्याची वेशभूषा आहे, तिला स्वतंत्र अस्तित्व नाही . . . नीतिनिरपेक्ष सौंदर्यपरिपोष हे ललितवाङमयाचे ध्येय मानल्यामुळे, महाराष्ट्रीयांच्या वाङमयाभिरुचीला अनिष्ट वळण लागू पाहत आहे.' अशी वागीश्वरीची निश्चित धारणा आहे. हे वळण बदलविण्याची तिची इच्छा दिसते.[२]

उपर्युक्त सांस्कृतिक व वाङमयिक भूमिकेचा प्रभाव प्रामुख्याने वागीश्वरीच्या प्रारंभिक स्वरूपावर पडलेला दिसून येतो. उण्यापुऱ्या पाच वर्षांच्या आयुर्मानात तिचे जे एकूण चौपन्न अंक निघाले.[३] त्यातील साहित्यही सामान्यतः याच द्विविध भूमिकेने प्रभावित झालेले दिसते. त्यातही पहिल्या तीन वर्षांत तर हा प्रभाव विशेषत्वाने दिसून येतो. किंबहुना, या भूमिकेला अधिक भक्कमपणा देता यावा या हेतूनेच दुसऱ्या वर्षाच्या आरंभी वागीश्वरीच्या संपादकमंडळात प्राच्यविद्यापंडित म्हणून महाराष्ट्रात सुविख्यात असलेले विद्याभूषण कृष्णशास्त्री घुले व सुप्रसिद्ध कथालेखक व वागीश्वरीचे एक प्रमुख प्रवर्तक श्री. शंकर बाळाजी शास्त्री यांचाही समावेश करण्यात आला.

**धर्म व संस्कृतिविषयक लेख**

हिंदुसंस्कृतीचे उद्घाटन होईल व त्या संस्कृतीची सखोल चर्चा होईल असे लेख या मासिकात यावेत ही वागीश्वरीच्या संचालकांची इच्छा तिच्या जाहिरातीतच नमूद करण्यात आली होती. मात्र हिंदुसंस्कृतीविषयीची त्यांची दृष्टी संकुचित नसून व्यापक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांच्या मते हिंदुसंस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे म्हणजे केवळ पुराणपरंपरेचा पुरस्कार करणे नव्हे. संस्कृती म्हणजे मानवी समाजांची अविनाशी तत्त्वे. ही प्रत्येक व्यक्तीची किंवा राष्ट्राची भिन्न नसतात. फक्त त्यांचे आविष्करण मात्र निरनिराळ्या अंशांनी व कलांनी प्रत्येक राष्ट्रात होत असते. आत्मा, बुद्धी, मन व शरीर यांचा सम्यक् संयोग म्हणजेच संस्कृतीचे जीवन, मनुष्यशरीराप्रमाणेच संस्कृतीचे शरीरही परिवर्तनशील असते. मात्र या स्वाभाविक परिवर्तनशीलतेतही राष्ट्राच्या मनाला व बुद्धीला साक्षीभूत असलेली निष्ठा (attitude) अविचल असते. ही निष्ठा हाच राष्ट्राचा आत्मा होय. सर्वभूतहितत्व, निर्वैरत्व व निर्भयत्व ही मानव्याची अविनाशी तत्त्वे हिंदुसंस्कृतीची आधारभूत तत्त्वे आहेत व या दृष्टीने पाहिल्यास 'हिंदू'हा शब्द केवळ प्रदेशवाचक नसून विशिष्ट वृत्तिवाचक असल्याकारणानेच 'हिंदुसंस्कृती'च्या संकल्पनेतच 'विश्वसंस्कृती'चा अंतर्भाव होतो, असे वागीश्वरीच्या प्रवर्तकांना आवर्जुन सांगावेसे वाटते. या संदर्भात 'हिंदुसंस्कृतीचे पुनरुज्जीवन' हा लेख अतिशय महत्त्वपूर्ण व मार्गदर्शक स्वरूपाचा आहे. 'हिंसया दूयते यस्मात् । हिंदुरित्युच्यते बुधैः' असा 'हिंदू' शब्दाची व्याख्या करणारा तंत्रग्रंथातील उल्लेख ते मुद्दाम

३. वर्ष १ (१२), वर्ष २ (१२), वर्ष ३(९), वर्ष ४ (१२) व वर्ष ५ (९).

---

( पान १५८ वरून )

कासव कोरलेले आहे. कासवाच्या पायाजवळ विष्णुची लांछने आहेत. दक्षिणाधःपद क्रमाने शंख, पद्म, चक्र आणि गदा, अशी ती ठेवलेली आहेत. वालुकापाषाणातील हे शिल्प इसवीच्या १०–११ व्या शतकातील असावे असे अनुमान गदा आणि चक्र यांच्या घाटणीवरून करता येते.

शाळुंकेत एरवी जेथे शिवलिंग असते तेथे कूर्म असल्याचे येथे आढळते. त्यामुळे सकृतदर्शनी ही हरिहराची प्रतिकात्मकरूपातील संमिश्र मूर्ती असावी असा भास होतो. इथे कूर्माजवळ विष्णुची चारही लांछने दिसतात. एरवी संमिश्र कूर्मावतारातील शिल्पात दोनच दाखविलेली असतात असे वर पाहिलेले आहे. शिवाय कूर्माची स्वतंत्रपणे स्थापना केलेली दिसते आणि ती शाळुंकेत केलेली असल्यामुळे अभिषेकाचे जल वारिमार्गाने निघून जाण्याची सोयही लक्षात येते.

या विवेचनावरून (१) स्वतंत्रपणे कोरलेली, (२) शंख, पद्म, चक्र आणि गदा ही चारही आयुधे असलेली आणि (३) कदाचित–गर्भगृहात प्रतिष्ठापिली गेलेली अशी ही आगळ्या स्वरूपाची कूर्म प्रतिमा आहे.

□ □

करतात व त्यानुसार 'निर्वैरत्व उत्पन्न करणारी कार्य प्रणाली स्वीकारणारे ते हिंदू, मग ते हिंदुस्थानातील असोत अथवा युरोप-अमेरिकेतील असोत; त्याचप्रमाणे 'निर्वैरत्व हे ध्येय न मानणारे, मग ते सध्याचे नामधारी हिंदू असोत किंवा आणखी कोणी असोत ते सारे अहिंदू' अशी ते हिंदू या शब्दाची व पर्यायाने हिंदुसंस्कृतीची व्याख्या करतात.[४]

हिंदुसंस्कृती किंवा आर्यसंस्कृती ही पाश्चात्य संस्कृतीप्रमाणे केवळ अभ्युदयाचाच विचार करीत नाही, ती निःश्रेयसाचाही विचार करते; आत्मकल्याणाकडे लक्ष ठेवून अभ्युदय साधणे हे आर्यसंस्कृतीचे ध्येय आहे हीच भूमिका 'विवेकी' यांच्या 'आर्य संस्कृति' या लेखातूनही पुरस्कारलेली आहे.[५] हिंदु-संस्कृतीच्या या श्रेष्ठत्वामुळेच तिच्या संरक्षणासाठी हिंदु-संघटनाची आवश्यकता आहे असे महादेव शास्त्री दिवेकरांना वाटते.[६] भौतिक समृद्धीची पताका फडकावीत अत्यंत वेगाने सर्व विश्व आक्रमून टाकू पाहणाऱ्या पाश्चात्य यांत्रिक संस्कृतीचे हिंदू संस्कृतीवरील आक्रमण 'वागीश्वरी'चे उत्पादक श्री. हुद्दार यांना भयभीत करते, याचे कारण जगातील सद्‌गुणांची, सद्विद्येची व सद्‌भावनांची जोपासना या यांत्रिक संस्कृतीत होऊच शकत नाही असा त्यांचा सिद्धांत आहे. यंत्रे ही गुलामगिरीची प्रच्छन्न प्रतीके असल्याने यांत्रिक संस्कृती मानवाला अधोगतीकडे नेल्याशिवाय राहणार नाही : यांत्रिक संस्कृती ही असुर संस्कृती असल्याने ती मुळासकट उपटून काढण्यातच जगाचे कल्याण आहे व ते करण्याची जबाबदारी प्रामुख्याने अध्यात्मप्रवण हिंदुसमाजावरच आहे असे त्यांचे निश्चित मत आहे. 'हिंदु संस्कृति लेखमाला' या शीर्षकाखाली श्री. हुद्दारांनी जे तीन लेख लिहिले आहेत[७] ते या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे वाटतात. औद्योगिक क्रांतीने भारताची राजकीय व सांस्कृतिक अधोगती होत आहे, तसेच राजकीय पारतंत्र्याच्या चरकाखाली आमच्या आर्थिक व सामाजिक जीवनाची पुरेपूर गळचेपी होत असून आता आमची जीवननिष्ठा देखील डळमळीत होण्याच्या मार्गावर आली आहे असे ते प्रभावीपणे सांगतात व अखिल जगाचे भवितव्य मूठभर नवकोटनारायणांच्या मुठीत देणाऱ्या व कधी न शमणारी अर्थतृष्णा वाढवून मनुष्याला सदैव असमाधानी करून सोडणाऱ्या पाश्चात्यांच्या घातक यंत्रसंस्कृतीला हिरिरीने विरोध करतात.

**संस्कृतिविषयक लेखन :**

सत्त्वप्रधान हिंदुसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून प्राचीन भारतीय धर्मकल्पना, तत्त्वज्ञान, इतिहास इत्यादींचा परिचय वाचकांना करून देणे वागीश्वरीच्या सूत्रधारांच्या दृष्टीने आवश्यक होते. ब्राह्मण, त्यांची कर्तव्ये आणि अधिकार (विद्वद्रत्न के. ल. दप्तरी), वैदिक धर्म (रा. वि. पटवर्धन), शांतिपर्व आणि अनुशासनपर्व ह्यांतील बुद्धिगम्य धर्म (के. ल. दप्तरी), चातुर्वर्ण्य (म. कृ. शेंडे), भारतकार व धर्माचे ज्ञापक प्रमाण (नारायण पैकाजी पंडित), हिंदूंची असगोत्र विवाहपद्धती (कृष्णशास्त्री घुले), परशुराम-पराभव, ब्रह्मर्षी विश्वमित्र, वामनावतार व त्याचे कार्य, विश्वामित्रयज्ञसंरक्षण इ. (स्वामी 'कृष्णानंद'), महादेवाचे मूळ रूप (कृष्णशास्त्री घुले), ऐतरेय ब्राह्मण व त्यांतील आख्यायिका (प्रो. श्री. व. ताटके) इत्यादी पहिल्या दोन वर्षांतील लेख उल्लेखनीय आहेत. स्वामी 'कृष्णानंदां'च्या लेखांतून प्राचीन कथांची तर्कप्रधान चिकित्सा केली असून ती उद्‌बोधक वाटते. 'महादेवाचे मूळ रूप'या लेखांतून घुलेशास्त्र्यांनी महादेवाच्या लिंगमूर्तीचा विचार केला असून ती मूर्ती देखील अग्नीचेच प्रतीक कसे आहे हे दाखविले आहे. वागीश्वरीच्या तिसऱ्या वर्षीच्या विलास ३-४ (जोड अंक) व ५ मधून प्रसिद्ध झालेले म. कृ. शेंडे यांचे 'पौराणिक देवतांचे स्वरूपनिरूपण' हे गणपती व शंकर या देवतांचे चिकित्सक दृष्टिकोनातून विवेचन करणारे लेखही अत्यंत मननीय आहेत. धर्मवीर वि. र. करंदीकर यांचे 'पुराणे कशी वाचावीत ?', 'आर्यांचा सनातन धर्म' व 'वेद व वेदांचे धार्मिक स्वरूप' हे लेखही[८] लेखकाच्या चिकित्सक व अभ्यासू दृष्टिकोणाची साक्ष देतात.

---

४. वर्ष १/३, पृ. १५४-५६.
५. वर्ष १/४, पृ. १७८-८१.
६. वर्ष १/१, पृ. ३०-३२.
७. वर्ष २/१, २, ३.
८. वर्ष ४/२, ६, १०.

**संशोधनविषयक वादविवाद**

संस्कृतिविषयक लेखांप्रमाणेच 'वागीश्वरी'ची जमेची बाजू म्हणजे तिने आपल्या विलासांच्या कक्षेत समाविष्ट केलेले साहित्य-संशोधनविषयक लेख ही होय. 'गाथासप्तशतीचा काळ' हा घुलेशास्त्र्यांचा पहिल्याच अंकातील लेख. त्या लेखातील तर्कपद्धती व विचारसरणी यांचे कौतुक करीत असतानाच शास्त्रीबोवांच्या लेखाचा निर्भीडपणे विचार करून त्यांच्या मुद्दांचे यथामति परीक्षण करणारा 'अप्रबुद्ध' यांचा परखड लेख (वर्ष ३।१-२), आणि 'अप्रबुद्धां'नी उपस्थित केलेल्या आक्षेपांना शास्त्रीबुवांद्वारे दिले गेलेले तितकेच साधार प्रत्युत्तर (वर्ष ३/६) हे सारे वाचताना या तुल्यबल प्रतिस्पर्ध्यांचा तर्कविलास वाचकांना मोहून टाकतो. असाच मोहक तर्कविलास व युक्तिवाद गीताजयंतितिथी निश्चित करण्याच्या निमित्ताने वरोरा येथील सदाशिव यादव काकडे[९] व के. ल. दप्तरी[१०] यांच्यात झालेल्या वादविवादातून प्रगट होतो. याहीपेक्षा 'वागीश्वरी'त गाजलेला साहित्यिक वाद विद्याभूषण कृष्णशास्त्री घुले व सुप्रसिद्ध महानुभाव विद्वान श्रीबाळकृष्णशास्त्री या दोघा पंडितांत 'श्रीचक्रधरसिद्धान्तसूत्रे' या ग्रंथाच्या निमित्ताने घडून आला. नागपूरस्थ विद्वान संशोधक नी. व. भवाळकर व ह. ना. नेने यांनी प्रकाशित केलेल्या या ग्रंथाचे परीक्षण करणारा लेख घुलेशास्त्र्यांनी वागीश्वरीत प्रसिद्ध केला[११] व त्यात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे खंडन बाळकृष्णशास्त्र्यांनी सप्टेंबर व नोव्हेंबर (१९३३) च्या दोन अंकातून केले. त्यांचा परामर्श घुलेशास्त्र्यांनी १९३४ च्या फेब्रुवारी, एप्रिल, जून व जुलै या चार अंकातील चार लेखांकाद्वारे घेताच बाळकृष्णशास्त्र्यांनी 'प्रौढ-कृष्ण आणि बालकृष्ण' या अतिशय आकर्षक पण समर्पक शीर्षकाच्या लेखाद्वारे त्यांना उत्तर दिले.[१२] श्रीचक्रधर हे ज्ञानेश्वरांच्या नंतरचे की आधीचे हा या वादातला मुख्य प्रश्न होता. वरील लेखांव्यतिरिक्त गुप्तकालीन विदर्भ (य. खु. देशपांडे),[१३] वाकाटकांचा अंतिम काळ

९. वर्ष २/४, ११.
१०. वर्ष २/६-७ (जोडअंक).
११. वर्ष ३/३-४ (जोडअंक).
१२. सप्टेंबर१९३४.
१३. वर्ष ४/४.

(वा. वि. मिराशी),[१४] नन्दिवर्धन आणि नान्दिपूर (य. खु. देशपांडे)[१५] हे निबंधही मौलिक माहितीच्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. 'मगध-विहार' ही य. खु. देशपांडे यांची माहितीपूर्ण व विवेचक स्वरूपाची सांस्कृतिक लेखमालाही[१६] महत्वाची आहे.

वरील वादविवादात्मक लेखांचे एक स्पृहणीय वैशिष्टय म्हणजे त्यातील निरामय पांडित्यविलास. वैयक्तिक कुचेष्टा व टवाळी यांचा स्पर्शही लेखणीला होऊ न देता भक्कम तर्कावर आधारलेला युक्तिवाद शब्दांकित करण्याकडेच लेखकांचा कटाक्ष दिसतो व त्यामुळे या संपूर्ण वाग्रणातील एकंदर नाटच वरच्या पातळीवरचे वाटते.

**वाङ्मयचर्चा आणि समीक्षा**

श्री. रा. बोवडे आणि ज. के. उपाध्ये यांच्यासारख्या रसिक कवींचा संबंध 'वागीश्वरी'शी सुरुवातीपासूनच असल्याने तिची वाङ्मयीन बाजू उपेक्षणीय राहणे कसे शक्य होते? नागपूरस्थ श्री. वासुदेव वामन फडनवीस व सौंसरचे श्री. रामकृष्ण विनायक कळी यांच्यासारख्या अष्टपैलू व शैलीकार लेखकांनी 'वागीश्वरी'ची ही बाजू समर्थपणे सांभाळलेली दिसते. कला हे कलेचे साध्य नसून ते साध्याचे साधन आहे व मानवजातीचे अंतिम कल्याण हेच ज्ञानाप्रमाणेच कलेचेही साध्य आहे हा सिद्धान्त प्रतिपादन करणारा वा. वा. फडनविसांचा 'कलात्मक वाङ्मय' हा वागीश्वरीच्या पहिल्याच अंकातील लेख आशय आणि शैली या उभयविध दृष्टींनी आजही लक्षणीय ठरेल. श्रेष्ठ साहित्याची सर्व आवश्यक लक्षणे अंगावर मिरविणारे त्यांचे बांधेसूद व शैलीदार लेख मराठी सारस्वताचे भूषण ठरावेत अशा योग्यतेचे आहेत. 'केळकरांचे अद्वितीयत्व,'[१७] 'लोकमान्यांचे राजकारण'[१८] यांसारखे फडनविसांचे लेख, त्याचप्रमाणे 'वागीश्वरी'च्या चवथ्या वर्गात क्रमाने प्रसिद्ध

१४. वर्ष ४/६.
१५. वर्ष ४/८.
१६. वर्ष २/९, १०, ११, १२, वर्ष ३/१-२, ३-४, ६, ७ व ९.
१७. वर्ष ३/७.
१८. वर्ष ४/५.

झालेली, नागपूर विद्यापीठाचे तेव्हाचे कुलगुरु भवानीशंकर नियोगी, 'महाराष्ट्र'चे संपादक गोपाळराव ओगले, बॅ. मोरोपंत अभ्यंकर, 'आपाद-मस्तक सज्जन' असलेले मध्यप्रांताचे एकेकाळचे गृहमंत्री व गव्हर्नर श्रीपाद वळवंत तांबे आणि देश-भक्तीच्या खालोखाल सुपारीचे व्यसन गुरुप्रसाद म्हणून स्वीकारणारे 'बेहिशेबी देशभक्त' माधव श्रीहरी अणे या आपापल्या क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मान्य-वरांची फडनविसांच्या साक्षेपी लेखणीतून उतरलेली स्वभावचित्रे[१९] वाचताच, विवेचक बुद्धिमत्ता, गुणग्राही व परखड वृत्ती, व्यासंगशीलता, रसिकता इत्यादी त्यांच्या गुणांचा मनोज्ञ प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. साहित्यकारण व राजकारण या दोन्ही क्षेत्रांत सारखीच गती असलेल्या या मनस्वी लेखकाचे, वा. म. जोशीलिखित 'विचारविलास' व 'सुशीलेचा देव,' कविवर्य या. मु. पाठकरचित 'शशिमोहन' या सुप्रसिद्ध पुस्तकांवरील विदग्ध रसिकतेने नटलेले विवेचक समीक्षालेख[२०] जितके मननीय तितकेच 'वागीश्वरी'च्या प्रारंभापासून तो अखेरीपर्यंत आपल्या अन्तर्भेदी चिकित्सकतेने रसिकांना वेड लावणारे 'वीणाझंकार'–संपादकीय–या सदरातील प्रामुख्याने प्रचलित राजकीय घटनांची परखड चर्चा करणारे व राष्ट्रीय वृत्तीचे दर्शन घडविणारे एकटाकी स्फुट लेखही मनोज्ञ वाटतात. रा. वि. काळी हेही एक असेच सव्यसाची लेखक. लावणी वाङ्मयातला शृंगार हा मर्दाचा शृंगार आहे हे प्रमेय सादर करण्याच्या ओघात लावणीच्या रंगाचे नि ढंगाचे प्रत्ययकारी चित्र रेखाटणारा त्यांचा 'लावण्यांचा शृंगार' हा लेख काय किंवा 'स्त्रियांचे प्रसाधन' व 'भारतीय स्त्रीभूषा' हे लेख[२१] काय, काळींच्या रसलुब्ध लेखणीने वाचकांना मुग्ध केले नाही असे होत नाही. 'विद्यापती व चंडीदास' हा चार लेखांकांमधून प्रसिद्ध झालेला त्यांचा अभ्यासपूर्ण निबंध[२२] त्यांच्या मूलगामी रसिकतेचे, व्यासंगशीलतेचे व या दोन महाकवींच्या काव्यातील साम्यवैषम्याचा शोध घेत अभिव्यक्त होणाऱ्या मार्मिक विश्लेषणशक्तीचे प्रभावी दर्शन घडवितो. काळींनी काही लघुकथाही लिहिल्या आहेत व त्याही उल्लेखनीय आहेत. तथापि वाचकांच्या मनोभूमीवर विशेष ठसा उमटतो तो त्यांच्या लेखांचाच ! मुक्तछंदाच्या स्वरूपाविषयी उद्बोधक चर्चा करणारे आ. रा. देशपांडे, वा. ना. देशपांडे व म. श्री. पंडित यांचे लेख,[२३] तसेच 'वागीश्वरी'च्या परिवारातील श्री. शंकर गोविंद चट्टे यांचे मराठी पद्यवाङ्मयाची घटना ही तत्कालीन ऐतिहासिक परिस्थितीप्रमाणे झाली आहे हे तथ्य साधार प्रगट करून लोकजागृतीच्या कार्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अर्वाचीन मराठी काव्याबद्दलची खंत नोंदविणारा 'मराठी पद्यवाङमयाची घटना' या विषयावरील चार लेखांकही[२४] उद्बोधक वाटतात. 'वागीश्वरी'-तील आणखीही काही लक्षणीय लेख म्हणून केळकरांचे धार्मिक धोरण (शं. दा. पेंडसे),[२५] ज्ञानेशाचे आचार्यानुसरण, लेखन उच्चारानुसारी का व कसे असावे ? नायिका सुंदरच का ? व प्रेमसंन्याससंबंधी दोन विचार (या चारही लेखांचे लेखक श्री. ल. पांढरीपांडे),[२६] हिंदी संगीताचा मराठी अवतार (न. गो. करमरकर),[२७] संगीताचे मराठीकरण (गीतावाचस्पती सदाशिवशास्त्री भिडे),[२८] भागवत-धर्म आणि समाधियोग (वसंत नारायण नाईक),[२९] फारसी भाषेचा कालिदास म्हणून गौरविण्यात आलेला इराण देशातील शिराज येथील महंमद शम्सुद्दीन ऊर्फ 'महाकवि हाफिज' आणि 'वैद्यजीवन,' 'वैद्यावतंस' व 'हरिविलास' या प्रसिद्ध ग्रंथांचा कर्ता लोलिंवराज यांच्या जीवनकार्याचे दर्शन घडविणारे दुर्गाप्रसाद

१९. अंक क्रमांक १ ते ४, ७.

२०. अनुक्रमे वर्ष १/४, ५; वर्ष २/९ ते ११, व वर्ष १/६.

२१. अनुक्रमे वर्ष १/२, वर्ष ३/१–२, वर्ष ४/१.

२२. वर्ष ३/३–४, ५, ८, ९.

२३. अनुक्रमे वर्ष ३/१; वर्ष ३/३–४, ५ व ४/८; वर्ष ४/३.

२४. वर्ष २/८ ते ११.

२५. वर्ष ३/७.

२६. अनुक्रमे वर्ष ४/१; १/२, ३, ४; २/१२; १/११.

२७. वर्ष ४/७, ८.

२८. वर्ष १/८.

२९. वर्ष ४/४.

आत्माराम तिवारी यांचे दोन लेख[३०] इत्यादींचा उल्लेख करावासा वाटतो. वा. ना. देशपांडे यांचे 'कवी, लेखक व तत्त्ववेत्ते' या मालेतील 'महाकवी टासो' व 'गिबन' हे लेखही माहितीपूर्ण व नवीन वाटतात.[३१] नागपूर येथे नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अठराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या निमित्ताने 'वागीश्वरी'ने खास विदर्भांक[३२] प्रसिद्ध केला होता. या अंकातील सर्वच लेख माहितीपूर्ण व म्हणून महत्त्वाचे आहेत. विशेषतः 'नागपुरातील प्राचीन शारदोपासक' (विद्याभूषण कृष्णशास्त्री घुले), 'सीताबर्डी' (ह. ना. नेने) व 'नागपुरातील प्राचीन सरदार घराणी' (शं. गो. चट्टे) हे लेख आज अगदी विस्मृतप्राय झालेल्या व्यक्ती व घटना यांचे पुनर्जागरण होण्याच्या दृष्टीने मननीय आहेत. याच संमेलनात प्र. ब. दिवाण यांनी वाचलेला 'प्रांतिक आणि ग्रांथिक मराठी'[३३] आणि रा. वि. काळी यांचा 'विदर्भी लोकभाषा'[३४] या लेखांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

**कै. श्री. रा. बोबडे स्मृति-अंक : समाधीवर**

'विदर्भांका'प्रमाणेच वागीश्वरीने प्रसिद्ध केलेला दुसरा महत्त्वपूर्ण विशेषांक म्हणजे वागीश्वरीचे आद्य संपादक श्रीनिवास रामचंद्र बोबडे (मृत्यू ३० सप्टें. १९३४) यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'समाधीवर' या शीर्षकाखाली काढलेला नोव्हेंबर १९३४ चा खास अंक. 'नाना प्रकारच्या अलंकारांनी नटलेली, धीर-गंभीर अशा थाटात पायांतील पैंजणांचा मधुर व मंजुळ नाद करीत गजगतीने चालणाऱ्या महाराणी-प्रमाणे चालणारी...बादशाही थाटाची कविता[३५] लिहिणारे अण्णाजी बोबडे वृत्तीने अतिशय प्रसिद्धि-पराङ्मुख होते. वागीश्वरीतील त्यांच्या बऱ्याच कविता 'श्रीराम' व 'रसिक' इत्यादी नावांनी प्रसिद्ध झाल्या आहेत. बोबडे हे ग. त्र्यं. माडखोलकरांच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'असक्तः सुखमन्वभूत' या कोटीतील भोगी पण विरागी वृत्तीचे कवी. म्हणूनच त्यांच्या काव्यसृष्टीतून रसरशीत स्वातंत्र्यनिष्ठे-बरोबरच प्रसन्न शृंगारही लीलया संचार करताना दिसतो. म्हणूनच बहुधा 'बोबडे यांची कविता म्हणजे जुन्या शाहिरी कवितेस आधुनिक मराठी काव्य जोडणाऱ्या साखळीतील दुवा आहे' असे आ. रा. देशपांडे ह्यांना म्हणावेसे वाटते. प्रस्तुत विशेषांकातील बोबडेरचित 'शृंगारसंगीत' या दीर्घ काव्यातील पुढील ओळी बानगीदाखल पाहाव्यात. या काव्यातील नवविवाहित युवती आपल्या पतीस आवाहन करताना म्हणते—

दो गालांचे सरसवदनी राजसा, घे विडे हे
दो हातांचे वरिवरि तुला हार गुंफीत आहे.
दो नेत्रांचे उजळित दिवे रूप तूझे पहाया
सर्वांगाचे शयन रचिले बाट तूझीच राया !

—आणि मीलनप्रसंगी त्या शृंगारातुर पतीला अनुभव येतो तो असा :

स्वर्लोकीचे विहरत सुधाकुंभ विंबाधरांत
भूगोलार्धद्वय विलसती कांचनी कंचुकीत.
पाताळीचे अभिनवनवोल्लास लावण्य अंगी
त्रैलोक्याचे विभव सजले अंगसंगप्रसंगी !

वाचताक्षणीच रसिकाच्या ओठांवर ओठंगून उभ्या राहणाऱ्या अशा नादमधुर शृंगारपंक्ती सहजपणे रचणारा हा कवी जेवढा शृंगारमधुमत्तमिलिंद आहे, तेवढाच तो मिस्किलही आहे. आपल्या काव्यगायनाने श्रोत्यांना बेजार करून सोडण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या एका कवीला पाहताच,

अरे आला कवी आला आता धावा पळा लपा
पाठीराखे स्मरा किंवा रामरक्षा तरी जपा

असे तो उत्स्फूर्तपणे सांगतो. बोबड्यांच्या निर्मळ विनोदाचा नमुना म्हणून पुढील 'मच्छरोक्ती' उल्लेखनीय आहे. मच्छर आपली व्यथा पुढील आर्येत सांगतो—

---

३०. अनुक्रमे वर्ष ५/१ व ३. तिवारींच्या मते लॉलिंबराज इ. स. १२९४ नंतरच्या काळात होऊन गेला असावा. महाराष्ट्रसारस्वत (मूळ ग्रंथ व पुरवणी) या ग्रंथात तो सोळावे शतक असा दिला आहे.
३१. वर्ष १/२ व ५.
३२. वर्ष ४/९ (जाने. १९३४).
३३. वर्ष ५/१, २.
३४. वर्ष १/७.
३५. ज. के. उपाध्ये यांनी रेखाटलेले शब्दचित्र : अण्णाजी पृ. ३४४.

अत्तरदाणित अत्तर,
गुलावदाणित गुलावपाणीही
माझ्या मच्छरदाणित,
निदानिचा मज प्रवेशही नाही !

वयाच्या केवळ चव्वेचाळिसाव्या वर्षी कालवश झालेल्या या रससिद्ध कवीच्या व्यक्तित्वाचे व काव्याचे प्रा. भ. श्री. पंडित यांनी 'कविवर्य बोवडे आणि त्यांची रसवन्ती' या हृद्य लेखात जे शब्दचित्र काढले आहे ते अत्यंत वाचनीय आहे.

जयकृष्ण केशव (बुवा) उपाध्ये हेही एक असेच प्रतिभासंपन्न कवी. 'वागीश्वरी'च्या दुसऱ्या अंकातील 'संगमोत्सुका'हे ललत रागातील त्यांचे गीत देखील त्यांच्या सुललित पदरचनाकौशल्याचे उदाहरण म्हणून पुरेसे बोलके ठरेल. उमरखय्यामच्या अठ्ठेचाळीस रुबायांचा फिट्‌जेराल्डच्या इंग्रजी भाषांतरावरून त्यांनी केलेला मंदाक्रांता वृत्तामधील अनुवाद [३६] व उमरखय्यामकृत 'खुजानामा'चे मराठी रूपांतर अत्यंत हृदयंगम आहे. काळींच्या मते माधवराव पटवर्धनांच्या 'द्राक्षकन्या' नामक भाषांतरापेक्षाही उपाध्यांची ही कृती ललितसुंदर व सरस आहे.[३७] उपाध्ये पद्याप्रमाणे गद्यही सुंदर लिहीत. 'अजिंठा व वेरूळ येथील लेण्यांचे दर्शन'या लेखमालेतून[३८] त्यांच्या सुश्लिष्ट गद्यशैलीचे दर्शन घडते.

### व्यं. शं. वकील यांची 'संजीवन'ही कविता

व्यंकटेश शंकर वकील हे कवी, कथाकार, विनोदी लेखक इत्यादी बहुविध नात्यांनी वागीश्वरीत व्यक्त होत. वकील हे बहुप्रसू होते. त्यांचे बरेचसे साहित्य टोपण नावांनी प्रकाशित झाले आहे. गिरिजाशंकर त्रिपाठी, श्रीयुत चक्रम् बी. ए. (नापास) ही काही अशीच टोपणनावे. 'संजीवन'या दीर्घ कवितेमुळे[३९] वकील विशेष गाजले. देशप्रीतीस्तव फाशीची शिक्षा झालेल्या एका देशभक्ताचे फाशी जाण्यापूर्वीच्या रात्रीतील मनोगत 'मंजिरी' जातीत रचलेल्या या कवितेतून अत्यंत प्रभावी व हृद्य शैलीत अभिव्यक्त झाले आहे. निव्वळ सौंदर्यैक दृष्टीने लिहिलेल्या या सहजस्फूर्त कवितेमुळे वकिलांना राजद्रोहाच्या आरोपाखाली प्रथमतः दोन व नंतर वरिष्ठ कोर्टाच्या निर्णयानुसार एक वर्षाची सश्रम कारावासाची सजा भोगावी लागली. वागीश्वरी छापणाऱ्या कालिका प्रेसकडून सरकारने एक हजाराचा जामीन मागितल्यामुळे 'वागीश्वरी'च्या ९ व्या विलासाचे पुढचे काम बंद पडले, तिसऱ्या वर्षाच्या उरलेल्या तीन अंकांऐवजी ग्राहकांना व्यं. शं. वकील यांचा 'अश्रुफुले' हा लघुकथासंग्रह देऊन कशीबशी भरपाई करावी लागली. विद्याभूषण कृष्णशास्त्री घुले यांनी 'वागीश्वरी'शी संपादक या नात्याने असलेला स्वतःचा संबंध तोडला आणि चवथ्या वर्षाच्या प्रारंभापासून एकूण अंकाच्या स्वरूपातच अंतर्बाह्य बदल करणे संपादक मंडळाला आवश्यक वाटले. वागीश्वरी अधिक सुबोध झाली. 'वाचनमंदिरात', 'परिहासजल्पित'[४०] यासारखी नवी चटकदार सदरे सुरू झाली. हिंदु–संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाऐवजी साहित्याच्या व कलेच्या सर्वांगीण सेवेचे नवे ब्रीद 'मध्यप्रांत विदर्भातील बृहन्महाराष्ट्राचे' प्रमुख मासिक असलेल्या 'वागीश्वरी'च्या जाहिरातीतून नमूद होऊ लागले.

### 'वागीश्वरी'तील उल्लेखनीय कवी व अन्य लेखक

'वागीश्वरी'च्या उण्यापुऱ्या पाच वर्षांतील वाङ्मयीन कामगिरीत सहभागी होणाऱ्या कथालेखकांची व कवींची केवळ नावे देणेही कठीण व्हावे इतकी ती विपुल आहेत. त्यांतही वा. ना. देशपांडे, आ. रा. देशपांडे, पु. य. देशपांडे, सौ. विमलाबाई देशपांडे, गु. ह. देशपांडे. ना. मा. सरपटवार, आ. कृ. टेकाडे, राजा वढे, माधव मनोहर, रा. चिं. श्रीखंडे, भ. श्री.

३६. वर्ष ३/१–२, ३–४ (दोन्ही जोड अंक).
३७. वर्ष ४/६. 'द्राक्षकन्या'चे परीक्षण करताना उपाध्ये यांनी केलेले रूपांतर किती चटका लावणारे आहे ते वागीश्वरीच्या (वर्ष ३/५) पृ. ३५०–५३ वर साधार नमूद करण्यात आले आहे.
३८. वर्ष ५/४.
३९. प्रत्येक कडव्यात एच ओळी असलेली, एकूण अठरा कडव्यांची ही कविता ३ ऱ्या वर्षाच्या ८ व्या विलासात (पृ. ४२५–२६) प्रसिद्ध झाली.
४०. हे सदर R. W. D. या नावाने आर्. डब्ल्यू. दाते लिहीत.

पंडित, वि. भि. कोलते, दे. वि. अडावदकर, सौ. मनोरमाबाई नावलेकर, कविभूषण व. ग. खापर्डे, दा. अ. कारे, ना. ना. हूड, ना. घ. देशपांडे, ना. के. बेहेरे, अ. तु. वाळके, कु. दामिनी आवळे, गिरीश इत्यादी नावे उल्लेखनीय वाटतात. गमतीची गोष्ट म्हणजे वागीश्वरीच्या जून १९३४ च्या अंकात प्रसिद्ध झालेली श्री. गर्दे यांची 'माझी झोपडी' ही दीर्घ कविता आणि संत तुकडोजींच्या नावावर प्रसिद्ध असलेली 'या झोपडीत माझ्या' ही छोटी कविता[४१] यांच्यात विलक्षण साम्य आढळून येते. कथेच्या संदर्भात कुसुमावती देशपांडे, वामन चोरघडे, प्र. शां. मांजरेकर, रा. वि. काळी, व्यं. शं. वकील, कु. बाळूताई खरे, जयवंतराव व लक्ष्मणराव सरदेसाई, ना. म. घाटे, व्यं. रा. वनमाली, द. ग. प्रधान, रा. मा. हजरनवीस, या. मु. पाठक, पु. बा. साठे, आनंदराव जोशी, वि. ग. कविमंडन, माधव मनोहर, कु. शोभना देशपांडे (शरच्चंद्र टोंगो) इत्यादी नावांचा आढळ होतो. 'कु. शोभना देशपांडे' हे शरच्चंद्र टोंगो यांनी घेतलेले टोपण नाव. त्यांची 'रक्ताचा मोबदला' ही कथा या टोपण नावाने वागीश्वरीच्या जुलै १९३४ च्या अंकात प्रकाशित झाली होती व प्रा. ना. सी. फडके ह्यांनी कथालेखिकेचे अभिनंदन करणारे पत्र संपादकाकडे पाठविताना 'a rare jem' या शब्दात त्या कथेची तारीफ केली होती. 'वागीश्वरी'च्या सुरुवातीच्या कालात कथा–कवितांचे प्रमाण लेखांच्या तुलनेने कमी असे. परंतु नंतर ते प्रमाण वाढले. शेवटी शेवटी तर 'कथाकुंज' व 'काव्यवाटिका' असे स्वतंत्र विभाग निर्माण करून कथा–कवितांविषयी विशेष अगत्य दाखविलेले दिसते. 'शिकारकथा' हा कथाप्रकारही वागीश्वरीने प्रथमच आणला. वळीराम निळकंठ उर्फ नानासाहेब टालाटुले यांनी स्वानुभवाच्या आधारे लिहिलेल्या अशा अनेक चित्तवेधक शिकारकथा 'शिकारी' या नावाने 'वागीश्वरी'तून प्रकाशित झाल्या आहेत. शिकारविषयक ही लेखनमालिका मराठी मासिकांत तरी सर्वस्वी नवीन व अदृष्टपूर्व अशीच होती. निर्भीड पुस्तक-परीक्षणे हेही 'वागीश्वरी'चे सुरुवातीपासूनचे एक लक्षणीय वैशिष्टच होय. विद्याभूषण कृष्णशास्त्री घुले यांच्यापासून शालीनदत्त शिदोरे यांच्यापर्यंत अनेक जुन्यानव्या समालोचकांनी 'वागीश्वरी'चे हे अंग प्रभावीपणे सांभाळलेले दिसते.

४१. प्रस्तुत कविता 'बालभारती', मराठी पुस्तक ६ वे या पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आलेली असून तीत एकूण सात कडवी आहेत व ती क्रमाने गर्दे यांच्या कवितेतील कडवे क्रमांक १, १७, ९, ५, ६, ७, १८ या कडव्यांशी तंतोतंत जुळतात.

**'शशिसेना' व 'आप्पासाहेब भोसल्यांचा पोवाडा'**

'वागीश्वरी'ने केलेल्या वाङमयीन कामगिरीचा समारोप करण्यापूर्वी तिने प्रकाशित केलेल्या उपर्युक्त अप्रसिद्ध काव्यांचा थोडा परिचय करून देणे आवश्यक वाटते. 'शशिसेना' हे जगन्नाथ कविकृत काव्य 'वागीश्वरी'च्या तिसऱ्या वर्षाच्या प्रथमांकापासून खंडशः प्रकाशित झाले आहे. सुप्रसिद्ध संशोधक यादव माधव काळे यांची परिचयात्मक प्रस्तावना पहिल्या चार अंकांतून (अंक १–२, ३–४, ५ व ६) प्रसिद्ध झाली असून प्रत्यक्ष काव्यसंहितेचे एकूण २२० श्लोक ६ ते ९ या चार अंकांमधून आले आहेत. जगन्नाथ कवी हा मूळचा महाराष्ट्रीय व वऱ्हाड–नागपूरकडला असून तो अगर त्याचे पूर्वज बराच काळ उत्तर हिंदुस्थानात राहिले असावेत व तो शके १७१० (इ. स. १८८५–९०)च्या सुमारास झाला असावा असे प्रस्तावनाकाराचे मत आहे. उत्तर हिंदुस्थानातील मराठे मंडळीत हे काव्य प्रसिद्ध असून या काव्याच्या पोथ्याही उत्तरेतच मिळाल्या. काव्याची भाषा हिंदी धर्तीची पण मराठी, व रचना विविध वृत्तात्मक आहे. या काव्याचे वैशिष्टच म्हणजे याचे कथानक कवीने इतर कवींप्रमाणे इतिहास अगर पुराणे यांवरून घेतलेले नसून, बायका निरनिराळ्या व्रतांच्या ज्या कहाण्या सांगतात त्यातील एका व्रतकहाणीवरून घेतलेले आहे व याचा उल्लेख काव्याच्या ५७२ व्या श्लोकात त्याने केलाही आहे. प्रस्तावनाकारांनी या काव्याची निश्चित श्लोकसंख्या नमूद केलेली नसली तरी 'महाराष्ट्र सारस्वता'त ती ५८१ असल्याचे नमूद केलेले दिसते.[४२] शृंगाररसप्रधान अशा या काव्याचा 'सर्वांत भयंकर व अक्षम्य दोष म्हणजे काव्यातील

४२. आवृत्ती ५ वी (१९६३), पृ. ४५९, प्रस्तुत काव्याचे कथानकही याच ग्रंथात (पृ. ४५७–४५९) आले आहे ते जिज्ञासूंनी पहावे.

संभोगशृंगारातील प्रत्यक्ष संभोगाचे उघड वर्णन.' त्यामुळे या. मा. काळे यांनी सदभिरुचीच्या कक्षेबाहेर जाणारे असे काही श्लोक संपादन करताना मुद्दाम गाळले आहेत.[४३] वकिलांच्या 'संजीवन' या कवितेमुळे वागीश्वरीवर आलेल्या गंडांतरात या काव्याचे हस्तलिखित गहाळ झाले व त्यामुळे २२० व्या श्लोकानंतरचा या काव्याचा अंश दुर्दैवाने प्रकाशित होऊ शकला नाही. तथापि प्रस्तावनेत काव्याच्या एकूण स्वरूपाविषयी सविस्तर विवेचन केले असल्याने संहितेच्या अभावी मूळ काव्याच्या स्वरूपाची स्थूल कल्पना येण्यास मदत होते.

'आप्पासाहेब भोसल्यांचा पोवाडा' वागीश्वरीच्या जानेवारी व फेब्रुवारी १९३४ च्या दोन अंकातून (वर्ष ४, विलास ९, १०) प्रसिद्ध झालेला असून तो बैतुलच्या देवाजी–नामक इसमाने रचलेला आहे. कैं. अच्युतराव साठे व भवाळकर यांनी तो टिपून घेतला. मात्र आप्पासाहेब भोसल्यांवरील बापू मराठ्याने रचलेल्या व विविधज्ञानविस्तारात (खंड ९, पृ. २५) प्रसिद्ध झालेल्या पोवाड्याहून हा देवाजी–रचित पोवाडा निराळा आहे. वागीश्वरीने तो प्रथमच प्रसिद्ध केला. प्रस्तुत पोवाड्याची भाषा प्रामुख्याने हिंदी असून ती मराठीने प्रभावित झालेली वाटते. मात्र नेहमीच्या पद्धतीचा चौकदार असा हा पोवाडा नसून नागपूरकडे रूढ असलेल्या 'तुंबडी' या वाद्याच्या साथीवर म्हणता येईल अशा प्रकारे सयमक लवचिक गद्यासारखी त्याची रचना वाटते. उदाहरणार्थ त्याच्या प्रारंभिक ओळी पहा–

'वामन बऱ्हाड एक लाख झाडी,
जगोजगा कीर्ती सुन्नेकी काडी ।
रुपयेकी विकती पांच कुडवकी जवारी,
रघु मुखत्यार नागपूरचा भारी ।
बाराहाठी बंगालेकी करता सरदारी,
चार बोलो राजे मे नाम ऊनका भारी ।
चिमणाबापू गेले होते बंगाल्याला जाना,
तोडके बंगाला सर करके त्याना ।'

वरील ओळीतील 'बामन बऱ्हाड' म्हणजे 'बावनगाव वऱ्हाड'या म्हणीचे अपभ्रष्ट रूप असून चवथ्या ओळीतील चिमणाबापू हा सन १७८० मध्ये दुसऱ्या रघोजीच्या कारकिर्दीत बंगालवर स्वारी करणारा चिमणाबापू भोसले होय.

४३. वर्ष ३/३–४, पृ. ११०.

### समारोप

'वागीश्वरीचा 'चा प्रथमांक आश्विन शुद्ध १०, शके १८५१ रोजी (इ. स. १९२९) विजयादशमीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध झाला व जानेवारी १९३५ च्या अंकानंतर हे मासिक कायमचे बंद पडले. वागीश्वरीच्या तिसऱ्या वर्षातील यशस्वी पदार्पणाच्या सुमारास इंग्रज सरकारच्या वक्रदृष्टीमुळे उत्पादक श्री. हुद्दार ह्यांना घडलेला पाच वर्षांचा सश्रम कारावास, 'संजीवन' कवितेमुळे आलेले गंडांतर आणि प्रमुख संपादक कविवर्य बोवडे ह्यांचे पाचव्या वर्षाच्या कार्यकालात झालेले निधन अशा आपत्तींमुळे ओढवलेल्या अपमृत्यूच्या संकटाला तोंड देत वागीश्वरीने आपला प्रपंच संपादक मंडळातील रा. वा. मावकर, शं. वा. शास्त्री, ज. के. उपाध्ये, त्याचप्रमाणे शं. गो. चट्टे, व्यं. शं. वकील, आर्. डब्ल्यू. दाते, प्रि. पांढरीपांडे, नानासाहेब टालाटुले आदी हितचिंतक इत्यादिकांच्या सहकार्याने यशस्वीपणे पुढे रेटला : महाराष्ट्रातील एक प्रमुख मासिक–पुस्तक म्हणून साहित्यक्षेत्रातील मान्यवरांकडून प्रशंसा मिळविली. तथापि आर्थिक प्रतिकूलतेमुळे अखेर पाचव्या वर्षी नऊ अंक प्रकाशित झाल्यानंतर 'वागीश्वरी'ला आपला वीणाझंकार निरुपायास्तव थांबवावा लागला. वागीश्वरीच्या यशापासून प्रेरणा घेऊन या. मु. पाठक यांनी 'विहंगम' व गर्गे–भट यांनी 'विश्ववाणी'ही मासिके काढली.[४४] हेही वागीश्वरीचे यशच म्हटले पाहिजे. स्वभावगत प्रसिद्धिविमुखता व उदासीन वृत्ती यांमुळे एरवी जे मौनव्रताचे मानकरी ठरले असते ते वासुदेवराव फडनवीस, रा. वि. काळी, कृष्णशास्त्री घुले, उपाध्ये, बोवडे, पांढरीपांडे, हजरनवीस, टालाटुले, वकील, चट्टे इत्यादी कसबी लेखक 'वागीश्वरी'ने प्रतिष्ठित केले. 'केसरी'कारांनी वागीश्वरीवरील आपल्या अभिप्रायात म्हटल्याप्रमाणे वाचकांना बौद्धिक

४४. प्रथमांक अनुक्रमे जुलै १९३३ व सप्टेंबर १९३२ 'विश्ववाणी' हे सुरुवातीला द्वैमासिक होते. मासिकस्वरूपातील तिचा प्रथमांक जून १९३४ मध्ये प्रकाशित.

( पान १७० वर )

# पौराणिकतेचे तत्त्वज्ञान

प्रभावती हातवळणे

[लेखिकेचे टिपण : भगवान् व्यासांच्या दिव्य व स्तिमित करणाऱ्या प्रतिभेपुढे नतमस्तक होऊन त्यांच्याच प्रेरणेमुळे प्रस्तुत लेखाचा प्रयत्न केला आहे. "व्यास एक होते की अनेक?" किंवा "महाभारत हा इतिहास आहे किंवा कसे?" इत्यादि प्रश्न येथे अपेक्षित नसून जनमानसावर कायमचा ठसा उमटवणारे अलौकिक वाङ्मय कोणत्या कारणास्तव जनमानसात रुजते ही जिज्ञासा ह्या लेखाच्या मुळाशी आहे.

Myth ह्या शब्दाचे स्पष्टीकरण Dictionary of Philosophy (Editor. D. D. Runes) मध्ये पुढीलप्रमाणे आहे.

Myth—The truth, symbolically, or affectively, presented. Originally, the legends of the Gods concerning cosmogonical or cosmological questions. Later, a fiction presented as historically true but lacking factual basis; a popular and traditional falsehood. A presentation of cosmology, employing the affective method of symbolic, representation in order to escape from the limitations of literal meaning.

पुराकथा, पुराणकथा, आदिकथा, मिथ्यकथा, प्राचीनकथा इ. अनेक पर्याय वापरून आपण असे सुचवीत असतो की केवळ कल्पना किंवा शुद्ध इतिहास ह्यापेक्षा या कथांचा आणि त्यातील घटनांचा आशय निराळा आहे. अग्नी, पर्जन्य, इन्द्र, वरुण ह्या देवदेवता असोत किंवा कृष्ण रामादि अवतार असोत अथवा कर्णभीष्मादि चरित्रे असोत; त्यांच्या भोवती असे एक वलय निर्माण झाले आहे की केवळ वास्तविकता त्यापुढे हतप्रभ वाटावी. ही आशयगंभीरता त्यांना का बरे प्राप्त झाली असावी ? ह्या प्रश्नाचे आकलन करण्याचा हा यथामती प्रयत्न आहे.]

जीवनाचा धीरगंभीर आशय व्यक्त करण्याची मानवी आकांक्षा मूलगामी आहे. त्यासाठी तो अनेक रूपे व संकेत योजतो. विश्वाचे स्वरूप विराट व चिरंतन आहे. विश्वाचा संदर्भ प्रगट करण्यासाठी जी रूपे, प्रतीक व संकेत मिळतील ती वापरून हा विराट व चिरंतन आशय व्यक्त करण्याचे मानवाला कुतूहल आहे. मानवाचे अल्पजीवित्व आणि विश्वाचे चिरंतनत्त्व या ओढाताणीत पौराणिकतेचा उदय झाला असावा. विश्वाच्या संदर्भात आणि वैश्विक तुलनेत माणसाचे अल्पजीवित्व व क्षुद्रत्व त्याला सतत डाचते. जन्म हा जीवनाचा प्रारंभ बिंदू असला तर मृत्यू हा शेवटही जीवनाचाच. त्याचे जीवन हेच मूलतः मरणाने परिपूर्ण झालेले आहे. कोणत्याही जीवनाचा अर्थ सर्वांशाने उमजावयाचा तर त्या जीवनाची अखेर त्यात अंतर्भूत आहेच. कोणतेही चरित्र सर्वथैव समजावयाचे तर त्या जीवनाचा अंत कसा झाला हे समजणे आवश्यक आहे. विरोधाभासाचा अवलंब करून आपण असे म्हणू की, मरण हीच जीवनाची परिपूर्णता आहे. मृत्यू हा जीवनाचा अंतीम बिंदू आहे.

पुराणामध्ये मानवी अल्पजीवित्त्व आणि विश्वाची शाश्वतता विविधशः व्यक्त होत असते. ज्या मृत्यूमुळे जीवनाची सांगता होते आणि त्यामुळेच की

काय मानवी प्राण्याची हार आणि पराजय होतो, त्यावर मात करण्याची माणसाची अशक्य आकांक्षा पुराण कथेमध्ये अविष्कृत होते. आपल्याला असेही म्हणता येईल की पूर्वजन्म, कर्म किंवा पुनर्जन्म इत्यादी संकल्पनांमुळे मानवी जीवनाचे इहलोकातील अपयश सूचित होते. तरीसुद्धा या विशाल आणि महान विश्वाचे साकल्यरूपाने समग्रदर्शन घ्यावे ही माणसाची घडपड असते. त्यासाठी आपण अनेक क्लृप्त्या व मार्ग योजतो. यशोदामातेला श्रीकृष्णाच्या मुखात विश्व-दर्शन होते. अर्जुनालाही भगवान कृष्णाचे विराट स्वरूपात दर्शन होते. वेदांचे स्वरूप जन्ममरणाचे फेरे इत्यादी त्या दर्शनात समाविष्ट असते. चिरचैतन्याची मानवी ओढ पुरातन आहे. हेच 'सत्य' आहे. हे सत्य व्यक्त करण्यासाठी आपण समर्थ अशी प्रतीके व संकेत धुंडाळीत असतो.

सत्य म्हणजे काय ? "झुळूक ही वातावरणा-तील हालचाल" असे विज्ञाननिष्ठ ज्ञान म्हणजेच 'सत्य' असे म्हणणे एकांगी ठरेल. झुळूक ही "ईश्व-राची फुंकर" (ज्याअर्थी फुंकर आहे त्याअर्थी ती कोणाची तरी आहे व त्याअर्थी ईश्वर आहे इत्यादी) आहे. असे भावनिष्ठ 'ज्ञान'ही आपणास होते. त्यापैकी विज्ञाननिष्ठ ज्ञानास 'सत्य' म्हणावे की भावनानिष्ठ प्रतिक्रिया ज्यात नोंदविली जाते त्या विज्ञानपूर्व व त्यामुळे विज्ञानोत्तर देखील प्रतिक्रियेस 'सत्य' म्हणावे हा मूल प्रश्न येथे उद्‌भवतो. (विज्ञान तरी पूर्णतः भावमुक्त असू शकते काय ? आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ विज्ञान यात परस्परवर्जक मूलभेद आहेत का ? इत्यादी.)

देवीच्या कोपामुळे देवी हा रोग उद्‌भवतो असे एकदा मनाने घेतले की रोग कशामुळे होतो हे कोडे पूर्णतः उलगडले असले तरी देवीला नवस करणे किंवा देवीला साकडे घालणे अशा तऱ्हेची भावनानिष्ठ प्रतिक्रिया समाजामध्ये प्रगट होणारच. पाश्चिमात्य पुढारलेल्या देशात देखील जहाज जेव्हा आपल्या पहिल्या वहिल्या जलप्रवासास निघते तेव्हा शँपेनची बाटली फोडून या जलयंत्राची शांती व तृप्ती करण्या-सारखे प्रकार आहेतच. तेथे देखील विवाहप्रसंग किंवा सणवार किंवा जन्ममरणाचे संस्कार सामूहिकरीत्या करणे प्रचलित आहेतच. भावनिष्ठ प्रतिक्रिया ही माणसाची जन्मठेप आहे.

जीवनमरणाचे भयाकर्षण, जन्ममृत्यूचे कुतूहल, अखंड व सातत्यपूर्ण जीवनाची अपेक्षा आणि अपुरे-पणाचा स्वीकार करण्याची खंत या सर्वांमधून पौराणिक भावना निर्माण होते. मरीसभर म्हणून माणूस स्वप्नरंजन व कल्पनारंजन करू शकतो. या सर्वांचा परिणाम म्हणजे सत्य, मिथ्या, इतिहास, कल्पना व अद्‌भूत यांचे एक रसायन करून पौराणिक कथा जन्माला आली असते. ती नेमकी केव्हा निर्माण झाली, ती कशी निर्माण झाली, कोणी निर्माण केली किंवा अनेक शतकानुशतके समाजात झिरपत आल्यामुळे तिने कोणकोणती वळणे घेतली या सर्वच बाबतीत आपल्या मनात संदिग्धता असते.

येथे एक मूलगामी महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यावयास हवा. तो असा की, आपल्या मनाची ही भूमिका हुबेहूब अशीच असते. सत्य, मिथ्या, इतिहास, कल्पना अशा सर्व बाबींचे संमिश्रण होऊन आपली मनोभूमी देखील तयार झालेली असते. यामध्ये संस्कृतीचे व कलेचेही कण चिकटलेले असतात. तेव्हा आपली मनोभूमिका ही शतकानुशतकांच्या परंपरेचा वारसा घेऊन तयार झाली असते.

पुराणकथा व आपली मनोभूमिका यामध्ये 'समरूपता' (Isomorphism) असते. आपल्या मनामध्ये अनेक तर्कयुक्त गोष्टी व तर्कमुक्त गोष्टी अडून दडून बसलेल्या असतात. काल्पनिकता आणि वास्तविकता यांचे मन हे एक विचित्र कडबोळे आहे. तसेच ते पुराणकथेमध्येही आढळून येते.

येथे 'समरूपतेचा' (Isomorphism) मुद्दा अधिक विशद करणे आवश्यक आहे. अख्ख्या पृथ्वीचे चित्र कोणत्यातरी विशिष्ट संदर्भाने युक्त असलेल्या नकाशावर आपण रेखाटू शकतो. समरूपतेच्या तत्त्वावर हे शक्य होऊ शकते. गंगा नदी निव्वळ एक बारीक रेघ म्हणून दाखविली जाते तर हिमालय पर्वत एखाद्या सुरवंटासारख्या विचित्र आकाराने दाखविला जातो. पण ज्याअर्थी गंगेचे आणि हिमालयाचे प्रतिनिधित्व आपण समप्रमाणात करतो त्याअर्थी कागदाच्या सपाट कपटयावर आपण समस्त पृथ्वीपट उकलू शकतो. भाषेमध्ये देखील हे समरूपतेचे तत्त्व आढळून येते. 'मांजर' हा शब्द आणि मांजर हा प्राणी यामध्ये समांतरत्व व समरूपतेचे तत्त्व आहे.

समरूपतेचे तत्त्व अतिसुलभतेचा दोष पत्करून संक्षिप्तरीत्या मांडावयाचे तर हे असे आहे.

आता आपण म्हणू शकू की, पुराणतत्त्व आणि आपले मन यामध्ये अशी समरूपता आहे. पुराणकथा ही आपल्या मनाचा नकाशा आहे. दैवी आणि दानवी, सुष्ट–दुष्ट, भद्राभद्र व शक्याशक्य जसे पुराणकथेत व्यक्त होते तसेच ते आपल्या मनातही असते. मनाचे स्वरूप (मन म्हणजे काय इत्यादी) आपण आपलेच निरखून पाहिले तर आपले सर्व व्यवहार निद्रावस्थेत व जागृतावस्थेतही निव्वळ तर्ककोटीतले असतात असे आपण सुतराम म्हणू शकत नाही. बहुतेक स्वप्ने शक्याशक्यतेला बाधा आणणारी असतात. अनेक व्यवहार असेच तर्कातीत असतात. सुसंवाद, सुसंगती किंवा संभाव्यता यांचे कुंपण आपण केव्हाच ओलांडलेले असते. पुराण कथेमध्येही शक्याशक्यतेचे, संवादविसंवादाचे किंवा सत्यासत्यतेचे बंधन असेच झुगारून दिले असते. स्वप्न हे पुराणकथेच्या मानाने आत्मनिष्ठ, चंचल व क्षणभंगूर असते. उलट पुराण-कथेमध्ये सामाजिकता आणि सामूहिकता अंतर्भूत असते. मनाची विचित्र व विमुक्त रूपे बाह्य सृष्टी-मधील अनेक वस्तूचे माध्यम धारण करतात आणि मनातील आशय प्रगट करतात.

ए. सी. युंग या मनोविश्लेषकाने मिथ्या कथा किंवा पुराणकथा यांचा सखोल अभ्यास केला आहे. त्याच्या मानसशास्त्रातील सामुदायिक अबोधावस्था (Mass Unconcions) ही संकल्पना महत्त्वाची आहे. तो म्हणतो की, मानवी स्वभावाची पुराणकथा ही मूलरूपे आहेत.

ह्या दैवत कथांना व पुराणकथांना वाङ्मयीन रूप प्राप्त होते तेव्हा अर्थातच त्यामध्ये जाणिवेचा अंश डोकावतो. पण मिथ्या कथांचा उदय सामूहिक व सामाजिक अबोधावस्थेतून निर्माण झालेला असतो. यामध्ये आपले मन अनेक रूपे धारण करते. जे प्रश्न आपणास भेडसावतात, ज्या समस्यांविषयी आपणास अतिशय कुतूहल असते आणि जे अनुभव आव्हानात्मक वाटतात त्यांचा आविष्कार या पुराणकथांमधून व्यक्त होतो. समाजातील मंदिरे, देवळे, नद्या, झाडे, तसेच चिरकाल टिकून राहणाऱ्या शिळा आणि सूर्योदय, सूर्यास्त, वसंतागमन, शिशिरागमन, चंद्रग्रहण–जे सापडेल ते–आणि मनोनुकुल म्हणून वाटते ते काहीही माणसाला चालते व त्याची गरजही भासते. मग आपण ह्या सर्व वस्तूंचे माध्यम करून आपल्या मनातील आशय पुराणकथेद्वारे व्यक्त करतो. सर्व घटना व सर्व वस्तूमात्र पुराणकथेमध्ये वैचित्रित केल्या जातात. त्यामध्ये केवळ निसर्गघटनेपेक्षा अधिक अर्थ आणि अधिक आशय सांगण्याचा आपला उद्देश असतो.

ह्या सर्व वस्तूमात्रांचा आपण पुराणकथेमध्ये उपयोग करतो हे तर झालेच पण याच्या भरीला आपली मानवी कल्पनाशक्ती हात जोडून सज्ज असतेच. जणू काही ज्या काही वस्तू आपणास वास्तवात उपलब्ध आहेत त्या पुरेशा न वाटूनच की

---

( पान १६७ वरून )

ज्ञान पुरवून त्यांचे मानसिकतंतू नाना प्रकारे छेडून त्यांत अनुरणन उत्पन्न करणे हे जे मासिकपुस्तकांचे कार्य ते वागीश्वरी कुशलतेने करीत होती व त्यामुळेच बृहन्महाराष्ट्रातील एक प्रमुख मासिक म्हणून तिला सन्माननीय स्थान लाभले होते. वागीश्वरीचा चालक-वर्ग ध्येयवादी, राष्ट्रभक्त असा असल्यामुळे तिचे धोरण सुरुवातीपासूनच सर्वसमावेशक व व्यापक राहिले आहे. प्रादेशिक वा अन्य कसल्याही प्रकारचा संकुचितपणा तेथे नव्हताच. महाराष्ट्राच्या साहित्यिक व सांस्कृतिक ऐक्याची सतत जाणीव ठेवून, अप्रसिद्ध पण प्रसिद्धिपात्र असे गुणीजन लेखक हुडकून काढून त्यांना उत्तेजन देण्याचे कार्य वागीश्वरीने केले आहे : वागीश्वरीचा लेखकवर्ग प्राय: विदर्भी असेल, पण तिचे स्वरूप व धोरण मात्र महाराष्ट्रीय आहे, असे तिचे निवेदन आहे.[४५]

—अशा या दर्जेदार वाङ्मयीन मासिकाचा अकाली अस्त व्हावा ही घटना आजही मनाला चुटपूट लावून जाते.

□ □

४५. वर्ष ४/१ मधील प्रकाशकीय निवेदन.

काय तर हत्तीची सोंड घे आणि लाव माणसाच्या धडाला असे भरमसाठ उद्योगही आपण करतो. आकाशातल्या चांदण्या सप्तर्षी होतात. सूर्य मानवी रूप धारण करतो. देव–दानवांच्या समुद्रमंथनात वासुकी नागाची दोरी होते, तर पर्वताची रवी होते. या सर्व घुसळण्यामधून शेवटी अर्थातच अमृतकुंभाची प्राप्ती होते अशी स्वैर कल्पना आपण मोकाटपणे करीत असतो आणि समाजही ते मुकाटपणे मान्य करीत असतो. वस्तुमात्राला आशयाचे कण चिकटल्या-खेरीज वस्तुमात्राचे किंवा चिन्हांकनाचे प्रतीक–संकेत होत नाहीत.

आदिवासी माणसे त्यांचे सभोवतालचे वातावरण व खुद्द ते–यामध्ये तीव्र भेद करीत नाहीत. आदिवासी व त्यांचा परिसर मिळून एकच मिश्रविश्व तयार होते. मानव व मानवाचे वातावरण असे काटेकोर द्वैत हे लोक मानीत नाहीत. लेव्ही ब्रुव्हल[२] या सुप्रसिद्ध तत्त्वचिंतकाने या अवस्थेस 'रहस्यमय भागीदारी' (Participation mistique) असे नाव दिले आहे. आदिवासी मानवाप्रमाणेच संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत आपणही स्वाभाविकत:च परिस्थिती व आपण यामध्ये भेद मानू शकत नाही. (मानव व मानवाची परिस्थिती यात खरोखरच द्वैत असते का ? की मानव परिस्थितीचा एक घटक आहे ? इत्यादी.) अशावेळी निसर्गातील विचित्र रूपे व घटना कोणते ना कोणते रूप घेऊन पुराणकथेमध्ये वावरतात. सूर्योदयाच्या वेळी किंवा सूर्यास्ताच्यावेळी ही अजब किमया पाहून आपल्या मनात काय चलविचल होते, ते दृश्य आपणास कसे काय भासते त्याचा उल्लेख रूपकात्मकरीत्या सांगण्याचा आपण प्रयत्न करीत असतो.[३]

पुराणकथेचा खरा नायक खुद्द मानवच असतो. निरनिराळ्या देशात, निरनिराळ्या धर्मात व जाती-जमातीत समान कथा आविष्कृत होतात. थोड्याफार फरकाने, भेदाने तीच रूपे वावरतात. आश्चर्य, कुतूहल, आनंद, दु:ख, उत्साह, शोक यांना वाट देण्यासाठी प्रक्षेपणाचा अवलंब करून आपले मन अनेकशः प्रगट करीत असते. नेणिवेला आपण जाणिवेचे रूप देतो. भावनेला भाषेची झालर लावतो. (भाषेवाचून भावना असू शकते का ? भावनेला भाषेमध्ये पूर्णत: जखडून टाकता येत नसले तरी भाषाहीन भावना शक्य आहे का ? इत्यादी).

येथे 'प्रक्षेपण तत्त्वा'चा आपण उल्लेख केला आहे.[४] प्रक्षेपण म्हणजे फेकणे. सूर्यचंद्रादि, वट-पिंपळादि, सिंहगजादि, वस्तुमात्र व प्राणिमात्र यांचा प्रातिनिधिक उपयोग करून त्यांच्यावर आपण आपल्याच मनातील विकारांना व विचारांना फेकत असतो. म्हणजे प्रक्षेपणात आरोपण असते. गुलाबाच्या झाडावर आपण जसे कलम लावतो तसे ह्या वस्तुमात्रांवर आपल्याच भावभावनांचे कलम लावीत असतो. तेव्हा पुराणकथेमध्ये आशय शब्दशः किंवा अर्थशः बघून चालावयाचे नाही तर तो अर्थ आपण संकेतशः ध्यानात घ्यावयास पाहिजे. आज मराठी वाङ्मयात पौराणिक ग्रंथांचा आधार घेऊन अनेक कादंबऱ्या, नाटके लिहिली गेली आहेत. या पुस्तकांवर अनेक प्रकारची टीका केली जाते. ही टीका करताना 'पौराणिक सत्य' व 'ऐतिहासिक सत्य'हा भेद आपण अवश्यमेव केला पाहिजे. अनेकदा ज्या पुराण-कथांबाबतचे आक्षेप असा भेद न मानल्यामुळेच उद्‌भवतात. अलिकडील चित्रपट जसे सिनेमास्कोपिक असतात तशी पौराणिक कथा ही देखील एक विशाल-पट आहे. हा जीवनपट आहे. 'गेस्टाल्ट' वादाच्या किंवा आकृतिवादाच्या परिभाषेत सांगायचे तर ही एक साकल्यरूपाची आकृती आहे.[५]

जीवनाची एकच एक समग्र आकृती काढावयाची, त्यात तर्क आणि भावना यांचाही अंतर्भाव करावयाचा, ती कल्पनारंजनापेक्षा अधिक जिव्हाळ्याची व गंभीर करावयाची, तिच्यात अनुभव आणि अभिव्यक्ती भरावयाची तर तिचे स्वरूप पौराणिकच राहणार. महाभारतामध्ये किंवा इतर पौराणिक ग्रंथांमध्ये देखील हे जीवनाचे अतिविशाल स्वरूप अभिव्यक्त झालेले आढळते. एखादा सूक्ष्म जंतू आपणास केवळ डोळ्यांनी दिसू शकत नाही परंतु दुर्बिणीच्या साहाय्याने आपण त्याचे स्वरूप पाहू शकतो त्याप्रमाणेच या पौराणिक कथेमध्ये किंवा आदिम–कथेमध्ये असते. आपल्या एका जीवनात स्थलकालाचे बंधन जमेस धरून आपल्याला जर अनेक पिढ्यांचे, अनेक जन्मांचे, अनेक मरणांचे, दैवी, दानवी व मानवी दर्शन घ्यावयाचे तर ते पुराण–कथेमध्येच प्रतिबिंबित झालेले दिसेल. याप्रमाणे मिथ्यकथा ही जीवनानुभूतीची साकल्यस्वरूप समग्राकृती आहे.

येथे 'आकृतिवाद' या संप्रदायाचा परिचय करून देणे आवश्यक आहे. आधुनिक मानसशास्त्रात 'आकृतिवादाचा' संप्रदाय मान्यता पावलेला एक संप्रदाय आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की चित्र-पटामध्ये खरे पाहिले असता खंडित स्वरूपात अनेक चित्रे सादर केलेलीत असतात परंतु ह्या चित्रांचा तुटक-पणा न जाणवता त्यातील सलगपणा अखंडित स्वरू-पातच आपल्याला जाणवतो. तद्वत मनाचा कल असतो. आकृतिवादाचे म्हणणे असे की प्रतीत होणाऱ्या फटी किंवा त्रुटी भरून काढावयाची अशीच आपल्या मनाची स्वाभाविक घडण असते. ह्या जीवनामध्ये स्थलकालीन व जीवनमरणयुक्त फटी भरून काढण्या-साठी या पुराणकथेचे माध्यम मानवास सर्वात समर्पक वाटते. याप्रमाणे पुराणकथा ही मानवी जीवनाची समग्राकृती आहे. जीवनातील वनस्पतीजीवन, प्राणी-पक्षीजीवन आणि मानवीजीवन यामध्येही जाणवणाऱ्या फटी पौराणिक कथेमध्ये सांधल्या जातात आणि ह्याच अनुभवपट अधिक ताणला तर एका टोकाला दानवी कोटी आणि दुसऱ्या टोकाला दैवी कोटी येईल. या कोटींचीही जीवनाच्या एकट आकृतीत आपण भर घालीत असतो. तेव्हा दानवी, मानवी आणि दैवी या सर्वांचा अर्थातच पुराणकथेमध्ये समावेश असतो.

ज्याअर्थी अनेक जन्ममरणांचे फेरे पुराणकथेमध्ये आविष्कृत होत असतात त्याअर्थी ही सर्व विविधता ज्याच्यासमोर आविष्कृत होईल तो साक्षी प्रेक्षक अर्थातच एकतर अतिदीर्घायु तरी होईल किंवा दैवी तरी होईल. अशाप्रकारे अनेक जन्ममरणांचे फेरे त्याच्यासमोर उलगडतात.

याप्रमाणे पुराणकथा ही जीवनाची (१) समरूप (२) प्रक्षेपणरूपी (३) समग्र आकृती आहे. (४) संस्कृतीचे आणि परंपरेचे कण चिकटल्यामुळे व ही पुराणकथा समाजाभिमुख असल्यामुळे तिच्यामध्ये सामुदायिक अबोधावस्था प्रतिबिंबित झालेली असते. (५) तिचा अनुवाद दैवी, मानवी व दानवी अस्ति-त्वाचे आविष्करण हा आहे. (६) हा सर्व आविष्कार ज्याच्यासमोर घडतो तो प्रेक्षक अमर्त्यवत् आहे.





अनुक्रमणिका

लेखिकेला शेवटी हे म्हणावयाचे आहे की पुराणकथा अशी जीवनाची समरूप प्रक्षेपणरूपी सामुदायिक अवोधावस्थेचे आविष्करण करणारी आहे. तिचे अवश्यमेव अंग अद्भूतता आणि अर्थधूसरता हे आहे. तिच्यामध्ये जीवनपट अतिविशाल केला जातो. तिला पडताळून पाहावयाचा 'निकष' असू शकतो काय ? असू शकल्यास त्या निकषाचे स्वरूप काय याबद्दल आपण जागरूक राहणे आवश्यक आहे. येथे आवर्जून असे म्हणण्याचे कारण असे की आजचे मराठी वाङ्मय अशा प्रकारच्या कथा कादंबऱ्यांनी व टीकासमीक्षणांनी आकर्षित झाले आहे. विस्तारभयास्तव त्यातील काही ग्रंथांचा उल्लेख शेवटी केला आहे. धार्मिक, सामाजिक किंवा राजकारणयुक्त प्रेरणा अशा लेखनामध्ये डोकावल्या तर त्यांचा हेतू पुराणकथेचे खरे मर्म काय याहून भिन्न असू शकतो. अर्थधूसरता आणि अनुभवधूसरता हे ज्या पौराणिकतेचे रहस्य आहे तिचे अनेकशः अर्थीकरण होणारच. सामाजिक व राजकीय संदर्भानुसार पुराणकथेचे अर्थही भिन्न भिन्न केले जाणार किंबहुना तसे होऊ शकले नाही तर ती पुराणकथाच नव्हे. परंतु विशिष्ट लेखकाने सादर केलेला अर्थ तेवढाच तो खरा हा अविर्भाव मात्र अयोग्य आहे. वास्तव–कल्पना, भास–आभास, सत्य–मिथ्य, या सर्वांचे एकत्र रसायन ज्या पुराणकथेमध्ये सापडते तिचे मर्मग्रहण करावयाचे तर 'पुराणकथेचा अर्थ' या विषयावर आपणास सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.

□ □

---

संदर्भ


(१) युंग, सी. जी., 'Collected Papers on Analytical Psychology', अनुवाद : सी. लाँग (Bailliere, Tindall & Con, 1920)

(२) लेव्ही ब्रुहल, 'How Natives Think', Cambridge Univ. Press (1920)

(3) Malinovski, B., 'Myth in Primitive Psychology' Cambridge Univ. Press, (1926)

(4) Whitehead, A. N., 'Symbolism : Its Meaning & Effect' Cambridge Univ. Press (1928)

(5) Kohler, W., 'Gestalt Psychology' H. Liveright, New York.

(6) १. वाळिंबे, रा. शं., 'राधेय कर्ण', जोशी–लोखंडे प्रकाशन (१९७१)

२. साधले, आनंद., 'हा जय नावाचा इतिहास आहे', मॅजेस्टिक, (१९६४)

३. पेंडसे, शं. के., 'महाभारतातील व्यक्तिदर्शन', मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, (१९६४)

४. हरदास, बाळशास्त्री, 'महारथी कर्ण', भारत प्रकाशन, (१९५०)

५. कर्वे, इरावती, 'युगान्त', देशमुख आणि कंपनी (१९६७)

६. देशमुख, विजय, 'सूर्यपुत्र', हिंदू धर्म संस्कृती मंदिर प्रकाशन.

७. पणशीकर, दाजी, 'कर्ण खरा कोण होता', अस्मिता प्रकाशन, (१९७६)

# नाथांचे रुक्मिणी स्वयंवर : एक लौकिक पातळी

मधु जामकर

नाथांच्या रुक्मिणी स्वयंवराचा विचार नेहमीच अध्यात्म पातळीने केला जातो. अध्यात्म बोध, कृष्ण भक्ती आणि समाज चित्र या तिन्हींचा सुरेख संगम या काव्यात दिसतो. मराठी आख्यान कवितेच्या प्रवाहात रुक्मिणी स्वयंवराने एक नवी परंपरा निर्माण केली. आपल्या अगोदरच्या परंपरेला नवे वळण दिले. प्रपंच आणि परमार्थ यांच्या समन्वयातून समोरील श्रोत्यास नाथांनी ब्रह्मनिरूपणाचा आस्वाद दिला. अध्यात्माच्या प्रभावाखाली या कथेतील नाटय दडपून गेले. त्यामुळे तिच्यात लवचिकपणा आला नाही. नाथांजवळ बुद्धिचापल्य अधिक आहे, त्यामानाने प्रतिभा जेमतेमच अशा आशयाचे ठराविक विवेचन या कथेबावत केले जाते. परंतु या समग्र कथेतील सुसंगत अशी लौकिक पातळी आपण पाहू गेल्यास तिच्या अभूतपूर्व गतिमानतेला ती कशी अनुकूल झाली आहे ते कळेल. यातूनच नाथांच्या काव्याची बैठक व त्याचा उठाव अधिक दिसेल. हे समग्र आख्यान लौकिक दृष्टीच्या वाचकांची तहान भागविण्यास समर्थ आहे. रुक्मिणी–कृष्ण विवाहाची कथा प्रथम एका नाथ-कालीन युवक-युवतीच्या विवाहाची कथा आहे व नंतर ती जीवा–शिवाच्या ऐक्याची कथा आहे. किंबहुना सगुणाला गोचर केल्याशिवाय निर्गुणाला अर्थ येत नाही या भावनेतून नाथ आपल्या काव्याची सहज सुंदर लौकिक पातळी साकार करतांना दिसतात.

पहिल्याच प्रसंगात उपवर कन्या रुक्मिणी कृष्ण वर्णन ऐकून मूर्च्छित होते. त्यात नाथांची गोचरता पुढील प्रमाणे दिसते :

आंग जाहले रोमांचित । नेत्री बाष्प पैं दाटत
शरीर चळचळां कांपत । पडे मूर्च्छित धरणीये. १/८८

तिच्या या अवस्थेचे राजा भीष्मकाने अचूक निदान केले आहे. पितृहृदयाने जेव्हा आपल्या कन्येच्या हृदयातील आंदोलन पाहिले तेव्हा स्वतः तो पुढील निर्णयाप्रत येऊन पोचला :

"रायासी कळले हे चिन्ह । ईस जाहले कृष्णश्रवण
तेथेचि वेधले असे इचे मन । कृष्णार्पण हे करावी." १/९९

नाथांनी या नाटयपूर्ण प्रसंगात पुढील कथेतील गति-मानतेचा गाभाच पकडला आहे. या पार्श्वभूमीवर कीर्ति नावाच्या ब्राह्मणाने कृष्णरूपाचे केलेले वर्णन अगम्य वाटते. त्यात वर्णनशैलीतील वस्तुनिष्ठता व नाथांची आत्मनिष्ठा एकरूप झाल्याने त्यांची भक्ति-मार्ग प्रवृत्ती येथे ढवळून जाते. शांत शृंगाराच्या अद्भुत रम्यतेने कृष्णवर्णन हा एक काव्य कलेचा उत्कर्ष झाला आहे.

नाथांचे रुक्मिणीवर्णन हे कृष्णवर्णनापेक्षा अधिक लौकिक पातळीवर तरंगणारे आहे. जीव–शिव ऐक्या-तील रुक्मिणी हा 'जीव' असल्याने तिची सजीवता नाथाने आत्मप्रत्ययाने साकार केली आहे. कृष्णवर्णन ऐकून रुक्मिणीचे आईने तोच रुक्मिणीला योग्य वर आहे असे सुचविले. आईबाप कृष्णाच्या बाजूने कळताच रुक्मी कृष्णाची निंदा करतो. नंतर लग्नाची ज्योतिषदृष्टया चर्चा होते. या चर्चेचा रोख आपली गाठ शिशुपालाशी घालून देण्याचा आहे असे ध्यानात येऊन रुक्मिणी घाबरते. नाथांनी हा सारा प्रसंग जेवढा नाटयपूर्ण तेवढाच घरगुती वातावरणानी समृद्ध केला आहे. रुक्मिणी आपले मनातील गूज सांगण्यास उत्सुक आहे

" गुज सांगू मायेपाशी । परी हे साध्य नणेल तियेसी
रडु निघेल मोहेसी । मिठी लोभेसी घालुनी "
२।१४५

वसुदेव नामक ब्राह्मणाकरवी तिने कृष्णास पाठविलेले पत्र तिच्या हृद्गतांनी संपन्न झाले आहे. हे पत्र वाचून कृष्णाला त्या रात्री झोप येत नाही. तिच्या हाकेला धावून जाण्याचे तो ठरवतो. कृष्ण आणि रुक्मिणी यांच्या नाजूक प्रीतीचा सुरेख आलेख नाथ आपणापुढे ठेवतात व त्यातून निष्कर्ष काढतात की :–

" जया हृदया जैसा भावो । तयासी तैसा भेटे देवो
भीम की कृष्णमय पहा हो । उठिवला देवी सत्वर " ४।६८

रुक्मिणीच्या पत्रिकेतील उत्कट भक्तिभावाने कृष्णाचे अंतःकरण सद्गतित झाले एवढेच नाथांचे सांगणे नाही तर त्या दोन अंतःकरणातील भावगोचरता शब्दबद्ध करणे हा त्यांचा हेतु आहे. पहिल्या एक ते सात प्रकरणात जे रुक्मिणीहरण झाले आहे त्यातील समग्र लौकिक पातळी नाथांनी आपल्या कलासृष्टीशी एकरूप होऊन सांगितली आहे. नाथांचे प्रापंचिक मन एका कुटुंबाची कथा आपल्यासमोर साकार करीत आहे. साहाजिकच त्या कुटुंबातील आई, वडील, कन्या, भाऊ, प्रियकर, प्रेयसी, भावजय आदी घटक त्या कथेचाच एक भाग होऊन जातात. कौटुंबिक वातावरण निर्मितीने तिला आगळे रुप प्राप्त होते. तिच्या मागे प्रथम प्रापंचिक ओढ आहे व नंतर पारमार्थिक ओढ आहे.

कृष्णाकडील वर्तमान न कळल्यामुळे रुक्मिणीच्या मनात संशय रत्नमाला सुरू होते. तिचा डावा डोळा अकस्मात लवू लागतो. तिचे अंतःकरण कृष्णचिंतेने व्याकूळ होते. हे सारे वर्णन नाथ आपल्या प्रतिभेने काव्यमय करतात. रुक्मिणीच्या अधीर मनाची आंदोलने त्यांनी अत्यंत कुशलतेने रंगविली आहेत. आपण आईबापास न विचारता कृष्णास पत्र पाठविले हा तिचा संशय स्त्री हृदयाचा उत्कृष्ठ नमुना आहे. कृष्ण तन्मयतेने रुक्मिणी सर्व शरीरभाव विसरते या तिच्या तदात्मवृत्तीचे अष्टसात्विक भाव नाथांची कुशल लेखणी साकार करताना आपण पाहतो. येथे रुक्मिणी आपणासमोर उभी राहते ती अलौकिक पातळीवरून नव्हे तर आपल्या विश्वासातील एक विवाहोत्सुक कन्या म्हणूनच. यावेळी नाथ अत्यंत सहृदयतेने हळुवारपणे तिला साकार करतात :

" लीला कमल घेता हाती । कृष्णचरण आठवती
नयनी अश्रु लोटती । कृष्ण प्राप्ती लागी पिशी
नेत्री अश्रुंचिया धारा । दुःखे कांपतसे थरथरा
धरिता न धरवेचि धीरा । विकळ सुंदरा जातसे " ५।६६,७५

रुक्मिणीच्या या विकल अवस्थेची कृष्णाला देखील जाणीव आहे. दोघेही परस्परास अनुरूप व मीलनोत्सुक असल्याने सारा विरह द्वैतातून अद्वैताकडे जाणारा झाला कृष्णाने शक्यतो लवकर जाण्याचे सुदेवास सांगितले व त्या सुदेवास पाहून रुक्मिणी आपल्या स्त्रीसुलभ वृत्तीने कृतार्थ झाली. उपवर स्त्री–पुरुषाच्या हृदयातील भावपूर्ण लाटा नाथांनी तद्रूपतेने शब्दबद्ध केल्या आहेत. त्यामुळे त्यातील रसवत्ता आगळी वेगळी वाटते. एखाद्या स्त्रीची प्रेमात पडल्यानंतरची लौकिक पातळी, तिची अधिरता, उत्कंठा, असहायता, तिचे ओक्साबोक्सी रडणे, तिचा गहिवर, तिची विकलता याचे वर्णन लोकप्रसिद्ध प्रेम भावनेच्या सूक्ष्म छटाने रंगविले आहे. अशावेळी नाथांच्या अध्यात्माचे भान राहत नाही तर त्यांनी केलेल्या व्यक्तिरेखेचे सामान्यीकरण आपल्या मनाला भुरळ पाडून जाते. रुक्मिणी व भीष्मक या दोघातील भांडण देखील वास्तवपूर्ण वाटते. प्रेम विवाहाच्या पार्श्वभूमीवर व खलनायकाच्या वृत्तीने रुक्मिणी–कृष्ण विवाहातील चढउतार नाथ सहजतेने मांडून जातात. त्यातही पुन्हा रुक्मिणीवर्णनातील कोमलता आणि मधुरता नाथांच्या सौंदर्यासक्त मनाने उजळून गेली आहे.

नाथांची युद्धवर्णनातील संवादशैली ही त्यांच्या लौकिकपातळीने आपल्या आशयाशी एकरूप झाली आहे. या दृष्टीने जरासंध आणि बलराम यातील संवाद पाहण्याजोगे आहेत. या संवादामागे परस्परांची वृत्ती धावून येत असल्याने हा सारा प्रसंग त्यातील नाट्य साकार करून जातो. दोघांनीही एकमेकास दिलेल्या उपमा जेवढ्या काव्यात्म तेवढ्याच त्यांच्या मनोवृत्तीदर्शक झाल्या आहेत. नाथांच्या वर्णनातील सांकेतिकता लक्षात घेऊनही तिची या

नाटयपूर्ण प्रसंगातील अनुकूलता वाचनीय वाटते. शिशुपालाची शोचनीय अवस्था व त्याच्या आईचा युक्तिवाद नाथ सामर्थ्यपूर्ण लेखणीने साकार करतात. शिशुपाल रुक्मिणीहरणाने खिन्न होऊन मूर्छित झाल्यावर त्याची आई शोक करते. भोळी आई शोक करताना आपले खरे मन उघड करते. माझे सुनमुख पाहणे राहिले. लग्न सोहळा बुडाला. रुक्मीने मुहूर्त चांगला काढला नाही. कृष्णपराक्रमाची तिने केलेली भोळी मीमांसा काय, तर त्याने मात्र उत्तम मुहूर्त काढून कार्यभाग साधिला. या आईच्या युक्तिवादात स्वभावनिष्ठ विनोदाची छटा असली तरी नाथांनी एका आगळया वेगळया स्त्रीची लौकिक पातळी समृद्ध केली आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर नाथांची विनोदी शैली उठून दिसेल पण तिने न कळत एका जिवंत व्यक्तिरेखेस वास्तवतेच्या पातळीवर नेले यात शंका नाही.

अशीच पातळी रुक्मी आणि कृष्ण युद्धप्रसंगी रुक्मिणीने गाठली आहे. कृष्ण जेव्हा रुक्मीस 'दे माय धरणी ठाय' करतो तेव्हा एका बहिणीने आपल्या भावाविषयी काढलेले भावपूर्ण उद्‌गार येथे प्रगट होतात :

'मारू नको ज्येष्ठ बंधू । लोका विरुद्ध न करावे'

या तिच्या उद्‌गारात व्यवहार आणि मनोवृत्ती याचा सुरेख संगम दिसून येतो. कृष्ण रुक्मीचा शिरच्छेद न करता विटंबना करतो. यावद्दल बलराम कृष्णास दोष देतो हे सांगण्यास नाथ विसरत नाहीत हे विशेष. जरासंधाने शिशुपालास केलेला बोध, बलरामाने रुक्मिणीस केलेला बोध त्यामानाने रेवतीचा रुक्मिणीस उपदेश अधिक वास्तवपूर्ण वाटतो. त्यात रेवतेची ज्येष्ठता आणि रुक्मिणीची गृह कुशलता प्रतिबिंबित झाली आहे. या दोन्ही स्त्रिया संसारप्रिय असल्याने त्यांचे सारे लक्ष त्यातील सौख्याकडे, ऐहिक बाबींकडेच. येथे नाथांनी नेमके स्त्रीवर्गावर बोट ठेवले आहे. साहजिक आदर्श गृहिणीदर्शनाचे समाधान आपणास मिळते. त्यामानाने शेवटच्या प्रसंगातील वेश्या आणि संन्यासी यांचा संवाद समाजदर्शनाचा जसा एक भाग तसा उच्च–नीच मनोवृत्तीचा एक दाखला म्हणून पाहता येईल. त्यातील लौकिक पातळी नाथ अत्यंत कुशलतेने साकार करतात. कणिक कशी चाळावी, पुरण पोळचा, लाडू कसे करावे हा सामान्य उपदेश त्यातील सामान्य पातळीमुळेच वास्तववादी व कथेच्या मूळ व्यक्तिरेखेशी पूरक झाला आहे. त्यामानाने वेश्येच्या तोंडी आलेला असामान्य उपदेश नाथकालीन समाजमनाचा परिपाक झाला आहे. नाथांच्या या कथेतील पात्रे नेहमीच लौकिकातून अलौकिकाकडे व अलौकिकाकडून लौकिकाकडे दोलायमान होताना आपण पाहतो. त्यांची ही संक्रमावस्था, अस्थिरता, लौकिक व वास्तववादी जीवनाचा पारदर्शक भाग आहे. नाथांना मानवी स्वभावाचे अचूक व मार्मिक ज्ञान असल्याने आपल्या कथेत त्याचा त्यांनी कलात्मक उपयोग करून घेतला आहे.

हीच लौकिकता १४ ते १८ प्रसंगात सामाजिक, धार्मिक लग्नविधीचे विस्ताराने वर्णन करते. नाथ जेव्हा प्रापंचिक वा लौकिक घटनेचा अर्थ अध्यात्मपर लावतात तेव्हा त्यामागे असलेले त्यांचे ऐहिक मन नेहमीच साकार होण्यासाठी आसुसलेले असते. त्यांनी यशस्वी गृहस्थाश्रमात प्रपंच–परमार्थाची एकरूपता साधली, नव्हे सारा प्रपंच मुळी परमार्थाच्या पातळीवर नेला. अशावेळी नाथांचे साकार झालेले सगुण अमूर्ताच्या पातळीवर जाते. आपल्या या प्रेमकथेचे आणि वीर कथेचे रससौंदर्य आबालवृद्धांना मिळावे, समाजातील सर्व थरावरील माणसे तिच्या प्रवाहात सुस्नात व्हावेत ही त्यांची आंतरिक इच्छा आहे. त्याच बरोबर या थरावरील बहुरंगी माणसे, त्यांची विविध अशी वृत्ती या श्रोत्यांना आणून द्यावी हाही त्यांचाच कार्यभाग. लग्नविधीचे एवढे रसाळ व सविस्तर वर्णन कोण्याही रुक्मिणी स्वयंवरात सापडणार नाही, एवढे नाथांनी ते वास्तववादी केले आहे. त्यातही पुन्हा प्रसंगानुरूप लौकिकता आहेच. श्रीकृष्णाकडील वऱ्हाड विदर्भाला चालले त्याचे वर्णन विनोदी शैलीने अधिक वास्तवपूर्ण झाले आहे. मधुपर्काच्यावेळी कृष्ण मेहुण्या-देखत दही चाखावयास लाजू लागले त्यावर मेहुणे त्यांना खोचून विचारतात हा प्रसंग देखील नाथांच्या समयसूचकतेने रसाळ झाला आहे. यादव व शिशुपाल यांच्या युद्धात मेलेल्या योध्यांचा हेतु दांभिकतेने मानवी मनाचा औचित्यपूर्ण स्वभाव दाखवितो. नाथांचा विनोद कधीच निखट होत नाही. उलट तो मोठ्या हळुवारपणे व सत्यदर्शनलालसेने मानवी मनातील विसंगती व प्रसंगातील मानवी मनाचे विशेष उघड

करून दाखवितो. रुक्मिणी कृष्ण यांच्या मिरवणुकी पहावयास येणाऱ्या मंडळीच्या वर्णनामागे देखील हीच लौकिकवृत्ती आहे. नाथ येथे मानवी शरीर धारण करणाऱ्या माणसांचे बहुरूप प्रगट करतात. अशावेळी नाथांचे उदारमन व विशाल व्यक्तिमत्त्व भोवतालच्या परिस्थितीत आपला समाज साकार करण्यासाठी आलेले असते. आजूबाजूच्या परिस्थितीतून नाथांचे हे आख्यान ढवळून आले व त्यातील अलौकिक पात्रांतील लौकिकता शब्दांच्या माध्यमातून ओसंडून आली. एका व्यक्तीमनाने समाजमनाशी सांधलेले नाते या कथेतून आपण पाहतो.

नाथांच्या रुक्मिणी स्वयंवराची एवढी वैविध्यपूर्ण लौकिकपातळी जमेस धरता त्यातील काव्यात्मपातळी तपासणे अधिक सोपे होते. नाथांचे लौकिक जीवन हाच एक परमार्थ होता. त्यांच्या या अद्वैत व्यक्तिमत्वाशी त्यांची कला एकरूप झाली आहे. संसार आणि परमार्थ यांच्या समन्वयातून तसेच विचार आणि भावना यांच्या विकासातून त्यांच्या अभिव्यक्तीचा विकास झालेला आपणास दिसतो. नाथांचे साहित्य बहुरंगी व बहुढंगी आहे. याचाच अर्थ ते विविध असे आशयसंपन्न आहे. आपल्या आशयाला अनुकूल अशी अभिव्यक्ती त्यांनी जोपासली व त्यातून त्यांनी आपल्या कलेचा प्रपंच थाटला. आपले एकसंधी व सर्वांगपूर्ण व्यक्तिमत्व त्यातून ओघवत्या प्रवाहाने आल्याचे आपण पाहतो. त्यांच्या कलेतील अभिव्यक्तीत याच व्यक्तिमत्वाचा आविष्कार झालेला आहे. त्यांच्या या व्यक्तिमत्वाचा प्रवाह नेहमीच निर्भयपणे, आत्मविश्वासाने आपल्या ध्येयपूर्तीकडे जातांना दिसतो. नाथांना अध्यात्माची जी ओढ आहे ती उपरी नसून त्यांच्या व्यक्तिमत्वाचाच तो एक अंगभूत असा घटक आहे. सहाजिकच रुक्मिणी स्वयंवरासारख्या आख्यानात येऊ पाहणारे अध्यात्म त्यांच्या शैलीचा सहज असा आविष्कार झाले आहे.

नाथ जेव्हा अमूर्तासाठी आतुर झालेले असतात तेव्हा त्यांचे मूर्तच त्यांची ही आतुरता शमविण्यास समर्थ असते. नाथांनी आपल्या काळात स्वतःचे प्रतिबिंब पाहिले व आपल्या व्यक्तिमत्वात त्याला सामावून घेतले ही समरसताच त्यांना कलेकडे घेऊन जाणारी आहे. नाथांचे सारेच साहित्य अध्यात्मसूत्राने प्रयोजनवर्ती झाले आहे. पण आपल्या अभिव्यक्तीतील अनेकविध रंगछटा, कथालेखकाचे चातुर्य, तिच्यातील गतिमानता आशयबद्ध करताना दिसते. नाथांचे प्रसंगवर्णन, वस्तुवर्णन आणि स्वभाववर्णन जेवढे वैविध्यपूर्ण तेवढेच ते त्यातील मानवीछटांनी औचित्यपूर्ण झाले आहे. शिवाय या शैलीत रसाळपणा मिसळल्याने त्यातील पाल्हाळ खटकत नाही. यामुळे या आख्यानातील गतिमानता कथेशी एकरूप झाली आहे. नाथांच्या या कथा प्रवाहात आपणही तिच्याबरोबर वहात जातो. त्यातील माणसे ही जेव्हा आपल्याशी दृढतेचे नाते जुळवितात तेव्हा या प्रवाहाचे वळण आगळे वेगळे होते. रुक्मिणी स्वयंवर मुळातच एक अमर अशी प्रेमकथा आहे. नाथांनी तिचे सामान्यीकरण करून मानवी वृत्तीशी तिची सांगड घातली. सहाजिकच तिचा ओघ समाज जीवनाशी, पर्यायाने मानवी जीवनाशी एकरूपता घेतो. प्रेमाची परिपक्व अवस्था भक्ती आहे व भक्तीचे रमणीय रूप प्रेम हेच आहे. अशा दुहेरी वळणाने या कथेचा सांधा जुळविला गेल्याने तिची गोडी अपूर्व झाली आहे. नाथांनी ही समग्र कथा लौकिकपातळीशिवाय कथन केली असती तर तिचे कलात्मक रूप वेगळे झाले असते. जेव्हा अध्यात्मवादी वळणाने या आख्यानाची चर्चा होते तेव्हा तिचे हे अंगभूत व अनन्यसाधारण रूप लक्षात आणणे तितकेच अगत्याचे आहे.

□ □

# नैतिक चिकित्सेचे स्वरूप

सुरेश बखले

आजच्या जगात वैज्ञानिक प्रगतीकडे, मग ती तात्त्विक असो की तांत्रिक असो, आपण डोळेझाक करू शकत नाही ! तसेच पाश्चात्य तत्त्वज्ञानातील निरनिराळ्या प्रवाहांकडेही आपल्याला पाठ फिरविता येणार नाही. त्यांची दखल आपल्याला घ्यावी लागेल. ते विचार आपण स्वीकारलेच पाहिजेत असे नाही, ते आपल्याला पटतीलच असेही नाही. तरी ते आपण समजून घेतले पाहिजे, त्यांची त्यासारख्या आपल्याकडील विचारांची तुलना केली पाहिजे असे मला वाटते. या उद्देशाने प्रस्तुत लेखात प्रथम मी नैतिक चिकित्सेचे स्वरूप ? थोडक्यात स्पष्ट करून नंतर आर्. एम्. हेअर[२] या आधुनिक तत्त्वज्ञाची भूमिका संक्षेपाने स्पष्ट करणार आहे.

नीतिशास्त्रात कशाचा, म्हणजे कशाविषयी, विचार करण्यात येतो हा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे तितकाच अवघडही आहे. या प्रश्नाचे अत्यंत मोघम परंतु सहज सुचणारे उत्तर म्हणजे, 'नीतिशास्त्रात नीतिविषयी अथवा नैतिकतेविषयी विचार करण्यात येतो,' हे होय. परंतु या उत्तराने आपले समाधान होणार नाही. कारण 'नीति म्हणजे काय ?' हा प्रश्न आपल्या मनात निर्माण होईल. आणि या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिल्याशिवाय 'नीतिशास्त्र नीतिविषयी विचार करते' या विधानाचा अर्थ आपल्याला समजणार नाही.

व्यवहारात आपण असे म्हणत असतो की, 'भारताची राष्ट्रीय आणि आन्तरराष्ट्रीय नीति बरोबर नाही (अथवा आहे)', 'भारताची आर्थिक नीति समाजाला पोषक आहे (अथवा नाही)'...वगैरे. तसेच आपण असेही म्हणत असतो की, 'विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण दिले पाहिजे,' 'जे सदस्य विधीमंडळात अथवा लोकसभेत निवडून जातात त्यांच्यावर एक प्रकारचे नैतिक बंधन असते, एक प्रकारची नैतिक जबाबदारी असते '...वगैरे. या सर्व संदर्भात 'नीति' अथवा 'नैतिक' या शब्दांच्या अर्थात 'व्यवहार' 'परस्पर संबंध' हा अर्थ अभिप्रेत आहे. परंतु एवढाच नाही. म्हणूनच नीतिशास्त्रात नीतीचा अथवा नैतिकतेचा विचार करण्यात येतो म्हणजे त्यात व्यक्तींच्या व्यवहारांचा, त्यांच्या परस्पर संबंधाचा विचार करण्यात येतो असे आपल्याला म्हणता येईल. अर्थातच हा विचार कसा करण्यात येतो हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचा विचार दोन प्रकारे, म्हणजे दोन दृष्टिकोणातून, करता येतो. असा विचार करण्यालाच 'नैतिक चिकित्सा' असे आपण म्हणू शकतो.

पहिला दृष्टिकोण असा: नीतिशास्त्रात मानवी व्यवहारांचा अथवा आचरणाचा विचार करण्यात येतो ते या अर्थाने की त्यात आपण काय करावे हे सांगितले असते. 'अमुक अमुक कृती करा' (अथवा करू नका 'असे असे वागा' (अथवा वागू नका),' असे सांगण्यात येते. उदा. 'सत्य बोला', 'चोरी करू नका' असे सांगण्यात येते. म्हणजेच माणसाने समाजात वागायचे कसे याविषयी एक प्रकारचा उपदेश (Moralising) करण्यात येतो, एक प्रकारचा आदर्श सांगण्यात येतो. म्हणून नीतिशास्त्रात कोणते आचरण, किंवहुना कोणत्या प्रकारचे आचरण, प्रत्येकाने करावयास पाहिजे याविषयी मार्गदर्शन झाले पाहिजे असा एक दृष्टिकोण असू शकतो. सोईसाठी अशा दृष्टिकोणाला अथवा चिकित्सेला आपण 'प्रथम स्तरीय चिकित्सा' (First order discourse) म्हणू. या स्तरावर आपल्या चिकित्सेचा विषय व्यक्तीचे आचरण असते.

दुसरा दृष्टिकोण असा : व्यक्तीच्या आचरणाचा विचार करताना ते आचरण 'योग्य' (अथवा अयोग्य) आहे, अथवा 'इष्ट' (अनिष्ट) आहे या विषयी विचार करणेही शक्य आहे. म्हणजे एखादे आचरण 'योग्य' अथवा 'इष्ट' आहे असे म्हणत असतांना 'योग्य' आणि 'इष्ट' या शब्दांचे, संकल्पनांचे, अर्थ काय होतात याचाही विचार करणे शक्य आहे. अर्थातच असा विचार करतांना विशिष्ट आचरण योग्य अथवा इष्ट **कसे** ठरते, त्याचा **निकष** कोणता याचाही विचार करणे आवश्यक ठरते. उदा. आपण जेव्हा असे म्हणतो की, 'काळावाजार करणे अयोग्य आहे', 'समानतेने व्यवहार करणे इष्ट आहे.' तेव्हा विशिष्ट मानवी व्यवहाराला आपण 'अयोग्य' अथवा 'इष्ट' ठरविले असते. विशिष्ट निकषानुसार ते व्यवहार 'अयोग्य' अथवा 'इष्ट' आहेत असा निर्णय आपण दिलेला असतो. थोडक्यात, एखाद्या व्यक्तीने केलेल्या आचरणाविषयी अथवा विशिष्ट प्रकारच्या आचरणाविषयी नीतिशास्त्रात विचार करणे म्हणजे ते आचरण योग्य अथवा इष्ट आहे की नाही हे **ठरविणे** होय. असे ठरवीत असताना ज्या निकषाच्या आधारे आपण हे ठरवीत असतो त्या निकषांचा विचारही या संदर्भात आवश्यक ठरतो. सोईसाठी अशा दृष्टिकोणालाच अथवा चिकित्सेला आपण 'द्वितीय स्तरीय चिकित्सा' (Second order discourse) म्हणू. या स्तरावर आपल्या चिकित्सेचा प्रत्यक्ष विषय हा व्यक्तीचे आचरण नसते, तर ज्या संकल्पनांच्या साह्याने आपण निर्णय घेतो त्या संकल्पना आणि त्या संकल्पनांच्या उपयोगाचे निकष असतात. अर्थातच अशी चिकित्सा प्रामुख्याने भाषिक असते.

आधुनिक काळात पहिल्या दृष्टिकोणाला 'आदर्शी नीतिशास्त्र' (Normative Ethics) म्हणतात, तर दुसऱ्या दृष्टिकोणाला 'अतीनीतिशास्त्र' (Metaethics) अथवा 'नैतिक तत्त्वज्ञान' (Moral Philosophy) असे म्हणतात. यापैकी नीति–उपदेशक (Moralists) पहिला दृष्टिकोण स्वीकारतात, तर नैतिक तत्त्वज्ञ (Moral Philosophers) दुसरा दृष्टिकोण स्वीकारतात. याप्रमाणे नीतिशास्त्राचा अभ्यास दोन भिन्न दृष्टिकोणातून होऊ शकत असला तरी यांचा एकमेकांशी काहीच संबंध नाही असे आपण समजता कामा नये. कारण ज्या संकल्पनांचा विचार नैतिक तत्त्वज्ञ करतात त्या संकल्पना शेवटी आचरणालाच लागू पडत असतात. तरीही आचरणाचा विचार करणे आणि संकल्पनांचा विचार करणे यात भेद आहे हे आपल्याला मान्य होऊ शकते. कारण 'मी **कोणती** कृती करावी ?' आणि 'मी ती कृती **का** करावी ?' हे दोन भिन्न प्रश्न आहेत. जसे, 'मी कोणत्या पुस्तकाचे परीक्षण करावे ?' हा प्रश्न, 'मी विशिष्ट परीक्षण का करतो ?' या प्रश्नाहून भिन्न आहे. पहिल्या प्रश्नाचा विषय 'पुस्तक' असून दुसऱ्या प्रश्नाचा विषय 'पुस्तकाचे परीक्षण' हा आहे, म्हणून त्याच्या उत्तरात 'परीक्षणाचे परीक्षण' अभिप्रेत असते, ती एक उच्चस्तरीय चिकित्सा असून ती भाषिक असते.

वरील पार्श्वभूमीवर हेअरचे मत आपल्याला असे सांगता येईल : 'नीतिमत्तेची भाषा' म्हणजे 'नैतिक विधाने आणि त्या विधानांत वापरण्यात येणारे नैतिक शब्द अथवा संकल्पना' होय, आणि 'नीतिमत्तेच्या भाषेची 'चिकित्सा' म्हणजे 'नैतिक विधानांच्या आणि नैतिक संकल्पनांच्या स्वरूपाचा आणि कार्याचा विचार' होय. यालाच 'नैतिक भाषेचे तर्कशास्त्र' म्हणतात.

नैतिक विधानांचे मुख्य कार्य **आदेशात्मक** (Prescriptive) असते. भाषेत आदेशात्मक कार्य आज्ञार्थक विधाने (Imperatives) आणि मूल्यात्मक विधाने (Value-judgments) करीत असतात. 'अमुक अमुक कृती कर (अथवा करा)', 'अमुक कृती करू नको (अथवा करू नका)' या स्वरूपाची जी नैतिक विधाने असतात ती आज्ञार्थक असतात. आणि म्हणून अशी विधाने ज्ञानार्थक आणि प्रश्नार्थक विधानांहून भिन्न स्वरूपाची असतात. तसेच, मूल्यात्मक विधानेही स्वभावतःच वर्णनात्मक विधानांहून भिन्न स्वरूपाची असतात. त्यांचा उद्देश विशिष्ट प्रकारच्या कृतींची **भलावण** (Commendation) करणे हा असतो. अशी भलावण करीत असतांनाच त्यायोगे माणसाला निवड करण्यामध्ये मार्गदर्शनही होत असते.

या संदर्भात एक मुद्दा आपण लक्षात ठेवला पाहिजे. तो असा की आज्ञार्थक वाक्ये ही दोन प्रकारची असतात. एक, नैतिक आज्ञार्थक वाक्ये, उदा. 'सत्य बोला !' आणि दोन, न–नैतिक (नैतिक

नसलेली) आज्ञार्थक वाक्ये, उदा. 'चालता हो!' त्याचप्रमाणे मूल्यात्मक विधानेही दोन प्रकारची असतात: एक, नैतिक मूल्यात्मक विधाने, उदा. 'सत्य बोलणे चांगले आहे,' आणि न–नैतिक मूल्यात्मक विधाने, उदा. 'हा चाकू चांगला आहे.'

अशा आदेशात्मक भाषेचा उपयोग आपण केव्हा, म्हणजे कोणत्या परिस्थितीत, करतो? या प्रश्नाचे उत्तर हेअर असे देतो की जेव्हा माणसासमोर अनेक पर्याय असतात आणि त्यापैकी कोणत्या पर्यायाची निवड करावी हे त्याला समजत नाही तेव्हा अशा आदेशात्मक भाषेचा उपयोग करण्यात येतो. तसेच एखादी कृती केल्यानंतर ती कृती का करण्यात आली याचा विचार करण्यासाठी, त्या कृतीचे समर्थन करण्यासाठी, आदेशात्मक भाषेचा उपयोग करण्यात येतो. हेअरची ही भूमिका पूर्णपणे समजून घेण्यासाठी आपल्याला आज्ञार्थक वाक्याचे आणि मूल्यात्मक विधानांचे स्वरूप व त्यांचा संबंध याचा तपशील पहावा लागेल. भाषेचा उपयोग आपण प्रामुख्याने माहिती देण्यासाठी अथवा मिळविण्यासाठी करीत असतो. हे कार्य ज्ञानार्थक आणि प्रश्नार्थक वाक्यांच्या साह्याने होत असते. परंतु याशिवाय भाषेत आज्ञार्थक वाक्येही आढळतात, ज्यांचे कार्य न माहिती देणे असते, न माहिती मिळविणे असते, तर आज्ञा देणे, इतरांना (किंवा स्वत:ला) कृती करायला सांगणे हे असते. ज्ञानार्थक वाक्य आणि आज्ञार्थक वाक्य यातील भेद हेअर खालील उदाहरणाच्या साह्याने स्पष्ट करतो.

'दार बंद कर!'—आज्ञार्थक वाक्य.

'तुला दार बंद करायचे आहे'—ज्ञानार्थक वाक्य.

वरील दोन्ही वाक्यांमध्ये एकाच विषयासंबंधी दार बंद करण्यासंबंधी–सांगितले असले तरी जे काही सांगितले आहे ते मात्र एकच नसून भिन्न आहे. ज्ञानार्थक वाक्याचा उपयोग दुसऱ्याला 'अमुक अमुक **आहे**'–असे सांगण्यासाठी करण्यात येतो, तर आज्ञार्थक वाक्यांचा उपयोग दुसऱ्याला 'अमुक अमुक **कर**' असे सांगण्यासाठी करण्यात येतो; एक ज्ञानाशी संबंधित तर दुसरे कृतीशी संबंधित आहे.

हा महत्त्वाचा भेद आपण आणखी एका प्रकारे लक्षात घेऊ शकतो. या वाक्यांना जेव्हा आपण होकार देतो, ती वाक्ये जेव्हा आपण स्वीकारीत असतो, तेव्हा त्यांच्या अर्थात होणारा बदल आपल्याला जाणवतो. एखादे ज्ञानार्थक वाक्य जेव्हा आपण स्वीकारतो, मान्य करतो, तेव्हा त्या वाक्याच्या अर्थासारखी परिस्थिती, वस्तुस्थिती, असली पाहिजे. असते, अशी आपली धारणा असते, विश्वास असतो. जसे, 'आज पाऊस पडत आहे' हे ज्ञानार्थक वाक्य जेव्हा आपण स्वीकारतो, मान्य करतो, तेव्हा वास्तविक पाऊस पडत असला पाहिजे, पडतो आहे, अशी आपली धारणा असते, विश्वास असतो. परंतु आज्ञार्थक वाक्यांच्या बाबतीत असे आपण म्हणू शकणार नाही. कारण त्यात वस्तुस्थिती कशी आहे हा प्रश्नच उपस्थित होत नाही, तर आपल्याला त्यायोगे वस्तुस्थितीत बदल करायचा असतो, ती घडवायची असते. म्हणूनच 'दार बंद कर!', हे आज्ञार्थक वाक्य जेव्हा आपण स्वीकारतो, म्हणजेच आज्ञा मान्य करतो, तेव्हा आपण विशिष्ट कृती करीत असतो, नव्हे, विशिष्ट कृती करण्यास आपण बांधलेले असतो. तेथे धारणेचा, विश्वासाचा, प्रश्न उपस्थित होत नाही. थोडक्यात आपण असे म्हणू शकतो की, ज्ञानार्थक वाक्य स्वीकारणे, मान्य करणे, म्हणजे विशिष्ट वस्तुस्थितीविषयी विश्वास व्यक्त करणे असून, आज्ञार्थक वाक्य स्वीकारणे, मान्य करणे, म्हणजे विशिष्ट वस्तुस्थितीत बदल करणे, कृती करणे होय. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, ज्ञानार्थक वाक्य स्वीकारणे म्हणजे ते सत्य आहे असा दावा (claim) करणे होय. परंतु आज्ञार्थक वाक्य स्वीकारणे म्हणजे कृती करणे होय. त्याच्या सत्यतेचा प्रश्नच उपस्थित होत नाही. म्हणूनच एखादे आज्ञार्थक वाक्य सत्य आहे असे म्हणणे निरर्थक ठरते.

आज्ञार्थक वाक्य आणि ज्ञानार्थक वाक्य यामध्ये असा मूलभूत भेद असला तरी त्यामध्ये एक प्रकारचा तार्किक संबंध असतो असे आपल्याला आढळेल. अशा संबंधाचे स्वरूप आपल्याला असे स्पष्ट करता येईल समजा, आपण एक विशिष्ट परिस्थितीत दुसऱ्याला, 'अमुक अमुक सांगू (अथवा म्हणू) नको!' अशी आज्ञा केली. यावर जर त्याने आपल्याला 'का?' म्हणून विचारले तर आपण 'ते खोटे आहे म्हणून' असे उत्तर देऊ शकतो. हेच आपण असे मांडू शकतो.

(१) 'क्ष' खोटे आहे.
'क्ष' सांगू नको!

असे म्हणत असताना ''(क्ष)' खोटे आहे' हे विधान ज्ञानार्थक आहे, तर ''क्ष' सांगू नको' हे विधान आज्ञार्थक आहे. आणि आपला असा समज होऊ शकतो की या उदाहरणात ज्ञानार्थक वाक्यावरून आज्ञार्थक वाक्य निष्पन्न केले आहे. परंतु हा आपला गैरसमज आहे हे या उदाहरणाचे विश्लेषण केल्यास लक्षात येईल.

वरील उदाहरणात ''क्ष' खोटे आहे, म्हणून 'क्ष' सांगू नको' असे म्हणत असताना 'जे खोटे असते ते कधीही सांगू नको' हे विधान गृहीत धरले असते. असे विधान गृहीत धरल्याशिवाय केवळ ''क्ष' खोटे आहे.' यावरून ''क्ष' सांगू नको' हे निष्पन्न होऊ शकत नाही. म्हणूनच वरील उदाहरण वास्ताविक आपल्याला असे मांडावे लागेल :

(२) जे खोटे असते ते कधीही सांगू नको.
'क्ष' खोटे आहे.
'क्ष' सांगू नको.

वरील (२) मधील साध्यावयवाचा विचार केल्यास आपल्या हे लक्षात येईल की ते विधान आज्ञार्थक आहे. या विधानात आणि निष्कर्षात जी दोन्ही आज्ञार्थक विधाने आहेत-भेद इतकाच आहे की साध्यावयव सार्विक आज्ञार्थक विधान असून निष्कर्ष विशेष आज्ञार्थक विधान आहे.

वरील स्पष्टीकरणावरून एक मुद्दा आपल्या लक्षात येईल आणि तो असा की **निव्वळ** ज्ञानार्थक वाक्यांचा आज्ञार्थक वाक्यांशी काहीही तार्किक संबंध नसतो. परंतु ज्ञानार्थक वाक्यावरोवरच आज्ञार्थक वाक्यांचा आपण उपयोग केल्यास त्यावरून आज्ञार्थक वाक्य निष्पन्न होऊ शकते, आणि हेच त्याचे समर्थन–अर्थात तार्किक–असते. म्हणजे, 'अमुक अमुक कर' असे दुसऱ्याला सांगितल्यानंतर, 'असे का?' म्हणजे 'अमुक अमुक का कर?' या प्रश्नाचे उत्तर–कृती करण्याचे समर्थन–आपण वरीलप्रमाणे देऊ शकतो.

आता या ठिकाणी एक महत्त्वाचा प्रश्न असा उपस्थित होतो की, साध्यावयवात जे आज्ञार्थक विधान आपण स्वीकारतो त्याचे समर्थन कसे करता येईल. हेअर याचा विचार असा करतो : आपण जेव्हा एखादे सार्विक आज्ञार्थक वाक्य साध्यावयव म्हणून स्वीकारतो तेव्हा वास्तविक आपण आपला एक प्रकारचा निर्णयच दर्शवित असतो. जी अनेक आज्ञार्थक वाक्ये आपल्याला आढळतात यापैकी काहींचीच आपण निवड करतो तर काही टाकून देतो. अशी निवड अर्थातच यादृच्छिक अथवा स्वैर नसते, तर ती काही नैतिक तत्त्वांवर आधारित असते. म्हणजेच काही नैतिक तत्त्वे आपण स्वीकारतो, म्हणजे निवडतो, आणि या तत्त्वांवर आधारलेली आज्ञार्थक वाक्ये आपण स्वीकारीत असतो. म्हणूनच आज्ञार्थक वाक्यांची निवड करणे म्हणजे वास्तविक नैतिक तत्त्वांचीच निवड करणे होय असे हेअरचे मत आहे. परंतु, पुन्हा, अशा विशिष्ट नैतिक तत्त्वांचीच निवड आपण का करतो असा प्रश्न उपस्थित केल्यास हेअरचे त्याला उत्तर असे की ते प्रत्येकाने स्वीकारलेल्या, निवडलेल्या, जीवनपद्धतीवर (way of life) आधारित असते. आता, विशिष्ट जीवनपद्धती मनुष्य का निवडतो हा प्रश्न शिल्लक उरतोच. परंतु तो या ठिकाणी अप्रस्तुत आहे. कारण त्याचे समर्थन करणे नीतिशास्त्राच्या कक्षेबाहेरचे आहे. (त्याचे समर्थन सौंदर्यशास्त्रीय दृष्टिकोनातून होऊ शकते असे एक मत आहे.) याचा अर्थ असा की एखाद्या कृतीचे समर्थन करायचे झाल्यास अंततोगत्वा आपल्याला त्या व्यक्तीच्या जीवनपद्धतीचा विचार करावा लागेल.

आज्ञार्थक वाक्यांविषयी केलेले वरील स्पष्टीकरण मूल्यात्मक विधानांनाही लागू पडते कारण, पूर्वी सुचविल्याप्रमाणे, आज्ञार्थक वाक्यांसारखेच मूल्यात्मक विधानांचेही कार्य आदेशात्मक असते. इतकेच नव्हे तर, नैतिक तत्त्वांच्या निर्णयासंबंधी बोलणे म्हणजेच अपरिहार्यपणे मूल्यात्मक विधाने वापरणे होय आणि उलट, मूल्यात्मक विधाने वापरणे म्हणजेच नैतिक तत्त्वांच्या निर्णयासंबंधी बोलणे होय असे हेअर समजतो. याचा विचार आपण खालील उदाहरणाच्या साह्याने करू :

'हे घड्याळ गोल आहे' हे ज्ञानात्मक अथवा वर्णनात्मक विधान 'हे घड्याळ चांगले आहे' या मूल्यात्मक विधानाहून भिन्न आहे. 'हे घड्याळ चांगले आहे' असे म्हणत असताना माझा हेतू त्या घड्याळाचे वर्णन करणे हा नसतो तर त्या घड्याळाची **भलावण** करणे हा असतो. म्हणजे, समजा, एखाद्याला अनेक घड्याळांपैकी कोणते घड्याळ घ्यावे, निवडावे,

यासंबंधी प्रश्न असेल, तर त्याला 'हे घड्याळ चांगले आहे' असे सांगून निवड करण्यासाठी मार्गदर्शन करता येईल. म्हणजेच, 'भलावण करणे' याचा अर्थ, 'निवड करण्यात मार्गदर्शन करणे' असा करता येईल. आणि हा अर्थ वर्णनात्मक अर्थाहून भिन्न आहे हे उघड आहे. म्हणूनच, 'हे घड्याळ गोल आहे' या आणि यासारख्या वर्णनात्मक विधानांवरून, 'हे घड्याळ चांगले आहे' हे मूल्यात्मक विधान निष्पन्न होऊ शकत नाही. अर्थात, अशा वर्णनात्मक विधानाच्या बरोबर एखादे मूल्यात्मक विधान असल्यास त्यावरून मूल्यात्मक विधान निष्पन्न होऊ शकेल. म्हणूनच, जो पर्यंत 'गोल घड्याळे चांगली असतात' हे आपण स्वीकारणार नाही तोपर्यंत 'हे घड्याळ गोल आहे' यावरून 'हे घड्याळ चांगले आहे' हे निष्पन्न होऊ शकणार नाही.

वरील सर्व स्पष्टीकरणावरून आज्ञार्थक वाक्ये आणि मूल्यात्मक वाक्ये यामधील साम्य तसेच यामध्ये आणि ज्ञानात्मक अथवा वर्णनात्मक वाक्ये यामध्ये असलेला भेद आपल्या लक्षात येऊ शकतो. आज्ञार्थक आणि मूल्यात्मक वाक्ये आदेशात्मक असतात, कृतीशी संबंधित असतात, तर वर्णनात्मक वाक्ये ज्ञानाशी संबंधित असतात. या संदर्भात शेवटी एक मुद्दा शिल्लक उरतो. आणि तो म्हणजे आज्ञार्थक वाक्य आणि मूल्यात्मक वाक्य यांचा परस्पर संबंध आहे की नाही. हेअरच्या मते संबंध आहे आणि तो असा की **मूल्यात्मक विधाने आज्ञार्थक विधानांना व्यंजित करीत असतात.** (Value judgments **entail** imperatives.)[3] याचा अर्थ असा की जर आपण एकादे मूल्यात्मक विधान मान्य केले, आपल्या जीवन-पद्धतीचा एक घटक म्हणून त्याचा स्वीकार केला तर, त्याच्याशी संबंध असलेले आज्ञार्थक विधान आपण अमान्य करू शकत नाही. उदा. प्रामाणिकपणाने वागणे चांगले आहे असे आपण मान्य केल्यास, आपल्या जीवनपद्धतीत त्याला स्थान असल्यास, आपण अप्रामाणिक राहणे तार्किकदृष्टया अशक्य आहे. अथवा, लोकशाही चांगली आहे असे आपण मान्य केल्यास, आपल्या जीवनपद्धतीचा एक घटक म्हणून ती स्वीकारल्यास, लोकशाहीविरोधी कृती आपण करणे तार्किकदृष्टया अशक्य आहे.

याप्रमाणे नीतिशास्त्रातील अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांची– 'मी कोणती कृती करावी ? ('मी काय करावे ?') आणि 'ती कृती मी का करावी ?' –चिकित्सा हेअरने केली आहे. या प्रकारची उच्च-स्तरीय चिकित्सा तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र, ज्ञानशास्त्र, धर्म, विज्ञान, गणित, कायदा या आणि इतर तत्त्वज्ञानाच्या शाखांमध्येही आधुनिक तत्त्वज्ञ करीत आहेत. जिज्ञासूंनी ती वाचल्यास त्यांना ती निश्चितच उद्बोधक–आणि मनोरंजक–वाटेल. आणि सुरवातीला सुचविल्याप्रमाणे, अशी, किंवा /आणि अशा प्रकारची, चिकित्सा आपल्याकडे आढळत असल्यास त्याचा तौलनिक विचार त्यांनी केल्यास ते हितावह ठरेल अशी आशा व्यक्त करता येईल. □ □

---

**टीपा आणि संदर्भ**

१. 'स्वरूप' या शब्दाने मला नैतिक चिकित्सेचे 'रूप' ( form ), चौकट, अभिप्रेत आहे. म्हणून नैतिक चिकित्सेची केवळ रूपरेषा या लेखात देण्याचा प्रयत्न केला आहे. तपशील विशिष्ट नैतिक समस्येनुसार देता येईल.

२. हेअर, आर्. एम्. : **'घि लँग्वेज ऑफ् मॉरल्स्'** (१९५२) तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची शिस्त नसलेल्या वाचकांना ,कदाचित्, हे पुस्तक किचकट वाटेल. परंतु अधीर न होता ते वाच-ल्यास त्यांना ते निश्चितच उद्बोधक वाटेल.

नैतिक भाषेच्या स्वरूपासंबंधीचा हेअरचा दृष्टिकोन हा महत्त्वाचा गणल्या जात असला तरी तो एकच दृष्टिकोन आहे असा गैरसमज टाळला पाहिजे. हेअर शिवाय जी. ई. मूर आणि सी. एल्. स्टीव्हन्सन् या तत्त्वज्ञांचेही दृष्टिकोन महत्त्वाचे समजले जातात.

३. कित्ता पृ. १७२.

## पुस्तके

# एका आत्महत्त्यापंथाची अखेर

अरुण कुळकर्णी

आत्महत्त्या हा विषय जाणून घेताना जितका मनोरंजक वाटतो तितकाच तो गुंतागुंतीचाही असतो. आत्महत्त्या करायला धजलेल्या व्यक्तींमधून ज्या 'वाचतात' किंवा 'वाचवल्या जातात' त्यांच्यापैकी सगळ्यांमध्येच 'मरणाची इच्छा' सारख्याच प्रमाणात प्रबळ नसते असे दिसून येते. या मंडळींपैकी काहीजण तर मरायला तयार नव्हते असेही वरेचदा आढळून येते. आत्महत्त्येच्या गतिविधीतून तर यातली गुंतागुंत अधिकच स्पष्टपणे जाणवते. एरव्ही आत्महत्त्या म्हणजे व्यक्तीने स्वतःवर केलेले आक्रमण होय असे आपण मानतो. पण सभोवतालच्या परिस्थितीवर आपली चीड आणि संताप व्यक्त होण्यासाठी केल्या गेलेला तो प्रयत्न होय असेच काही घटनांमधून मागाहून लक्षात येते. शिवाय एकीकडे जीवावर उदार होण्याची प्रवृत्ती बळावलेली असताही इतरांनी आपल्याला वाचवण्यासाठी प्रयत्न करावेत म्हणून त्यांना भरपूर वेळ देण्याची एक तरतूदही करून ठेवलेली दिसते. उदाहरणार्थ, विषारी औषधांचे जास्त प्रमाणात सेवन करून आपल्याला सहानुभूती मिळावी आणि आपण जीवावर कसे उदार झालो आहोत याची जाणीव इतरांना व्हावी म्हणून काही स्त्रिया असले प्रयत्न करतांना आढळतात. वरेचदा आपण आपला विनाश करण्यास उद्युक्त झालो आहोत याची इतरांना कल्पना देणारे संकेत व्यक्ती आपल्या वागण्यातून आणि बोलण्यातून देत असते. अर्थात् याची कितपत दखल इतर मंडळी घेतात यावर त्या व्यक्तीचे भवितव्य अवलंबून असते हा भाग निराळा !

आत्महत्त्या का करण्यात येते हे शोधू पाहता 'डिप्रेशन' हे मुख्य कारण या संदर्भात सांगता येते. मनाच्या या अवस्थेत व्यक्ती अतिशय उदास आणि खिन्न झालेली असते. ही अवस्था बराच काळ टिकून राहिल्यास व्यक्ती आपली निर्भत्सना करायला लागते. आत्मनिर्भत्सनेचे प्रमाण वाढू लागताच आपण कुचकामी आहोत अशी धारणा बनू लागते. अशाप्रकारे दारुण निराशा आणि स्वतःला तुच्छ लेखण्याची वृत्ती बळावल्यास आणि ती तशीच टिकून राहिल्यास आपण काहीही करण्यास असमर्थ आहोत ही कल्पना मूळ धरून बसते. शेवटी आपल्या जगण्यात आता काहीही अर्थ उरलेला नाही असे व्यक्तीला इतक्या प्रकर्षाने जाणवायला लागते की आपण जीव दिल्याशिवाय गत्यंतर नाही असेच तिला सतत वाटत राहते. यातूनच आत्महत्त्या घडून येते.

आत्महत्त्या म्हणजे मानसिक अस्वास्थ्याचे निदर्शक असे मात्र यावरून निश्चितपणे म्हणता यायचे नाही. कारण आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त झालेले सर्वच लोक मानसिक दृष्ट्या अस्वस्थ झालेले असतात असे मात्र नाही. सर्वच दृष्टीने निकोप असलेली आणि परिस्थितीशी ठामेठोकपणे सामना करू शकणारी एखादी व्यक्ती अगदी क्षुल्लक कारणावरून आत्महत्त्या करून बसते असेही वरेचदा दिसून येते. एकंदरीत आत्महत्त्या कोण, कधी आणि कशासाठी करेल हे सांगणे अत्यंत कठीण आहे.

दोन वर्षापूर्वी म्हणजे १८ नोव्हेंबर १९७८ रोजी एकाच वेळी ९०० व्यक्तींनी पोटॅशियम सायनॉईड सारखे विषारी द्रव्य घेऊन आत्महत्त्या केल्याची बातमी जेव्हा जगभर पसरली तेव्हा सर्वत्र आश्चर्य आणि हळहळ व्यक्त करण्यात आली. एकाच वेळी इतक्या लोकांनी आत्महत्त्या करण्यासारखं नेमकं असं काय घडलं असेल हे जाणून घेण्याची जिज्ञासा लोकांमध्ये निर्माण झाली. श्री. विजय कुवळेकरांचं 'एका आत्म-

हत्त्या पंथाची अखेर' हे पुस्तक याच आत्महत्त्या-कांडाची कहाणी आहे.

अमेरिकेत वैज्ञानिक प्रगतीबरोबरच जीवनातील अस्थिरता आणि असुरक्षितता दूर करून मनःशांती मिळवून देणारे विविध पंथ देखील उदयाला येत असतात. अशा पंथांचा प्यास घेणारे लोक मानसिक दृष्ट्या जरा कमजोर असतात असे आढळून येते. नेमक्या अशा लोकांवर प्रभुत्व गाजवणारे गुरुही तेथे असतात. असल्या प्रभावी गुरुंच्या नादी लागून कठपुतळी बाहुल्यांसारखे त्यांचे अनुकरण मनाने दुबळे असलेले लोक करू लागतात.

रेव्ह. जिम जोन्स हा गियानातल्या जोन्सटाऊन मधील असाच एक धर्मगुरु. त्याने 'पिपल्स टेंपल' ही संस्था उभारून तिचे १२०० अनुयायी निर्माण केले. वर्णभेदरहित व हिंसाद्वेषातीत असं सर्वसमभावनेनं-युक्त 'नंदनवन' भूतलावर निर्माण करण्याचं स्वप्न त्यानं गरीब, अनाथ व निग्रो लोकांसमोर उभं करण्याचा प्रयत्न केला. पण पिपल्स टेंपल उभारत असताना त्याला अमाप संपत्ती व ऐश्वर्य मिळत गेलं. या आधारावर त्याने समाजकारण व राजकारण यात हस्तक्षेप केला. खऱ्या अर्थानं तो आपल्या उद्दिष्टापासून तसा दूरच राहिला.

जिम जोन्स स्वतःला प्रेषित, देवदूत, ख्रिस्त वगैरे म्हणवून घेत असे. जगात मानवी समानता आणि वर्णभेदरहित समाजरचना निर्माण करणाऱ्या लेनिनचा पुनरावतार असेही तो स्वतःला म्हणवून घेई. पण प्रत्यक्षात मात्र १२०० अनुयायांचं पाठबळ, प्रचंड संपत्ती आणि अमाप पैसा यांच्या सहाय्याने तो स्वार्थ आणि अहंभाव जोपासत राहिला. त्यामुळे क्रौर्य आणि विकृत मनोवृत्ती वाढत राहण्यास पोषक वातावरण लाभत गेलं. जिम जोन्स तसा बालपणापासून शुद्ध आणि सात्त्विक प्रेमाला पारखाच झालेला होता. त्याची आई लिनेटा आणि वडील जेम्स जोन्स यांच्यात वैवाहिक सौख्य नसल्याचा हा परिणाम होता. त्याने स्वतः मार्सेलीन या नर्सशी विवाह केला होता. आपल्या अनेक अनुयायांची त्याने हवी तशी लग्ने लावली व मोडली देखील. स्वतः तो मनमानेल त्या स्त्रीचा उपभोग घेत होता. क्वचित् प्रसंगी समलिंगी संबंध ठेवण्यातही तो मागे राहिला नाही. पण इकडे आपल्या अनुयायांना मात्र लैंगिक संबंधाबाबत संयम ठेवायला तो सांगत असे. एकंदरित, मनात उपभोगाची लालसा पण वरून मृदू भाषण करून व हास्यवदन ठेवून आपण जनतेचा कल्याणकर्ता आहोत असा आभास तो निर्माण करी. अनुयायांवर विलक्षण दहशत ठेवून त्याने वर्चस्व प्रस्थापित केले होते.

पण त्याच्या जुलुमगिरीचा वर्तमान पत्रकारांना सुगावा लागून त्यांनी त्याच्या कृष्णकारस्थानांना उजेडात आणण्याचा छडा लावला. स्वतःचे बिंग बाहेर न पडू देण्यासाठी त्याने कसोशीने प्रयत्न केला. शेवटी आपण करत असलेल्या 'पवित्र कार्यात दुष्ट जग अडथळा आणत आहे.' असे भासवून त्याने सामूहिक आत्महत्त्येचा चतुर मार्ग शोधून काढला.

एवढ्या मोठ्या प्रमाणात स्वेच्छेने आत्महत्त्या घडवून आणण्याचा हा प्रयोग अभूतपूर्वच म्हणावा लागेल. आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वातून इतरांवर वर्चस्व गाजवून जी दडपशाही आणि दहशतवाद जिम जोन्सनं शिताफीनं निर्माण केला त्यातूनच त्याला हे कौशल्य साधलं. त्याचा हेतु अर्थात कृष्णकृत्यांवर पडदा पाडणे हा असल्याने आत्महत्त्येच्या नावाखाली घडविलेलं ते एक खूनकांडच आहे असे म्हणता येईल.

सामूहिक आत्महत्त्येची ही चित्तथरारक पण वास्तवात घडलेली कहाणी श्री. कुवळेकरांसारख्या सराईत पत्रकाराला आकर्षक शैलीतून मांडता आली असती. जिम जोन्सच्या समाजकारण आणि राजकारणातील हस्तक्षेपाचे लांबलचक वर्णन बरेचदा रुक्ष वाटते. एखाद्या सामाजिक शास्त्रातील संशोधकाच्या लिखाणात रुक्षपणा आलाच तर तो मान्यही होण्यासारखा आहे. पण श्री. कुवळेकरांकडून ललितपूर्ण आणि आकर्षक मांडणी अपेक्षित होती. शास्त्रीय ज्ञानात भर पडण्याच्या दृष्टीने या पुस्तकाचा विचार करता आत्महत्त्येच्या गतिविधीसंबंधी विशेष अशी माहिती त्यातून मिळत नाही. कारण, ज्या ९०० लोकांनी सामूहिक आत्महत्त्या केली त्यांना व्यक्तिशः तसे करण्याचे कोणतेच कारण नव्हते. केवळ दहशतीमुळे आणि तथाकथित गुरूच्या वर्चस्वामुळे केलेले एक अंधानुकरण एवढाच त्याचा अर्थ लावता येईल. शिवाय, खऱ्या अर्थाने ते आत्महत्त्याकांड नसून आत्महत्त्येच्या माध्यमातून घडवून आणलेले खूनकांड आहे असेच या घटनेचे वर्णन करता येईल. □

**एका आत्महत्त्या पंथाची अखेर** /लेखक-विजय कुवळेकर /श्री विद्या प्रकाशन, शनिवार, पुणे-३० / पृष्ठ संख्या-१५०, मूल्य रु. १७-५० /७ ऑगस्ट १९७९.

# रापण

ना. वा. ठेंगडी

आपल्या या भागात, 'रापण' हा शब्द प्रचारात नाही. पुष्कळांना तो माहीतही नाही. माहीत असण्याचे कारणही नाही. हा शब्द समुद्रकिनाऱ्यावरचा आहे. ही समुद्रातील मासे पकडण्याची एक सामूहिक कृती आहे. पंचवीस तीस जणांनी मिळून होड्यांमधून समुद्रात आत जायचे, एक प्रचंड जाळे आत फेकायचे, आणि त्या जाळ्यात जितके सापडतील तितके लहान मोठे मासे घेऊन होड्या वल्हवीत समुद्रकिनाऱ्याशी यायचे. सापडलेल्या माश्यांचे किनाऱ्यावर आपापसात वाटे करायचे. या एवढ्या साऱ्या घडामोडींना 'रापण' म्हणतात. समुद्रातील मासे पकडणाऱ्या व विकणाऱ्या कोळ्यांच्या जीवनाशी हा शब्द संबंधित आहे.

श्री. प्रल्हाद अनंत धोंड यांनी अत्यंत समर्थपणे आपल्या या पुस्तकाला 'रापण' असे नाव दिले आहे. कालसागरात स्मृतीचे जाळे फेकून आठवणींचे जे मासे सापडले त्यांची ही 'रापण.' म्हटले तर आत्मचरित्र, म्हटले तर आठवणी. आत्मचरित्रात्मक आठवणी किंवा आठवणींवजा आत्मचरित्र असे काहीसे या लेखनप्रकाराला म्हणता येईल. श्री. प्रल्हाद अनंत धोंड हे मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् या प्रख्यात कलासंस्थेचे माजी डीन आणि महाराष्ट्र राज्याच्या कलासंचालनालयाचे माजी प्रमुख. स्कूल ऑफ आर्टस् या संस्थेत असताना स्टाफरूममध्ये गप्पांच्या ओघात त्यांनी आपल्या जीवनातील ज्या गमतीदार, रोमहर्षक आणि हृद्य आठवणी सांगितल्या त्यांचाच हा लेखनाविष्कार आहे. या आठवणी लेखननिविष्ट करण्याची कल्पना मुळातली धोंडांची नव्हेच. वाङमय म्हणून या साऱ्या आठवणींचे फार मोठे महत्व आहे, असे या गप्पा ऐकणाऱ्या धोंडांच्या सहकाऱ्यांनाच वाटले; आणि त्यांच्यापैकी श्री. संभाजी कदम या नावाच्या त्यांच्या एका लहान वयाच्या सहकाऱ्याने या आठवणी लिहून काढण्याचे काम अंगावर घेतले.

धोंडांनी सांगावयाचे आणि कदमांनी लिहावयाचे, अशी ही प्रक्रिया घडली. पुस्तक पूर्ण वाचून झाल्यानंतर त्याचे वाङ्मयीन मूल्य फार मोठे आहे ही गोष्ट पटून जाते. आठवणी जुळवितांना नकळत जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् या नामवंत कलासंस्थेचा इतिहासही तयार होऊन गेला आहे. अर्थात हे आपोआप आणि सहज घडले आहे. संस्थेचा इतिहास लिहिणे हा मुळात हेतू नव्हता. संस्थेचे वातावरण आणि तीत येऊन गेलेली माणसे यांची एक हृदयंगम वीण गुंफत असतानाच इतिहासाचे पदर तयार झाले आहेत. मनुष्य हा लेखनाचा केंद्रबिंदू आहे. मनुष्याचे कलेशी असलेले नाते हा तो मनुष्य जोखण्याचा एक आधार आहे. मनुष्य आणि कला यांच्या परस्पर क्रिया–प्रतिक्रियांमधून झिरपलेले मानवी स्वभावाचे पैलू ही या लेखनाची देणगी आहे.

जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् या संस्थेचा प्रपंच फार जुना आहे. आणि फार मोठा. कितीतरी नामवंत व्यक्ती या संस्थेस अधिकारी म्हणून लाभून गेल्या आहेत. स्वतः श्री. धोंड हे अशा अधिकाऱ्यांपैकीच एक. डीन म्हणून म्हणा किंवा वेगवेगळ्या विभागाचे प्रमुख म्हणून म्हणा, तेथे येऊन गेलेल्या रथी–महारथींची जी शब्दचित्रे धोंडांनी रेखाटलेली आहेत ती शब्दचित्रांच्या इतिहासात अजरामर ठरतील. येथे गोंधळेकर आहेत, आचरेकर आहेत, करमरकर आहेत, देऊसकरही आहेत. येथेच आगासकर, अडूलकर आणि आडारकर हेही आहेत. पळशीकरांचा नोकझोक काही वेगळाच आहे. कलेच्या क्षेत्राशी संबंधित असलेले श्री. दिनकरराव देसाई हे मंत्रीही आहेत. आणि आपल्या कर्मठ आचार–विचारांनी क्वचित कलेच्या फुलारण्याला बाधा आणणारे त्या काळचे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई हे सुद्धा येथे हजेरी लावून गेले आहेत.

पण ह्या सर्वांच्या वर उठून दिसतात ते सॉलोमन साहेब. सॉलोमन साहेब हे तसे अनेक डीनपैकी एक डीनच. परंतु कलेच्या संवर्धनाच्या संदर्भात अनेक अनन्यसाधारण गुण त्यांच्यामधे आहेत. पारतंत्र्य काळ सुरू असताना विलायतेतून आलेला अधिकारी इथल्या कलेमधे आणि कलावंतांमध्ये विलक्षण रस घेतांना दिसतो. भारतात भारतीय कलेचे पुनरुज्जीवन व्हावे



अनुक्रमणिका

हा सॉलोमन साहेबांचा ध्येयवाद आहे. त्यासाठी त्यांनी निरनिराळ्या योजना आखल्या आहेत आणि कसून प्रयत्न केला आहे. पण त्यामुळेच कलेतील वास्तववाद्यांचा गट त्यांच्या विरोधात प्रखरपणे उभा आहे. कलेतील भारतीयत्वाच्या पुनरुज्जीवनाचे निमित्त पुढे करून येथील कलेची परंपरा नष्ट करण्याकरिताच या माणसाला इंग्रज सरकारने पाठविले आहे असा जोरदार प्रचार सॉलोमनसाहेबांच्या विरुद्ध झालेला आहे. स्वतः लेखक मात्र या प्रचाराने जरा सुद्धा शंकित झालेला नाही. उलट आपल्याला असे दिसते की एक श्रद्धेय व्यक्ती म्हणून लेखकाच्या जीवनात सॉलोमन साहेबांचे स्थान अनन्यसाधारण आणि एकमेवाद्वितीय असे आहे. लेखकाने हे पुस्तक सॉलोमनसाहेबांनाच अर्पण केले आहे.

यात एक गंमत लक्षात घेण्यासारखी आहे. सॉलोमन साहेबांना अनन्यसाधारण स्थान आहे हे दाखवून देतांना लेखकाने कुठेही शब्दांचा वडिवार केलेला नाही. सॉलोमनसाहेबांच्या ठिकाणी अमुक अमुक गुण होते म्हणून ते आपले श्रद्धास्थान बनले अशी तार्किक मीमांसा करण्याच्या भरीला लेखक कुठेही पडला नाही. सॉलोमनसाहेबांचे लेखकाच्या जीवनातील सर्वोच्च स्थान आपण फक्त समजून घ्यायचे असेच एकूण सारे विवेचन आहे. त्यांना तसे सर्वोच्च स्थान असल्याची खात्री मात्र पदोपदी पटते.

धोंडांच्या शैलीचा सर्वात महत्त्वाचा विशेष जो मला आढळला तो हा आहे. एखादा विषय किंवा एखादे पात्र ते धूसरतेत सोडून देतात. परंतु तसे सोडताना ते अशा काही शैलीने सोडतात की वरवरून धूसर वाटणारे ते चित्र वाचकाच्या अंतर्मनात पूर्ण ठसठशीत होऊन जावे. सॉलोमनसाहेबांचे तसेच झाले. जेथे लेखकाचा जन्म झाला व जेथे त्याचे बालपण गेले त्या मालवण या खेडेवजा गावाचेही असेच आहे. लेखक मालवणबद्दल फारसे लिहित नाही. पण जेवढे काही लिहितो तेवढ्यावरूनही ते गाव वाचकाच्या मनात घर करून वसते. आपण फार लहान असतानाच आपले वडील वारले आणि आपल्याला पितृसुख लाभले नाही.ही खंत फारच थोड्या शब्दांमध्ये लेखकाने व्यक्त केली आहे. हे करताना वडिलांनाही त्याने असेच धूसरतेत सोडून दिले आहे. पण परिणाम मात्र असा झाला आहे की लेखकाचे वडील वाचकाच्या अंतर्मनात ठसठशीत रूप धारण करतात.

पत्नीबद्दल लेखक मधून मधून, तुटकतुटक लिहीत जातो. पत्नीचे सलग आणि एकसंघ असे चित्रण कुठेच नाही. पण विखुरलेल्या वर्णनामधून तिचे जे चित्र साकार होते ते वाचकाच्या हृदयाचा ठाव घेते. ती कॅन्सरने मेली आहे. मरणाच्या आधी तिला मरणाची जाणीव झालेली आहे. मरणाची जाणीव आणि प्रत्यक्ष मरण यांना पार्श्वभूमी लाभलेली आहे ती पतिपत्नींच्या प्रेममय सामंजस्यपूर्ण जीवनाची. त्यांचा प्रेमविवाह झाला आहे. काही छोटेछोटे संघर्षही आहेत. पत्नीचा डॉक्टरकीचा पेशा आहे. त्यामुळे तिची मिळकत जास्त आहे आणि या पायी आपली झालेली एक अवहेलना. आपले कलेच्या क्षेत्रात समरसून गेलेले एक सामाजिक जीवन आहे. त्या जीवनाविषयी पत्नीची उदासीनता आणि अलिप्तता आहे. आपल्या जीवनात ओघाओघाने काही स्त्रिया आलेल्या आहेत. त्यांच्या येण्याबद्दल पत्नीची एक हलकीशी नाराजी आहे.

अगदी निसटत्या शब्दात पण मार्मिकपणे व्यक्ती उभ्या करण्याचे लेखकाचे कौशल्य चकित करणारे आहे. मला स्वतःला ही मराठी वाङ्मयातली एक क्रांतिकारक घटना वाटते. वातावरणाची निर्मितीही लेखक अशाच निसटत्या पण मार्मिक शब्दात करतो. लेखकाचे शांतिनिकेतनमधील वास्तव्य या दृष्टीने वाचण्यासारखे आहे. स्कूलचे डीन म्हणून नियुक्ति झाल्यानंतर लेखक डीनच्या ज्या बंगल्यात जाऊन राहतो त्या बंगल्याचे आणि बंगल्याच्या परिसराचे वर्णन असेच मार्मिक आहे. दोन्हीही मुलींची लग्ने होऊन त्या आपापल्या घरी निघून गेलेल्या आहेत आणि डीनच्या त्या अवाढव्य बंगल्यात लेखक एकटाच भुतासारखा वावरतो आहे. एखादी मुलगी मधूनच दोन तीन दिवसासाठी मुक्कामाला येते आणि तेवढ्यापुरता तो बंगला जागून उठतो. ती गेली की मग पुन्हा भयाण एकटेपण. पण त्यातही काही दिलासे आहेत. मधूनच केव्हातरी विद्यार्थिनी घरून डबा आणून टेबलावर ठेवतात—सरांना एखाद दिवशी स्वयंपाक करण्याचे कष्ट नको म्हणून. बाकी जीवनातला एकाकीपणा हा साऱ्या सलगींवर आणि सलोख्यांवर

मात करून जाणारा. या एकाकीपणाला बंगल्याच्या भोवतालच्या दाट झाडीने उठाव आणला आहे. अपरात्री–मध्यरात्री विरंगुळा म्हणून बंगल्यासभोवती रपेट मारत असताना भेटणारा भयानक दिसणारा चौकीदार. बंगल्याच्या सज्जात उभे राहून दूर झाडीकडे रात्री पाहिले तर होणारे चित्रविचित्र भास. तशातच बंगल्याच्या आवारात आढळलेले करणी, चेटूक असले प्रकार.

जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् या संस्थेचा परिसर म्हणजे कलेची विद्या देण्याचा आणि घेण्याचा एक आखीव–रेखीव परिसर. यात कलेच्या साऱ्या विकासाला काही नियमांच्या आणि नियोजनाच्या चौकटीतच बसावे लागणार. त्यामुळे कलेसाठी कितीही धडपड करणारी व्यक्ती असली तरी तिच्या व्यक्तित्वाचा साज एका मर्यादेपलिकडे कधीही विस्कटणार नाही. म्हणूनच जे. जे. च्या वातावरणाचे शब्दचित्रण वाचत असताना आपल्या मनात खोल कुठेतरी मालवणच्या पेडणेकर मास्तर या कलावंताची आठवण सतत जागी असते. पेडणेकर मास्तर भणंग आहेत. अस्ताव्यस्त आहेत. विस्कळीत आहेत. आणि तरीही मनात कुठेतरी आपण सतत अशी दाद देत राहतो की पेडणेकर मास्तर हाच खरा अस्सल कलावंत आहे. काळाचे भान सुटलेला आणि जगण्याचे सोपस्कार गुंडाळून फेकून दिलेला बेदरकार आणि बेबंद असा एक अनादि अनंत कलाकार जर आपल्याला कुठे पहावयास मिळत असेल तर तो फक्त पेडणेकर मास्तरांमधेच. दुसऱ्या कोणत्याही पात्राच्या बाबतीत लेखकाला जे साधले नाही ते या पेडणेकर मास्तरांच्या बाबतीत त्याला साधले. ते म्हणजे लेखकाने आपल्या शब्दांमधून पेडणेकर मास्तर अमर करून टाकले.

लेखक चित्रकलेसंबंधीच हे सारे लिहितो आहे. चित्रकलेच्या विकासाचा एक आलेखही तो मांडून जातो आहे. त्यातच चित्रकलेतले निरनिराळे वादही डोकावून जात आहेत. स्पष्ट शब्दात जरी नसली तरी एक खंत मधूनच उमटून जात आहे. ती खंत म्हणजे कलेच्या शिक्षकाला हाडाचा कलावंत न मानण्याची समाजाची प्रवृत्ती. ही जशी खंत एकीकडे आहे तशीच दुसरीही एक खंत आहे. ती म्हणजे खरा कलावंत म्हणून काही करून दाखविण्याच्या बाबतीतली कलाशिक्षकाची उदासीनता. प्रशासनातलेही काही अडसर आहेतच. मधूनच कलाप्रदर्शने भरविण्याची जिद्दही साकार होते आहे. क्वचित ही प्रदर्शने मांडताना त्रेधातिरपिट उडते आहे आणि फटफजितीही होते आहे. तरीपण कलेविषयीच्या निस्सीम प्रेमापोटी निर्माण झालेली जिद्द म्हणून या जिद्दीचे एक वेगळे महत्त्व आहेच. ती असल्याबद्दलचा एक अलौकिक आनंदही आहेच.

चित्रकलेच्या वाटचालीतले हर्षविषादाचे क्षण टिपताटिपता विचारांना चालना देणारा एक फार मोठा सिद्धान्त लेखक अगदी सहजगत्या मांडून गेला आहे. भारतात स्वातंत्र्याची चळवळ ऐन भरात आली असतानाच कलेच्या क्षेत्रातही एका नव्या जागृतीचे वादळवारे उठले, ही गोष्ट लेखक आवर्जून नमूद करतो आणि हा केवळ योगायोग नसून राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे कलाक्षेत्रावर कसे परिणाम होऊ शकतात याचेच ते निदर्शक आहे, असे सुचवून जातो.

अशा कितीतरी बाबी या पुस्तकात आहेत. एक वेगळ्या प्रकारचे, समर्पक शब्दात लिहिलेले, हृद्य आठवणींमधून साकार झालेले, आत्मचरित्राशी नाते सांगणारे, परंतु कालचित्र म्हणूनही आपला एक अमोल ठसा उमटवून जाणारे, सहज शैलीचे आणि सुंदर वळणाचे एक पुस्तक या दृष्टीने ही वाङ्मयकृती मराठी वाङ्मयजगतात स्वतःचे एक आगळे स्थान निर्माण करील याबद्दल मला शंका वाटत नाही.

□ □

---

रापण /प्रल्हाद अनंत धोंड /प्रकाशक /श्री. पु. भागवत, मौज प्रकाशन गृह /खटाववाडी /गिरगाव / मुंबई ४००००४ /पृष्ठसंख्या २६६ /मूल्य ३० रु.

# युगवाणी एकांकिका लेखन स्पर्धेचा निकाल

'आज आणि उद्याची एकांकिका' या शीर्षकाखाली आम्ही एक लेखन-स्पर्धा जाहीर केलेली होती. स्पर्धेत ज्या ५ एकांकिका सर्वोत्कृष्ठ ठरतील त्यांना युगवाणीतर्फे प्रत्येकी १०० /- रु.चे पारितोषिक देण्यात येईल असे आम्ही जाहीर केले होते. युगवाणीत ह्या पाच एकांकिका प्रकाशित करण्यात येतील असेही अभिवचन आम्ही दिले होते. ह्या स्पर्धेकरिता डॉ. वि. स. जोग आणि सौ. अनुराधा जोशी यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांनी चार एकांकिका सर्वोत्कृष्ठ म्हणून जाहीर केल्या. त्या पुढील प्रमाणे:—

(१) विस्फोट—चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, सोलापूर.

(२) अनुत्तरित—सौ. आश्विनी धोंगडे, पुणे.

(३) प्रश्न आणि उत्तर—पद्माकर बेळगावकर, नाशिक.

(४) चिता ओलीय्...घासलेट आणा!—प्रकाश जोशी, अकोला.

वरील चार लेखकांचे आम्ही अभिनंदन करतो. यथाक्रम त्यांची पारितोषिके रवाना होतीलच. ह्या चार सर्वोत्कृष्ठ एकांकिका ह्या अंकात आम्ही प्रकाशित केलेल्या आहेतच.

ह्या स्पर्धेकरिता एकूण ११८ एकांकिका आल्या. अगदी गोव्यापासून ग्वाल्हेरपर्यंतच्या सर्वांनीच यात भाग घेतला. त्या सर्व स्पर्धकांचे युगवाणीतर्फे आम्ही आभार मानतो.

ज्यांना आपल्या एकांकिका परत पाहिजे असतील त्यांनी विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा ही विनंती. बाहेर गावच्या स्पर्धकांनी पुरेसे पोस्टेज पाठवावे म्हणजे त्यांच्या एकांकिका कार्यालयामार्फत परत पाठविल्या जातील.

**शरद कोलारकर**
संपादक, युगवाणी

# कार्यवृत्त

## दि. १-८-८० ते ३०-११-८० पर्यंत

अ. ल. लिमये
सरचिटणीस
वि. सा. संघ, नागपूर

**श्रद्धांजली**

दि. ६–८–८० रोजी ख्यातनाम साहित्यिक पु. भा. भावे तसेच १३–९–८० रोजी प्रख्यात नाटचलेखक, दिग्दर्शक व नट सतीश दुभाषी यांना वि. सा. संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**म. गांधी जयंती**

दि. १–१०–८० रोजी नामदार प्रा. ग. प्र. प्रधान यांचे म. गांधी जीवनावर व्याख्यान झाले. २–१०–८० रोजी म. गांधी यांचे प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला.

**झेंडावंदन–स्वातंत्र्य दिन**

१५–८–८० रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते झेंडावंदनाचा कार्यक्रम करण्यात आला.

**माननीयांच्या भेटी**

१०–९–८० रोजी प्रसिद्ध कायदे पंडीत खासदार श्री. राम जेठमलानी, २२–९–८० रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते श्री. नानासाहेब गोरे, ७–१०–८० रोजी आमदार श्री. राम मेघे, ३–१०–८० रोजी प्रसिद्ध साहित्यिक श्री. द. मा. मिरासदार व ७–११–८० रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक बाबुराव बागुल या मान्यवरांनी संस्थेस भेटी दिल्यात.

**स्मृतिदिन**

दि. ३०–८–८० रोजी कविवर्य 'बी' यांचे प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला.

१९–११–८० रोजी स्व. वि. रा. हंवर्डे यांचे प्रतिमेस हार घालण्यात आला.

२७–११–८० रोजी कै. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर स्मृतिदिनानिमित्त 'वृत्तपत्रसृष्टीने साहित्य वृद्धिसाठी केलेले कार्य' या विषयावर झालेल्या परिसंवादात प्रा. डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे, तरुणभारताचे संपादक, आमदार श्री. मा. गो. वैद्य व नागपूर पत्रिकेचे सहसंपादक श्री. दिनकर देशपांडे यांनी भाग घेतला.

दि. २९–११–८० रोजी महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिनानिमित्त 'साहित्य व समाज प्रबोधन' या विषयावर झालेल्या परिसंवादात डॉ. सौ. आशा सावदेकर व प्रा. म. ना. लोही यांनी भाग घेतला.



अनुक्रमणिका

दि. १४-९-८० रोजी प्रख्यात नाट्य व सिनेदिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. श्री. भाऊसाहेब चांदेकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी डॉ. जब्बार पटेल यांचे भाषण झाले.

दि. २१-१०-८० रोजी डॉ. मधुकर आष्टीकर यांचा मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्याबद्दल महाराष्ट्राचे क्रीडा व उर्जामंत्री नामदार जयंतराव टिळक यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. गो. मा. कुळकर्णी होते. याप्रसंगी डॉ. द. भि. कुळकर्णी व तरुणभारताचे सहसंपादक श्री. ना. वा. ठेंगडी यांची गौरवपर भाषणे झालीत.

दि. १८-११-८० रोजी रांगोळी प्रदर्शनाचे चित्रकार श्री. दशरथ डोरले यांचा सत्कार तरूणभारताचे संपादक मा. गो. वैद्य यांचे हस्ते करण्यात आला. डॉ. मधुकर आष्टीकर हे अध्यक्ष-स्थानी होते. हे प्रदर्शन १ ते १८ तारखेपर्यंत होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन सौ. मेधाविनी आष्टीकर यांनी केले. मोठमोठ्या व्यक्तींनी प्रदर्शनास भेटी देऊन प्रशंसा केली.

दि. २२-११-८० रोजी सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक श्री. शरदश्चंद सिन्हा यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री. सिन्हा यांचे काव्यगायनाचा कार्यक्रम झाला.

दि. २३-११-८० रोजी सुप्रसिद्ध नाटककार व दिग्दर्शक श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. मधुकर आष्टीकर यांनी गौरवपर भाषण केले. या प्रसंगी श्री. दारव्हेकर यांचे उद्‌बोधक भाषण झाले

**कार्यक्रम समिती**

दि. ६ व ७ सप्टेंबर ८० रोजी कै. इंदिराबाई खरे वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. उद्‌घाटन प्रा. डॉ. सौ. शकुंतला खोत यांनी केले. स्पर्धेत पहिले बक्षीस कु. अर्चना देशमुख, दुसरे बक्षीस (विभागून) कु. प्रविणा जगदेव व कु. राजश्री देवलासी व तिसरे बक्षीस (विभागून) कु. मृदुला सगदेव व कु. मनश्री जोशी यांना देण्यात आले. बक्षीस समारंभ आमदार त्रि. गो. देशमुख यांचे हस्ते करण्यात आला. सौ. साठे व श्री. भोयर यांनी परिक्षकांचे काम केले.

दि. ४ व ५ ऑक्टोबर रोजी सौ. सत्यभामाबाई सगदेव स्मृती आंतरशालेय कथाकथन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. 'अ' गटात कु. मंजुषा दिघे व 'ब' गटात कु. मनिषा रुईकर यांना प्रथम बक्षीस देण्यात आले. दुसरे बक्षीस समीर कमन्नवार व कु. प्रतिभा जयदेव यांना देण्यात आले. परिक्षकांचे काम प्रा. ह. चं. घोंगे व सौ. शैल जेमिनी यांनी केले.

स्व. प्रेमचंद जन्मशताब्दि दि. १६-९-८० रोजी साजरी करण्यात आली. याप्रसंगी संतवाङ्मयाचे व्यासंगी व प्रसिद्ध लेखक डॉ. प्र. न. जोशी यांचे भाषण झाले. ३१-१०-८० रोजी 'संगीत शाकुंतल'च्या पहिल्या प्रयोगाचे शताब्दिनिमित्त डॉ. मधुकर आष्टीकर यांचे भाषण झाले. ५-११-८० रोजी कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे प्रतिमेस हार घालण्यात आला. सायंकाळी नागपूरचे श्री. मधुकर जोशी यांनी एकपात्री नाट्य प्रयोग सादर केला.

दि. १२-११-८० रोजी केन्द्रीय प्रसिद्धि विभागातर्फे लोकरंजन पुणे या नाट्य संस्थेने 'लोककला दर्शन' हा कार्यक्रम सादर केला. विभागाचे अधिकारी श्री. सुधाकर बोराडे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

दि. २१-८-८० रोजी आदिवासी नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पोलीस उपायुक्त श्री. उल्हास जोशी यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. ५ वर्षाची कु. कुंदा नायनेकर व १० वर्षाची कु. वेणू गेडाम या मुक्या व बहिऱ्या मुलींचे नृत्य उल्लेखनीय झाले.

१४ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर ८० पर्यंत बालचित्रपट महोत्सव बालचित्र समिती (भारत) यांचे सहकार्याने साजरा झाला. बालांसाठी पाच चित्रपट दाखविण्यात आलेत. संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांनी दिपप्रज्वलन करून महोत्सवाचे उद्‌घाटन केले. महोत्सवात जिल्हाधिकारी श्री. अरूण बोंगीरवार उपस्थित होते.

दि. २८-१०-८० रोजी ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष व सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. अच्युत तारी यांचे कथाकथनाचा कार्यक्रम झाला.

**गणेश व्याख्यान माला**— दि. ४ ते ६ ऑक्टोबर ८० रोजी गणेश व्याख्यान मालेत दिनांक ४ रोजी डॉ. द. भि. कुळकर्णी यांचे 'ज्ञानेश्वरांचे साहित्य' या विषयावर भाषण झाले. दि. ५ व ६ रोजी मुंबई विद्यापीठाचे डॉ. व. दि. कुळकर्णी यांचे रविंद्रनाथ टागोर व कविवर्य भा. रा. तांबे यांच्या साहित्यावर भाषण झाले.

**नाट्यसमिती**

दि. ५-९-८० रोजी कै. विश्राम अर्नसिंगकर, कै. विनय डांगरे व कै. छाया दुपल्लीवार यांचे स्मृतिप्रित्यर्थ रसिक रंजन, महा. बँक स्पोर्टस्, रंजन कला मंदीर व सुभाष मंडळ या संस्थाचे सहकार्याने चार एकांकिका सादर करण्यात आल्यात.

'घर आंगण' या कार्यक्रमाचे अंतर्गत २७-९-८० रोजी श्री. विद्याधर करमरकर यांनी नाट्य रसिकांशी एकपात्री प्रयोगासंबंधी चर्चा केली. दि. १८-१०-८० रोजी अभिनव कला निकेतन तर्फे 'मसिहा' हे हिंदी नाटक सादर करण्यात आले.

कै. रघुनाथराव आष्टीकर स्मृती विनोदी एकांकिका स्पर्धा दि. १०-८-८० ते १४-८-८० पर्यंत घेण्यात आल्यात. पारितोषिक वितरण समारंभ पोलीस उपायुक्त श्री. उल्हास जोशी यांचे हस्ते झाला. या स्पर्धेत एकूण २४ संस्थांनी भाग घेतला.

प्रथम क्रमांक— बालरंजन नागपूर या संस्थेच्या 'गुड बाय मिसेस होम्स' या नाटिकेस वि. सा. संघ पुरस्कृत रु. ७५/- व हुंवर्डे स्मृति रु. १०२/- बक्षीस देण्यात आले.

द्वितीय क्रमांकाचे बक्षीस रोख रु. ५०/-महाराष्ट्र बँक स्पोर्टस् क्लब नागपूर या संस्थेने सादर केलेल्या "हौस माझी पुरवा" या नाटिकेस देण्यात आले.

तृतीय क्रमांकाचे बक्षीस रु. २५/-रोख मुक्त कला नागपूर या संस्थेच्या 'दिसतं तसं नसतं' या नाटिकेस देण्यात आले. उत्तेजनार्थ कलातरंग नागपूर या संस्थेस 'वायफळ' या नाटिकेबद्दल प्रशस्ती पत्रक देण्यात आले.

वैयक्तिक अभिनय (पुरुष) प्रथम पारितोषक किशोर मुळे (रोंग्या-पुढारी पाहिजे), द्वितीय-मोहन पांडे (अंकल-हौस माझी पुरवा), (स्त्री) प्रथम पारितोषक-सुमेधा ठाकूर (सीमा-आत्महत्त्येची हत्या), द्वितीय-सौ. शोभा उपगडे (मावशी-हौस माझी पुरवा)

दिग्दर्शनाचे पारितोषक-प्रथम-श्री. संजय पेंडसे (बालरंजन), प्रशस्ती पत्रक दिलीप वाईकर (हौस माझी पुरवा.)

लेखनाचे बक्षीस श्री. उदयन ब्रह्म यांना 'गुडबाय मिसेस होम्स' या नाटिकेला देण्यात आले.

या शिवाय अभिनयाची प्रशस्ती पत्रके-श्री. सिद्धेश्वर कुन्हेकर, श्री. प्रकाश कुंटे व कु. स्मिता पराडकर यांना देण्यात आलीत. श्री. श्रीपाद डोंगरे, श्री. जयंत पाचपोर व सौ. कमल आंबेकर स्पर्धेचे परिक्षक होते.

**बाल नाट्य स्पर्धा**–८ ते ११–१०–८० पर्यंत घेण्यात आल्यात. स्पर्धेत एकूण १२ एकांकिका सादर करण्यात आल्यात. बक्षीस समारंभ सौ. अनुराधा जोशी यांचे हस्ते झाला.

स्पर्धेत नाटिकेस प्रथम पारितोषक रु. १०१/– 'बाबा हरवले आहेत' सादरकर्ते लोकांची शाळा या संस्थेस देण्यात आले. द्वितीय–रोख रु. ७५/– 'सळो की पळो' (बाल रंजन नागपूर) व तृतीय रु. ५०/–रोख 'खेळ खेळू या कुत्र्याचा' अंकूर रंगभूमी नागपूर यांना देण्यात आले.

वैयक्तिक अभिनयाची पारितोषके अनुक्रमे प्रशांत वैद्य, पराग कुळकर्णी, मकरंद गोखले या मुलांना व कु. विशाखा जोशी, कु. प्रणिता जाधव व कु. अनुपमा बाकडे यांना देण्यात आलीत.

दिग्दर्शनाची पारितोषके अनुक्रमे–राजीव खांडवे (सळो की पळो) सौ. भारती सुदामे व सौ. प्रतिभा आकरे (बाबा हरवले आहेत.) प्रदिप आदेवार (खेळ खेळू या कुत्र्याचा) यांना देण्यात आलीत.

उत्तेजनार्थ प्रशस्ती पत्रके–श्री. सुरज मोडक, श्री. परेश भिडे, कु. राधा कावळे, कु. आरती कुळकर्णी यांना देण्यात आलीत.

स्पर्धेत परिक्षकांचे काम सौ. मिना भुरके, कु. स्मिता पराडकर, श्री. ज्ञानेश्वर धुमाळ यांनी केले.

**शिवाजी संदर्भ ग्रंथालय** : या वर्षी (१) दलित साहित्य : अभ्यास व साधने. (२) विदर्भातील बाल साहित्य–एक अभ्यास (३) विदर्भातील साहित्य कृतींवर शोध निबंध व (४) विदर्भातील स्त्री लेखिकांचे साहित्य हे चार प्रकल्प हाती घेतले आहेत. निरनिराळ्या प्रसंगांनिमित्त ग्रंथप्रदर्शने आयोजित करण्यात आलीत.

दि. २७–९–८० रोजी 'मर्ढेकरांची एक कविता' ले. श्री. धों. वि. देशपांडे व 'जार्ज वाशिंग्टनच्या देशात' ले. म. वि. गोखले या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ डॉ. आष्टीकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या प्रसंगी डॉ. अक्षयकुमार काळे व प्रा. अविनाश खंडकर यांची भाषणे झालीत.

३–१०–८० रोजी ग्रंथालय संचालक श्री. कृ. द. पुराणिक यांना दिलेल्या निरोप समारंभात त्यांचे कार्याचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी प्रभारी ग्रंथालय संचालक कृ. मु. उजळंबकर उपस्थित होते.

**चित्रकला समिती** : ५–८–८० रोजी एस्. अहमद यांच्या चित्राचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

**संगीत समिती** : माग्रस व वि.सा.सं. तर्फे श्री. वा. ह. देशपांडे यांचे 'आलापिनी' या ग्रंथावर चर्चा झाली. अध्यक्षस्थानी श्री. विजय पटवर्धन होते. संयोजन श्रीराम सप्रे यांनी केले.

**परीक्षा समिती**

दि. ६ व ७ सप्टेंबर, ८० रोजी झालेल्या पर्वान्त परीक्षेला एकूण १६ केंद्रात ७८७ परीक्षार्थी सम्मीलित झाले. गत वर्षी पेक्षा ही संख्या १०० ने अधिक आहे.

संपूर्ण परीक्षांचा निकाल ५ ऑक्टों. ८० ला लागला असून तो संबंधित केंद्रांकडे प्रमाणपत्रासह पाठविण्यात आला आहे.

शासकीय व पदवी परीक्षांचा निकाल व पारितोषिक सूची याच अंकात जोडली आहे.

प्रथम सत्राचा प्रमाणपत्र वितरण समारंभ संघाध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर यांचे हस्ते साजरा करण्यात आला.

दि. ६ व ७ सप्टें. १९८० रोजी घेतलेल्या शासकीय परीक्षांचे परीक्षा फल.

म. प्रवीण–द्वितीय श्रेणी–राजकिशोर गुप्ता (सर्व प्रथम), यशवंतकुमार कोटिया. म. प्राज्ञ प्रथम श्रेणी–राजेंद्रसिंह दिक्षीत (सर्व प्रथम), कांचनभय मुजुमदार. नागराज पुट्टय्या, पवनसिंह राठोर, ए. एस्. सत्यनारायण, के. ई. मथाई, श्रीमती अब्राहम, श्रीमती अन्नम्मा पी. सी. कु. मिनाक्षी अय्यर, सै. म. ह. जाफरी, कृ. गो. भट्टाचार्य, देवप्रसाद सिन्हा, ज. वि. लोहार, डॉ. ए. व्ही. राव, फ. मो. जैन, श. श्री. काशिव, सरोजकुमार द्विवेदी, ओमप्रकाश गहरोत्रा, श्रीमती कृष्णा बॅनर्जी, श्री. एन्. गंगाधरप्पा.

द्वितीय श्रेणी–श्री. सय्यद् मुजीव, करुणाकरण मेनन, सौ. अकबर कादी, फिरोज पाशा, के. व्ही. मथाई.

सा. पारंगत–डॉ. कुसुमलता पटोरिया (जैन) सर्व प्रथम (डॉ. वा. ग. सिंगणापूरकर स्वर्ण पदक प्राप्त.)

सा. पारंगत–१ द्वितीय श्रेणी श्रीमती इंदिरा पिंपळे.

सा. स्नातक–बी. ए. समकक्ष (वाङमय):

द्वितीय श्रेणी–कु. मंगला जामोदकर, रवी गिन्हे, पु. ना. कामतकर. तृतीय श्रेणी–त्रि. रा. जांगडे, श्री. ब. अंभईकर, म. मु. भांडेकर, जागृती जोग.

भाषा स्नातक–बी. ए. समकक्ष (आवश्यक मराठी)

प्रथम श्रेणी–कु. सुनंदा दिक्षीत (सर्व प्रथम) साधना नेटके. द्वितीय श्रेणी–जयश्री गोखले, वि. वि. वाघमोडे, कु. सुलभा शिरवणेकर, कु. प्रणोती मोकदम, संजया कुन्नावार, विद्या तत्वादी. तृतीय श्रेणी : कु. स्मिता रोकडे, चं. रं. जोशी, सुलभा देशकर, कल्पना देशकर, शोभा समरीत, व. म. हेमके, सं. पां. खरावे, कुमुद चौधरी, शा. पुं. धांडे, एम्. एम्. लोखंडे.

## शाखावृत्त

दि. ३०–११–८० पर्यंत कार्यालयात आलेल्या वि. सा. सं. शाखावृत्त—

**नागभीड**

१९८०–८१ सालाकरिता कार्यकारिणी निवडण्यात आली—

सर्वश्री. मुरलीधरराव राहुड अध्यक्ष, रमेशपंत राजदेरकर उपाध्यक्ष, प्रा. राजन जयस्वाल कार्यवाह, न. ति. येसनसुरे, सभासद, मा. ल. दर्पे, सभासद, मा. न. कापगते, सभासद व प्र. का. येरणे, सभासद.

**सांस्कृतिक समिती (प्रभारी)**

वि. शं. जोशी, प्र. वि कावळे, म. वा. झाडे, कै. ज. स. जनवार स्मृती पारितोषक वितरण समारंभात, श्री. रणजित मेश्राम यांना, समारंभाच्या प्रमुख पाहुण्या, प्रा. सौ. नीला जोशीराव यांचे हस्ते देण्यात आले. या निमित्त, प्रा. सौ. नीला जोशीराव यांचे, 'संत आणि समाज' या विषयावर भाषण झाले. कार्यक्रमाचे संयोजन, प्रा. जयस्वाल यांनी केले व समारोप, प्रा. कापगते यांनी केला. पसायदान रणराग कुळकर्णी यांनी केले.

**आकोट**

दि. १०–१०–८० रोजी सभा होऊन त्यात खालील कार्यकारिणीची निवड झाली.

सर्व श्री. प्राचार्य. रा. मु. देवके, अध्यक्ष, प्रा. बजरंग सरोदे, उपाध्यक्ष, प्रा. रा. श्री. निचळ, सचिव, श्री. सोवळे, सहसचिव, डॉ. वानखेडे, कोषाध्यक्ष, श्री. रमेश हिंगणकर, सदस्य,

श्री. सुरेश खोटरे, सदस्य, श्री. लोणकर, सदस्य, डॉ. मावंडे, सदस्य, प्रा. सोमवंशी, सदस्य. प्राचार्य देवके यांची अकोट येथे तेल्हारा येथून बदलून आल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. यावर्षी आकोट शाखेचेवतीने व्याख्यानमाला व नाट्यस्पर्धा आयोजित करण्याचे ठरले. प्रा. देवके, यांनी केलेल्या मार्गदर्शनपर भाषणात शाखेला मजबूत करण्याचे ठरले. श्री. रा. पु. वानखेडे यांनी श्री. शिवाजी महाविद्यालयातर्फे 'भारतीय एकता' या विषयावर चित्रपट दाखविला.

**ब्रम्हपुरी**

दि. ७–१०–८० रोजी झालेल्या सभेत कार्यकारिणीची निवड झाली.

सर्वश्री. वसंतराव भाई, अध्यक्ष, अॅड. वसंतराव भुसारी, कार्याध्यक्ष, डॉ. प्रा. नरेंद्र पोफळी, उपाध्यक्ष, प्रा. सुभाष बजाज, कोषाध्यक्ष, श्री. मनोहर शिनखेडे, सरचिटणीस, श्री. बाळासाहेब गजभिये, चिटणीस, श्री. पु. या. चौरीकर, आमंत्रक–परिक्षा समिती, श्री. गो. रा. नानवे, नाट्य–समिती, प्रा. अरूण वाडितकर, वार्षिकोत्सव, प्रा. डी. एस. जगनाडे, कला–समिती, प्रा. उमेशचंद्र मिश्रा, सांस्कृतिक व कार्यक्रम समिती.

दि. ३१–८–८० रोजी प्रा. डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे यांचे व्याख्यान झाले.

दि. २०–८–८० व दि. २१–८–८० रोजी धनंजय नाकाडे यांचे "भारतीय चित्रकला" या विषयावर व्याख्यान झाले.

दि. १७–११–८० रोजी श्री. मधुकरराव ठाकरे, हिंगणघाट यांचा 'कथा ही चिलिया बाळाची' या गीत गायनाचा कार्यक्रम झाला.

दि. २३–११–८० रोजी कार्यकारिणीची सभा झाली व त्यात डॉ. मधुकर आष्टीकर यांना 'गदिमा' पुरस्कार अ. भा. आर्टिस्ट असोसिएशनने दिल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

**यवतमाळ**

यावर्षी न्या. रानडे वक्तृत्व स्पर्धा २६, २७, व २८ सप्टें. ८० रोजी वि. सा. सं. यवतमाळ शाखा येथे घेण्यात आल्यात. या स्पर्धेत एकूण १४ महाविद्यालयांनी भाग घेतला होता. स्पर्धेची फिरती ढाल अभियांत्रिकी म. वि. अमरावतीला मिळाली. प्रथम पारितोषक रोख रु. १००–००, श्री. किशोर वाघ, शासकीय. आयुर्वेद महाविद्यालय. नागपूर, द्वितीय. पारितोषक रोख रु. ७५–०० श्री. सुनील कुळकर्णी, जी. एस कॉलेज ऑफ कॉमर्स, नागपूर यांना मिळाले. प्रशस्तीपत्रके श्री. सुहास कुळकर्णी (विदर्भ. आयुर्वेद म. वि. अमरावती.) श्री. श्री. गो. देशपांडे (भारतीय म. वि. अमरावती) कु. सुनिता वैरागडे (मेडिकल कॉलेज, नागपूर) श्री. राजेंद्र मेंडको, (राधाकिसन तोष्णीवाल. म. वि. अकोला) कु. माधुरी बनसोड (अभियांत्रिकी म. वि. अमरावती) कु. मीना देशपांडे. (जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स, नागपूर) यांना देण्यात आली.

बक्षीस वितरण समारंभ. सौ. नाईक यांचे हस्ते झाला. वि. सा. सं. चे चिटणीस श्री. योगेश. वऱ्हाणपुरे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. परीक्षकांचे काम न्या. श्रीमती सुनेत्रा वैद्य, प्राचार्य श्री. साठे यांनी केले.

**बोरीअरब**––२३–१०–८० रोजी, कार्यकारिणीची निवड झाली.

श्री. राम तिवारी अध्यक्ष, श्री. पांडुरंग इमले उपाध्यक्ष, कु. शोभा महादेवराव बीडकर सचिव, श्री. विपीन कारिया सह–सचिव, श्री. वसंत वांडे सह–सचिव, श्री. सु. रा. पंजाबी

कोषाध्यक्ष, सर्वश्री. शरदचंद्र कोठारी, सदस्य, श्री. भा. पा. ठाकरे, सदस्य, श्री. रा. रा. मेश्राम, सदस्य, श्री. वा. वा. राऊत सदस्य, श्री. अ. खु. बोरकर सदस्य, हे निवडून आलेत. दि. २३–११–८० रोजी श्री. दिनकर देशपांडे (सहसंपादक. नागपूर पत्रिका) यांचे हस्ते उद्घाटन समारंभ झाला. अध्यक्षस्थानी श्री. योगेश वऱ्हाणपूरे होते. श्री. वामन तेलंग, शिवा इंगोले व डॉ. सु. न. पुरी यांची भाषणे झालीत. याप्रसंगी श्री. सुधाकर कदम (गझल) शिवा इंगोले (गझल) व शंकर वडे यांचा काव्यगायनाचा कार्यक्रम झाला.

दि. २८–११–८० रोजी सुप्रसिद्ध कवी प्रा. विठ्ठल वाघ यांचे अध्यक्षतेखाली 'कवि संमेलन' झाले. स्थानिक कवींसोबत मिर्झा रफी अहमद बेग, गजेश तोंडरे, सौ. आशाताई दिवाण व कलीमखान यांनी कवी संमेलनात भाग घेतला.

**नरखेड**

दि. ३०–८–८० रोजी, कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

श्री. रमेशबाबू गुप्ता अध्यक्ष, सौ. मिनाक्षी अंधारे उपाध्यक्ष, प्रा. रमेश पोतदार सरचिटणीस, श्री. आनंदराव गुरमाळे चिटणीस, प्रा. नाना उमाटे चिटणीस, सौ. आशा सुरजुसे चिटणीस, श्री. भाऊराव ठाकरे कोषाध्यक्ष, सर्वश्री. प्रा. वासुदेव डहाके सदस्य, श्री. रामराव ढोके सदस्य, श्री. पां. गो. कटारे सदस्य, श्री. भा. शा. काकडे सदस्य, श्री. कृष्णा राऊत सदस्य, श्री. जयंती पटेल सदस्य, श्री. रमेश कळंमे सदस्य, श्री. मधुकर गायधने सदस्य.

**नेर परसोपंत**

दि. २२–७–८० रोजी कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

श्री. ना. द. मिसाळ अध्यक्ष, श्री. वि. अ. (दादासाहेब) चिलजवार उपाध्यक्ष, श्री. श्रीरंग गोळे सरचिटणीस, प्रा. पंडित पांडे चिटणीस, श्री. सुधीर कुळकर्णी चिटणीस, श्री. अजित वापट कोषाध्यक्ष, श्री. मधुकरराव पांडे सदस्य, श्री. ग. वि. खोरशे सदस्य, श्री. राजाभाऊ कोरडे सदस्य, श्री. भैय्यासाहेब जगताप सदस्य, सौ. सुधा कुळकर्णी सदस्य.

**मूल**

दि. २५–९–८० रोजी सर्वानुमते कार्यकारिणीची निवड झाली.

प्राचार्य. वि. ना. घोटे अध्यक्ष, श्री. घनजीभाई शाह उपाध्यक्ष, श्री. डॉ. आर. जी. बोकारे उपाध्यक्ष, श्री. शशिकांत धर्माधिकारी चिटणीस, प्रा. नाना पाटील सरचिटणीस, सर्व श्री. ह. का. नागोशे सदस्य, श्री. वि. रा. येरोजवार सदस्य, प्रा. कापगते सदस्य, श्री. गो. पो. कोंडेकर सदस्य, प्रा. वा. व. आपटे सदस्य, श्री. नरेंद्र उपलप सदस्य, श्री. सदाशिवराव कडस्कर सदस्य, श्रीमती करुणा वोडखे सदस्य.

२७–९–८० रोजी डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे यांचे हस्ते शाखेचा उद्घाटन समारंभ पार पडला.

**पांढरकवडा**

दि. ४–९–८० रोजी शाखेचे उद्घाटन संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते झाले.

**लाखणी**

दि. १०–८–८० रोजी सर्वसाधारण सभेत कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

श्री. का. रा. देशमुख अध्यक्ष, श्री. बु. दा. भदाडे उपाध्यक्ष. [illegible] बोरकर कार्यवाह, श्री. ता. ह. भुरे सहकार्यवाह, श्री. र. स. गिऱ्हेपुंजे कोषाध्यक्ष, [illegible]

सदस्य, श्री. दि. प. लाखणीकर सदस्य, श्री. आ. क. देशमुख सदस्य, श्री. द. गो. अतकारी सदस्य, श्री. द. आ. बागडे सदस्य, श्री. मां. सं. भुसारी सदस्य, श्री. सुनील या. हारोडे विद्यार्थी प्रतिनिधी, सौ. अन्नपूर्णाबाई गिन्हेपुंजे विद्यार्थी प्रतिनिधी, सौ. प्रमिला भोवते विद्यार्थी प्रतिनिधी. दि. २१–९–८० रोजी, 'अंकुर' वार्षिकांकाचे प्रकाशन प्रा. अरविंद खांडेकर यांचे हस्ते झाले.

दि. ६–१०–८० रोजी, तृतीय वर्धापनानिमित्त प्रा. या. मु. पाठक व सत्यवान मेश्राम. यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, बाल चित्रकला स्पर्धा, घेण्यात आल्यात व प्रा. या. मु. पाठक यांचे भाषण झाले. ६ व ७–१०–८० रोजी डॉ. मधुकर वाकोडे, 'अंजनगाव–सुर्जी यांचे 'डॉ. आंबेडकर. एक मूल्यमापन' व 'लोक–साहित्य प्रेरणा व स्वरूप' या विषयावर भाषणे झालीत.

**आर्णी**

दि. २७–११–८० रोजी सभा होऊन त्यात कार्यकारिणी निवडून आली.

श्री. शंकरराव बुटले प्राचार्य–अध्यक्ष, डॉ. नेमीचंद जैन–उपाध्यक्ष, श्री. कलीमखान–सचिव, श्री. सिद्धार्थ शंकर चौधरी–सहसचिव, श्री. अरुण डोल्हारकर–कोषाध्यक्ष, सर्वश्री व्ही. एच. रेचे, दिपक शहाणे, किसनराव शिंदे, भिकुभाई अब्दुल शेख, भारत वनसोड–सदस्य, श्री. सुधाकर कदम–कार्यक्रम संयोजक. दि. १४–१२–८० रोजी, या शाखेचे उद्‌घाटन करण्याचे ठरले आहे.

**भंडारा**

७–१०–८० रोजी, आमदार ॲड. मा. तु. दलाल यांचे अध्यक्षतेखाली सर्व साधारण सभा झाली. या सभेत कार्यकारिणीची निवड करण्यात आली.


डॉ. प्रकाश मालगांवे–अध्यक्ष, सौ. सुधाताई कापरे–उपाध्यक्ष, ॲड. केशव झिंजर्डे–उपाध्यक्ष, श्री. अनिल कहारे–कार्यवाह, श्री. शाम चेपे–सह-कार्यवाह, श्री. भोलानाथ भोयर–सह-कार्यवाह, श्री. जीवनचंद निर्वाण–कोषाध्यक्ष, सर्वश्री ना. सी. कातोरे, शामराव नंदुरकर, कु. माधुरी सुनोने, कु. सुशम कापकर, गणेश काकपूरे, प्रदिप गादेवार, विनोद आकरे, बाळासाहेब उमाळकर, सतीश जोशी––सदस्य.

□ □



विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर मा. ना. बॅ. ए. आर. अंतुले यांचा धनवटे रंगमंदीरात शाल आणि श्रीफल देऊन सत्कार करतांना

अनुक्रमणिका



इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानचे प्रेरक मा. ना. बॅ. ए. आर. अंतुले, मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मराठी साहित्य महामंडळाला २५ हजार रुपये देणगीचा चेक डॉ. मधुकर आष्टीकर यांना देतांना.

**प्रकाशक :** अ. ल. लिमये, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२
**मुद्रक :** मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर-१२